

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, १७ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २७८ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com







## विचारपुष्प



नित्य पुत्रेषणा, वित्तेषणा व लोकेषणा या तीन इच्छांमध्ये सामान्य मनुष्य गुरफटलेला असतो. परंतु श्रेष्ठ जन या मोहातून दूर होत चौथी इच्छा धरतात ती म्हणजे प्राणिनार्तनाशनम्. आत्मवत् सर्वभूतेषु हा भाव ठेवून इतरांचे दु:ख, कष्ट दूर करण्यातच त्यांना आनंद मिळतो. मूल हसतं तेव्हा आईला मिळणारं सुख, त्याच आत्मानुभूतीचे उदाहरण होय.

**प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

**विमानसेवेबद्दल देवाभाऊंचे अभिनंदन...आता**

पान ३ वर


# जिना, काँग्रेस, माऊंटबॅटन फाळणीचे गुन्हेगार

### एनसीईआरटीच्या विशेष मॉड्युलमध्ये उल्लेख ● काँग्रेसचा जळफळाट

◆ **नवी दिल्ली, १६ ऑगस्ट**

फाळणीच्या भयंकर स्मृति दिनानिमित्त एनसीईआरटीने जारी केलेल्या विशेष मॉड्युल्समध्ये मोहम्मद अली जिना, काँग्रेस आणि तत्कालीन व्हाईसरॉय माऊंटबॅटन हे फाळणीचे गुन्हेगार असल्याचे म्हटले आहे. पुस्तकातील या उल्लेखामुळे काँग्रेसचा जळफळाट सुरू झाला आहे.

फाळणीनंतर काश्मीर ही एक नवीन समस्या म्हणून उदयास आली. ही भारतात यापूर्वी कधीही अस्तित्वात नव्हती. चुकीच्या कल्पनांमुळे भारताची फाळणी झाली. भारतीय मुस्लिमांचा पक्ष मुस्लिम लीगने १९४० मध्ये कराचीत एक परिषद घेतली. हिंदू आणि मुस्लिमांमधील धार्मिक तत्त्वज्ञान वेगळे आहेत, त्याच्या चालीरीतीही वेगळ्या असून, त्यांचे साहित्यही वेगळे असते, असे मुस्लिम लीगचे नेते मोहम्मद अली जिना यांनी म्हटले होते, असेही नमूद करण्यात आले आहे.





अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाची फाळणी झाली, असे एनसीईआरटीच्या 'फाळणीचे गुन्हेगार' या शीर्षकाखालील एका विभागात म्हटले आहे. मात्र, ही फाळणी कुण्या एका व्यक्तीने केलेली नाही. यासाठी तीन घटक जबाबदार होते. पहिला घटक म्हणजे फाळणीची मागणी करणारे मोहम्मद जिना, ही मागणी स्वीकारणारा दुसरा घटक म्हणजे काँग्रेस आणि माऊंटबॅटन यातील तिसरा घटक आहे. या मागणीची अंमलबजावणी माऊंटबॅटन यांनी केली. मात्र, त्यांची ती घोडचूक ठरली. (वृत्तसंस्था)

### पंजाबमधील लोक दोन दिवस होते संभ्रमात

१५ ऑगस्ट १९४७ नंतर दोन दिवस पंजाबमधील लक्षावधी लोकांना ते पाकिस्तानात आहेत अथवा भारतात हे माहीत नव्हते. अशा प्रकारचा संभ्रम होणे म्हणजे हा पराकोटीचा निष्काळजीपणा होता. या मॉड्युलमध्ये जिना यांना दोषी ठरवले आहे. मात्र असे काही होईल याचा विचार केला नव्हता आणि आयुष्यात पाकिस्तान पाहायला मिळेल याचाही विचार केला नव्हता, असे जिना यांनी म्हटले होते.

१९४८ मध्ये होणारे सत्तेचे हस्तांतरण त्यांनी एक वर्ष आधी म्हणजे १८४७ मध्ये घडवून आणले. यावर सहमती दर्शवावी यासाठी माऊंटबॅटन प्रत्येकाच्या मागे लागले होते. त्यामुळे फाळणीसाठी पूर्णतः तयारी होऊ शकली नव्हती. फाळणीच्या सीमांचे सीमांकनही घाईघाईने करण्यात आले. त्यासाठी सर सिरिल रॅडक्लिफ यांना केवळ पाच आठवड्यांचा कालावधी देण्यात आला होता.


# 'स्व' व्यवस्थेचा अंगीकार म्हणजेच स्वातंत्र्य

### सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन ● भुवनेश्वर येथे केले ध्वजारोहण

◆ **भुवनेश्वर, १६ ऑगस्ट**

स्वातंत्र्य या शब्दात 'स्व' आणि 'तंत्र' (व्यवस्था) असे दोन शब्द आहेत. ज्यावेळी 'स्व'च्या आधारावर 'तंत्र' चालते, त्यावेळी स्वातंत्र्य मिळते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी येथे केले. येथील उत्कल विपन्न मदत समितीद्वारे आयोजित कार्यक्रमात ध्वजारोहण केल्यानंतर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत संबोधित करीत होते.

स्वातंत्र्यप्राप्तीला ७८ वर्षे झाली आहेत. त्यासाठी किती वर्षे प्रयत्न झाले, असा विचार केला असता, स्वातंत्र्यासाठी पहिला प्रयत्न १८५७ मध्ये झाला आणि त्यानंतर ते सातत्याने सुरूच होते. हे प्रयत्न वेगवेगळ्या मार्गांनी करण्यात आले. सशस्त्र असो अथवा नि:शस्त्र सतत तीन पिढ्यांपर्यंत लोकांनी प्राणार्पण केले तसेच तुरुंगात गेले. परिस्थिती बदलत राहिली. मात्र, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी परिस्थिती अनुकूल होत नाही, तोवर त्याकाळातील समाजाने सर्व प्रयत्न सुरू ठेवले. माझा स्वत:चा जन्म स्वातंत्र्यानंतरचा आहे. आपण स्वातंत्र्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे स्मरण आज ७८ वर्षांनंतरही करतो. कारण, ते आपल्या पूर्वजांनी मिळवले



होते. परंतु, आपल्याला ते सहजच मिळाले. ते मिळवण्यासाठी मोठे परिश्रम करावे लागले आणि ते टिकवून ठेवण्यासाठी तसेच वाढवण्यासाठीही परिश्रम करावे लागतील, असे डॉ. भागवत म्हणाले.

भारत एक वैशिष्ट्यपूर्ण देश आहे. जगात सुख-शांती यावी यासाठी तो जगतो. जगाला धर्म देण्यासाठी तो जगतो. त्यामुळे आपल्या राष्ट्रध्वजाच्या केंद्रस्थानी धर्मचक्र आहे. हा धर्म सर्वांना सोबत घेऊन, सर्वांना जोडून सर्वांची प्रगती करतो. म्हणूनच तो या जगात आणि इतर जगात सर्वांना आनंद देतो. भारत जगाला हा धर्म देण्यासाठी आहे, हे आपले वैशिष्ट्य आहे. हे देण्यासाठी व्यवस्था आपलीच असावी लागेल. त्यासाठी 'स्व'च्या आधारावर चालावे लागेल, असे डॉ. भागवत म्हणाले.

देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. इंग्रज निघून गेले आणि आपला देश आपल्याच लोकांच्या आधिपत्याखाली आला. आज जग डळमळीत आहे. दोन हजार वर्षांपर्यंत अनेक प्रयोग करूनही जगाला समस्यांवर उपाय सापडला नाही. अशा परिस्थितीत जगाला आपल्या दृष्टिकोनाच्या आधारावर, धर्माच्या दृष्टिकोनाच्या आधारावर नवीन सुख-शांती असलेले जग तयार करण्याचा उपाय देणे हे आपले कर्तव्य आहे. हे कार्य आपल्या स्वतंत्र देशासमोर आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ज्याप्रमाणे आपल्या पूर्वजांनी केले अगदी तसेच कष्ट, तोच त्याग आणि तेच बलिदान आपल्या सर्वांना करावे लागेल, असे सरसंघचालक म्हणाले. स्वातंत्र्यासाठी लढताना आपल्या पूर्वजांना वाटले नव्हते की परिस्थिती अनुकूल असताना काम होईल. अनुकूलता आताही नाही हे जाणूनही सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे त्यांनी लोकांच्या मनात ही भावना जिवंत ठेवली. त्याचप्रमाणे आपण परिस्थितीचा विचार न करता आपल्या देशातील सर्वांना सुख, शांती, ऐक्य, सर्वांना आदर, प्रतिष्ठा सुनिश्चित केली पाहिजे. यासोबतच आपल्याला एक विश्वगुरू भारत स्थापन करायचा आहे, जो जगातील संघर्षापासून मुक्तता, जगातील पर्यावरणीय तसेच इतर समस्या सोडवून एक आनंदी आणि सुंदर जग निर्माण करेल. आज आपण सर्वांनी या कर्तव्याचे स्मरण ठेवले पाहिजे. (वृत्तसंस्था)

### त्याग, कर्मशीलतेचा रंग भगवा

आपल्या राष्ट्रध्वजात भगवा रंग सर्वांत वर आहे. तो त्याग, कर्मशीलता आणि ज्ञानाचा रंग आहे. त्याचप्रमाणे शुद्ध चारित्र्य आणि पावित्र्याचे प्रतीक असलेला पांढरा रंग मध्यभागी आहे. हे दोन रंग एकत्र येतात, त्यावेळी शुद्ध चारित्र्य असलेले लोक नि:स्वार्थपणे काम करतात, कठोर परिश्रम करतात आणि ज्ञानाची पूजा करतात, तेव्हा समृद्धी येते. हिरवा हा समृद्धी, लक्ष्मीचा रंग आहे. आपल्याला हे सर्व धर्माच्या आधारे करायचे आहे. म्हणूनच आपल्या राष्ट्रध्वजातील धर्मचक्र आपल्याला काय करायचे आहे आणि ते कसे करायचे, हे समजावून सांगते. त्याचप्रमाणे, आपण सर्वांनी आपले कर्तव्य लक्षात ठेवले पाहिजे आणि त्या कर्तव्याच्या दिशेने छोटे संकल्प घेऊन आपल्या जीवनात पुढे गेले पाहिजे. संघाचे स्वयंसेवक पंच परिवर्तन घडवण्याबाबत बोलतात. त्याचप्रमाणे लहान संकल्पांनी समाजात, देशात आणि त्यामुळे जगात अशा प्रकारचा बदल घडून येईल. अशा छोट्या बदलांपासून सुरुवात करून आपण आपल्या कर्तव्याच्या मार्गावर पुढे जाण्याचे काम सुरू केले पाहिजे, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

## सीना नदी ओव्हरफ्लो



सोलापूर : सततच्या पावसामुळे व उजनी धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याने सीना नदीला पूराचे स्वरूप प्राप्त झाले असून अनेक बंधारे पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.






# लोकसंख्येचे प्रमाण बदलण्याचे षडयंत्र

### पंतप्रधान मोदीः हाय-पॉवर डेमोग्राफी मिशनची घोषणा

◆ **नवी दिल्ली, १६ ऑगस्ट**

एका विचारपूर्वक षडयंत्रानुसार देशातील लोकसंख्येचे प्रमाण बदलल्या जात आहे. एका नव्या संकटाची बीजे पेरली जात असून घुसखोर माझ्या देशातील बहिणी आणि मुलींना लक्ष्य करत आहेत. घुसखोरीमुळे लोकसंख्याशास्त्रीय बदलाच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी सरकार उच्चस्तरीय लोकसंख्याशास्त्रीय मिशन स्थापन करणार आहे, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. स्वातंत्र्यदिनी लाल किल्लायवरून ते संबोधित करीत होते.

तब्बल १०३ मिनिटांच्या दीर्घ भाषणात मोदी यांनी विविध मुद्यांना हात घातला. ते पुढे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरअंतर्गत शूर सैनिकांनी शत्रूंना त्यांच्या कल्पनेपलीकडची शिक्षा दिली. भारत अण्वस्त्र हल्ल्यांना भीक घालत नाही, यापुढे कोणत्याही धमक्या सहन करणार नाही. सिंधू करार एकतर्फी आणि अन्यायी होता आणि हा करार राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने स्वीकारार्ह नाही. स्वदेशी ही मजबूरी नाही तर मजबूती असली पाहिजे. देशातील व्यापाऱ्यांनी येथे स्वदेशी माल विकला जातो, असे बोर्ड लावायला हवे. मेड इन इंडिया सेमीकंडक्टरला सरकारचे प्राधान्य आहे. या वर्षाच्या अखेरीस, भारतात बनवलेल्या सेमीकंडक्टर चिप्स बाजारात येतील. आपण २०३० पर्यंत स्वच्छ ऊर्जेचा वापर ५० टक्क्यांपर्यंत वाढवू असे लक्ष्य ठेवले होते आणि ते यावर्षीच साध्य झाले.

पंतप्रधान मोदी यांनी यावेळी विकसित राष्ट्राचा संपल्प करताना विकसित भारत रोजगार योजना, जीएसटीमधील फेररचना, ऑपरेशन सुदर्शन चक्र अशा दहा घोषणा केल्या. (वृत्तसंस्था)

### मातृभूमीच्या कल्याणासाठी रा. स्व. संघ समर्पित

मोदी म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ १०० वर्षांपासून देशाची सेवा करत आहे. वैयक्तिक विकासाद्वारे राष्ट्रनिर्माणाच्या संकल्पाने, संघाच्या लोकांनी भारत मातेच्या कल्याणाच्या ध्येयाने १०० वर्षे मातृभूमीच्या कल्याणासाठी आपले जीवन समर्पित केले. विकसित भारत रोजगार योजना १५ ऑगस्टपासून लागू करण्यात आली . यातंर्गत खासगी क्षेत्रात पहिली नोकरी मिळवणाऱ्या मुला-मुलींना सरकारकडून १५ हजार रुपये दिले जातील.

## राहुल गांधींची आजपासून मतदान हक्क यात्रा

◆ **पाटणा, १६ ऑगस्ट**

काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी १७ ऑगस्टपासून बिहारमध्ये मतदान हक्क यात्रा सुरू करणार आहे. यावेळी ते १६ दिवसात २४ जिल्ह्यात प्रवास करणार असून निवडणूक आयोगाकडून करण्यात येणाऱ्या फसवणुकीची माहिती जनेतेला देणार असल्याची माहिती काँग्रेसचे प्रभारी कृष्णा अल्लावरू यांनी शनिवारी दिली. राजदचे नेते तेजस्वी यादवहे देखील यात्रेत सामील होतील. भारताचे संविधान, लोकशाही आणि मतदारांना मजबूत करणे या यात्रेचा उद्देश आहे. मतदार यादीतील दुरुस्तीविरुद्ध आणि मत चोरीविरुद्धच्या लढाईला जनआंदोलन बनवण्यासाठी ही यात्रा काढली जात आहे. (वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सोलापुरात

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी सोलापूर दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीत १हजार ३४८ घरांचे वितरण करण्यात येणार आहे. याच दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत मंजूर झालेल्या कर्जाच्या धनादेशाचे वाटप करण्यात येणार आहे. चार दिवसांपूर्वी मुंबईमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास म हामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील तसेच सोलापूरचे अनंत जाधव यांची बैठक झाली होती. म हामंडळाअंतर्गत सोलापुरातील कर्ज मंजूर झालेल्या प्रभाकर प्रल्हाद मोरे १५ लाख, हेमलता संजय कोडक ९.५ लाख, संगीता धर्मराज चटके १५ लाख, शरद किसन मोठे १५ लाख अशा चार लाभार्थ्यांना या धनादेशाचे वाटप करण्यात येणार आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आत्मजागृती हा मुक्तीचा मार्ग : हभप.डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ ऑगस्ट-**

मोक्षमार्गाचे द्वार उघडण्यासाठी प्रथम आवश्यक गोष्ट म्हणजे इंद्रियांचे संयमन. इंद्रियांवर नियंत्रण नसल्यास मनुष्य आसक्ती, ममत्व आणि अहंकाराच्या जाळ्यात अडकतो. त्यामुळे, अंतःकरणातील ममत्वाचा त्याग झालाच पाहिजे. जीवनमुक्तीची अवस्था ही अगदी विलक्षण असते. बाहेरुन त्या मुक्त पुरुषाचे वर्तन जरी सामान्य वाटत असले, तरी त्याच्या प्रत्येक क्रियेमध्ये अंतर्गत अलिप्तता असते. ज्याला कर्तव्याचा किंवा देहाचा कोणताही भार उरलेला नाही, ज्याच्या मनावर बंधन नाही. तोच खऱ्या अर्थाने मुक्त होय.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २२

देह हा केवळ प्रारब्धाशी जोडलेला असतो. आत्मतत्त्वाच्या आड आलेले आवरण दूर झाले, की मी कोण आहे? या प्रश्नाचे खरे उत्तर आत्मानुभूतीतून मिळते. श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी आज २२ व्या सत्रात या सत्याचा उलगडा करताना सांगितले की, आत्म्याचे अस्तित्व देहाच्या पलीकडे आहे.

यासाठी ते पाश्चात्त्य तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस याचे मार्मिक उदाहरण देतात. सॉक्रेटिस हा सदैव वास्तवतेवर भर देणारा तत्त्ववेत्ता होता. त्याचे विचार दार्शनिक, चोख व सौंदर्यपूर्ण असल्याने तरुणाई त्याच्याकडे आकर्षित होत होती. परंतु धर्ममार्तंडांना त्याचा प्रभाव रुचत नव्हता. त्यांनी त्याला मृत्यूदंड ठोठावला. विषाचा प्याला त्याच्यासमोर आणला गेला, तेव्हा शिष्य दुःखाने रडू लागले. त्यावेळी सॉक्रेटिसने दिलेले उत्तर अनमोल होते, मी देहाने मरणार, पण माझे आत्मतत्त्व अमर आहे. मग रडता का?

तेव्हा,मृत्यूची भीती घालवायची असेल तर आत्मजागृती हवी. हेच सत्य शुकाचार्य परिक्षित राजाला सांगतात, राजन्, आधी तू स्वतःला ओळख. हा देह पंचमहाभूतांनी बनलेला आहे; तो उधार घेतलेला आहे आणि एक दिवस परत करावाच लागणार आहे. शरीर तुझे नाही, म्हणून त्याच्याशी तादात्म्य नको. आत्माच तुझे खरे स्वरूप आहे.

डॉ. जयवंत महाराज पुढे स्पष्ट करतात की, रजोगुण मनात चंचलता व विक्षेप निर्माण करतो. हा सत्वगुणाशी संलग्न झाला की धर्माचा उदय होतो. पण रजोगुण जेव्हा तमोगुणाशी मिळतो तेव्हा अधर्म घडतो. म्हणूनच मनावरची मळभ काढून टाकण्यासाठी अध्यात्म आवश्यक आहे.

सध्या समाजातही हेच तत्त्वज्ञान लागू पडते. आधुनिक जीवनशैली, स्पर्धा आणि भौतिक मोह यामुळे माणूस अधिकाधिक रजोगुणी व चंचल होत आहे. मन अस्थिर झाल्यावर कुटुंबात कलह, समाजात अन्याय आणि राष्ट्रात असंतुलन निर्माण होते. म्हणून प्रत्येकाने आत्मतत्त्वाची जाणीव ठेवून संयम, सत्य आणि धर्म या मूल्यांचा स्वीकार करणे गरजेचे आहे. इंद्रिय संयमन, आत्मजागृती आणि सद्गुणांची जोपासना केल्यास वैयक्तिक शांतीबरोबरच सामाजिक सौहार्दही नांदेल, असे डॉ. जयवंत महाराज आजच्या सत्रात शेवटी नमूद करतात.



## पोलिस आयुक्तालयात झेंडावंदन

सोलापूर - भारतीय स्वातंत्र दिनानिमित्त पोलीस आयुक्त कार्यालय येथे पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलीस उपायुक्त गौहर हसन, विजय कबाडे, अन्य वरिष्ठ पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी उपस्थित होते.



## ज.रा. चंडक प्रशाला

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ज.रा. चंडक प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, इंदिरा प्रशाला तसेच राजीव प्राथमिक शाळा व शरद बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सचिन ठोकळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहण झाल्यावर स्काऊट विद्यार्थ्यांनी साजेसे असे संचलन करून ध्वजास मानवंदना दिली. यावेळी संचालक किशोर पाटील, माजी नगरसेविका मंदाकिनी तोडकरी, माजी नगरसेवक गणेश पुजारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन मुजावर ए.ए. यांनी केले.

# विविध उपक्रमांनी स्वातंत्र्यदिनाचा उत्साह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑगस्ट-**

**शहर परिसरातील विविध शाळा, महाविद्यालयात भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध शाळांमध्ये हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

## सिद्धेश्वर महिला पॉलिटेक्निक



श्री सिद्धेश्वर महिला पॉलिटेक्निक येथे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य तथा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. याप्रसंगी विद्यार्थिनींनी देशभक्तीपर वक्तृत्व, कविता, नृत्य आणि लघुनाटिका सादर केल्या. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर ९ ते १३ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. तसेच रांगोळी स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये रांगोळी स्पर्धेचे विजेते तसेच वक्तृत्व स्पर्धेचे विजेते यांना बक्षीस वाटप करण्यात आले. रांगोळी, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थिनींना देशभक्तीचा संदेश देण्यात आला. रांगोळी स्पर्धेचे प्रथम क्रमांक इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी डिपार्टमेंट मधील स्नेहा वाले दुसऱ्या क्रमांकावर सिव्हिल डिपार्टमेंट मधील. दिव्या उदगिरी व अंजली तलवार तर तिसऱ्या क्रमांकावर कॉम्प्युटर डिपार्टमेंट मधील सौंदर्या वाघदरे तसेच वक्तृत्व स्पर्धेचे प्रथम क्रमांक कॉम्प्युटर डिपार्टमेंट मधील गायत्री बिराजदार दुसरा क्रमांक इलेक्ट्रिकल डिपार्टमेंट मधील गायत्री पटणे तर तिसरा क्रमांक इलेक्ट्रिकल डिपार्टमेंट मधील श्वेता गड्डम विजेत्या विद्यार्थिनींना बक्षीस वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अंकुश जगदाळे व त्यांची कन्या तसेच अर्पिता जगदाळे उपस्थित होते. कार्यक्रमास प्राचार्य गजानन धरणे, ॲड. आर. एस. पाटील तसेच गव्हर्निंग बॉडीचे सदस्य प्रा. श्रेयस आळंद डॉ.नीता आळंगे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभागाचे सदस्य प्रा मृदुला हरसुरे, प्रा कोमल कांबळे, प्रा रविकिरण पतंगे, प्रा मयुरी अगरखेडकर, प्रा. वैदेही देशपांडे, प्रा. हर्षदा भंडारे यांनी कार्य केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. सुचेता चौधरी यांनी केले.




## एमआयटी शिक्षण संकुल

एमआयटी शिक्षण संकुल केगाव येथे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या जेष्ठ समाजसेविका चंद्रिका चौहान, माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव आणि एम आयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे, संचालक (स्ट्रॅटेजी आणि ऑपरेशन्स) राघवेंद्र एम. चाटे, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या मुख्याधिपिका रेखा पाटील आणि ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण सोहळ्याने झाली. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. शिस्तबद्ध परेड, देशभक्तीपर गीते, नुक्कड नाटक, पिरॅमिड निर्मिती आणि नृत्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासाचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, विश्वशांती गुरुकुल स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## व्हॅलेंटाईन सर्कल स्कूल

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे या.श्री किशोर मुकंमपल्ली लाभले. तसेच शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे उपाध्यक्ष यमुना दिड्डी सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे व शाळेच्या मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व सुप्रिया बोम्मा क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व शिवाजी आवताडे सहशिक्षक भगतलाल सुतार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांचे हस्ते ध्वजारोहण करुन राष्ट्रीय गीत व राज्य गीताने करण्यात आली. राजेश्वरी मुदगंडी यांनी पाहुण्यांचे परिचय करून दिला. विद्यार्थ्यांनी देशभक्ती पर भाषण विविधतेतील एकतेचे महत्त्व नृत्यातून सादरीकरण केले. तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी कवायत सादर केले. व चिमुकल्यांनी कराटेचे प्रात्यक्षिक सादर केले. सूत्रसंचालन निता लोहार व प्रज्ञा कोटा तसेच चंदना कोटा यांनी केले. शेवटी प्रमुख पाहुण्यांचे हस्ते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



## ओम इंग्लिश मीडियम प्री स्कूल

ओम इंग्लिश मीडियम प्री स्कूल हत्तुरे नगर येथे स्वातंत्र दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठल गुड्डेवाडी व पंडित बिराजदार, संस्थापिका रेखा मळेवाडी व ओंकार मळेवाडी यांच्या उपस्थितीत स्वतंत्र दिन साजरा झाला. कार्यक्रमास दिपाली बोरगांवकर, सुनिता बिराजदार,पल्लवी पाटील, अंबिका कुलकर्णी, अनुराधा कुलकर्णी, माधवी गोरनाळी, सारिका लांबतुरे, सुलोचना घोडके, सुषमा भंडारे, पूजा करजगीकर, रोहिणी माने व विकास प्रधान, जयश्री घोडके, राजश्री यमगवळी, विनायक गुड्डेवाडी उपस्थित होते.



## दादाई संस्था

लमेंट फ्री कॉलनी नंबर १ वांगी रोड येथे दादाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या तथा पारधी समाज अध्यक्ष पारू काळे यांच्या हस्ते संस्थेचे आधारस्तंभ टकारी समाजातील जेष्ठ नारायण जाधव यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष युवराज जाधव, रमेश जाधव, बालाजी जाधव, सहाय्यक फौजदार विकास रोकडे, हेडकॉन्स्टेबल नंदू राठोड, चंदा काळे सायबु गायकवाड, सुरेश गायकवाड, ज्ञानेश्वर जाधव, बुवा सुरेश शिवशरण, अविनाश जाधव, अंबादास जाधव, बप्पा जाधव, अनिल जाधव, राघवेंद्र जाधव, विवेक जाधव, संतोष गायकवाड उपस्थित होते.

## सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुल

सहस्त्रार्जून शैक्षणिक संकुल येथे स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत प्रथम आलेली हिना सय्यद व इंग्रजी माध्यम विभागातून प्रथम आलेली अक्षरा वडतिले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून रघोजी किडनी व रिसर्च सेंटरचे चेअरमन डॉ. विजयकुमार रघोजी, प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ निहारिका रघोजी व प्रसिद्ध उद्योजक सतीशसा कोल्हापुरे यांची उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी व्यासपीठावर शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, संस्थेचे सदस्य भरतकुमार शालगर, सुरेशसा बिद्री, संजीव हिरालालसा रंगरेज, गणेश दामजी, शिरीष कोल्हापुरे, श्रीरामसा पवार, शैक्षणिक संस्थेचे सदस्य सर्वश्री संजीव वसंतसा रंगरेज, तुकारामसा पवार,अनिलसा रंगरेज यांच्यासह संस्थेचे माजी अध्यक्ष गणपतसा मिरजकर, मदनसा चव्हाण, रंगनाथसा बंकापूर, सुनंदा कोल्हापुरे,राजश्रीताई बंकापूर, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मुख्याध्यापिका मंजुषा काशीद, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी बिराजदार उपस्थित होते. सूत्रसंचालन सहशिक्षक जय कबाडे यांनी केले, तर आभार सहशिक्षिका प्रशांती काटवे यांनी मानले.



## जुनी पोलिस लाईन येथे झेंडावंदन

सोलापूर - शहरातील मुरारजी पेठेतील जुनी पोलिस लाईन गृहनिर्माण सोसायटी येथे सोसायटीचे चेअरमन अनिकेत व्यवहारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सोसायटीचे सचिव वसंत येळे यांच्यासह संचालक, नागरीक उपस्थित होते.




## अरिहंत स्कूल

येथील अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. ध्वजारोहण करण्याचा मान माध्यमिक शालांत परीक्षा २०२५ मध्ये शाळेत प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावलेले वैष्णवी दुध्याल व रोहन महेश्वर यांना मिळाला. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत सादर करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. अजय पोन्नम उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे माजी स्वातंत्र्य सैनिक व सेवानिवृत्त हवालदार विद्याधर ढोने उपस्थित होते. अंजली रगबले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर विद्यार्थ्यांचे शिस्तबद्ध कवायत संचलन सादर झाले. यावेळी संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, चन्नेश इंडी, पर्यवेक्षिका सौ.स्नेहा यादव उपस्थित होते. सूत्रसंचालन फौजान अझहरी यांनी केले तर आभार ईरण्णा यांनी मानले.

## श्राविका संकुल

श्राविका संकुलात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. संस्थेच्या विश्वस्त देवई शहा व उमाबाई श्राविका विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक आर. एल.देवकते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, श्राविका संस्थेतील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुकुमार मोहोळे, चतुरबाई प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राखी देशमाने, पी एस इंग्लिश मीडियमचे प्राचार्य विलास लेंगरे, हायस्कूलच्या मुख्याध्यापिका कांबळे, आयटीआयचे प्राचार्य पाटील, ग्रंथालयाचे ग्रंथपाल रत्नपारखे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, सर्व विभागाचे पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती. प्रारंभी संस्थेच्या संस्थापिका प.पू.क्षुल्लिका राजुलमती माताजी व रतनचंदजी शहा(काकाजी)यांच्या जन्मजयंती निमित्त प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली.



यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. प्रास्ताविक प्राचार्य सुकुमार मोहोळे यांनी केले. श्राविका संस्थेच्या आद्य संस्थापिका क्षुल्लिका राजुलमती माताजी व रतनचंदजी शहा यांच्या जन्मजयंती निमित्त त्यांच्या जीवन चरित्रावर प्रशालेतील सहशिक्षक अनंत बळळे यांनी प्रकाश टाकला. क्षुल्लिका राजुलमती माताजी यांच्या जीवन चरित्रावर आधारित जीवन ज्योत या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे विमोचनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उमाबाई श्राविका विद्यालय व पी एस इंग्लिश मीडियम स्कूलमधील स्काऊट गाईड,आर.एस. पी. पथकातील विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध व नेत्रदीपक पथसंचलनाने उपस्थित मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी यावेळी आकर्षक कवायतीचे सादरीकरण केले. कलाशिक्षक प्रवीण कंदले यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त फलकावर रेखाटलेले चित्र सर्वांचे आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत पाटील तर आभार प्रीती वऱ्हाडे यांनी मानले. प्रशालेचे क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे,अनुप कस्तुरे प्रा.कल्याणप्पा हायगोंडे, अजित पाटील, रोहन घाडगे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



## एन. के. किड्स स्कूल

बाळे परिसरात राजेश्वरी नगर येथील एन के किड्स स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाले. या वेळी व्यासपीठावर भारतीय जनता पार्टीचे राजाभाऊ आळूरे, विनय ढेपे, सुहास माने, मेजर भोसले संस्थेचे संचालक विकास कस्तुरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्वेता कस्तुरे, हेड शिक्षिका दिपाली कुलकर्णी, अश्विनी शिंगण, पुनम कळसाईत, शितल सुतार तसेच सेविका संगीता हेगडकर यांनी परिश्रम घेतले. यावेळी पार्ले ॲग्रोचे एरिया मॅनेजर दर्शन भोसले यांच्या वतीने मुलांना शीतपेय वाटप करण्यात आले. तसेच पालक प्रतिनिधी अमृता पंडित यांच्या वतीने बिस्किटांचे वितरण करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# विमानसेवेबद्दल देवाभाऊंचे अभिनंदन...आता

## नाईट लँडिग व्हावे अन् बोरामणी विमानतळाचे स्वप्न पूर्ण करावे; शहरातील उड्डाणपूल कागदावरच तर सोलापूरला दररोज पाणी मिळावे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

सोलापूरकरांचे अनेक वर्षांचे विमानसेवेचे अधुरे स्वप्न राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण केल्याने सोलापूरकरांमधून समाधान व्यक्त होत आहे, परंतु आपल्या लाडक्या देवाभाऊंकडून सोलापूरकरांना खूप साऱ्या अपेक्षा आहेत. होटगी रोड विमानतळावर नाईट लँडिग व्हावे आणि भूसंपादन झालेल्या दोन हजार एकर जागेवर बोरामणी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ पूर्ण व्हावे. तब्बल बारा वर्षांपासून केवळ कागदावर असलेल्या शहरातील दोन उड्डाणपूलांचे काम प्रत्यक्षात सुरु व्हावे. उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी पूर्ण झाली असल्याने सोलापूरकरांना अपेक्षा तर दररोज पाणीपुरवठ्याची पण किमान एक दिवसाआड तरी शहराला पाणीपुरवठा व्हावा. सोलापूरच्या विकासाचा मोठा बॅकलॉग शिल्लक असला तरी या प्रमुख मागण्या देवाभाऊ पूर्ण करतीलच अशी खात्री सोलापूरकरांना आहे. देवाभाऊंनीच सोलापूरचे पालकत्व स्वीकारल्यास नक्कीच सोलापूरचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही.


सोलापूरकरांनी सातत्याने भाजपाला भरभरून मतदान केलेले आहे. गेल्या काही वर्षांपासून सोलापूर हा नेतृत्वहिन जिल्हा झाल्याचे जाणवत आहे. सोलापूरचा विकास आणि त्यासाठी पाठपुरावा करणारा सक्षम नेताच सध्या सोलापूरकरांकडे नसल्याने सोलापूरकरांच्या पदरी विकासाबाबत निराशाच दिसते. मागील दोन जनगणना पाहिल्यास सोलापूर शहराची लोकसंख्या घटत चालल्याची आकडेवारी आहे. कारण रोजगारासाठी सोलापूरचा शिक्षित युवक आणि युवती सोलापूर सोडून जात आहेत. त्यांच्या पाठोपाठ त्यांचे पालकदेखील सोलापूर सोडत आहेत. सोलापुरात आयटी इंडस्ट्री तर नाहीच पण मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल असा एकही मोठा उद्योग सोलापुरात नाही. सव्वाशे टिएमसी इतक्या मोठ्या क्षमतेचे उजनी धरण सोलापुरात आहे. मोठ्या प्रमाणात कामगारांची उपलब्धता आहे. एनटीपीसी आणि पॉवरग्रीड असल्याने मुबलक वीजपुरवठा आहे. शहरालगत आणि जिल्ह्यात मोठ्या औद्योगिक वसाहती असल्याने जागेची कमतरता नाही. उद्योगांसाठी पाणी मिळावे म्हणून उजनी धरणातून शासनाने तरतूद केलेली आहे. विमानसेवा सुरु आहे तर उत्तर व दक्षिण भारताला जोडण्यासह संपूर्ण देशाला जोडणारे रेल्वेचे जाळे सोलापुरात आहे.

सोलापूरची भौगोलिक परिस्थिती उद्योगधंद्यांना अनुकूल असताना केवळ राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि सक्षम नेतृत्व नसल्याने सोलापूरकरांचा वनवास सुरु आहे. आता सोलापूकरांना अपेक्षा आहे ती केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडूनच होय. कारण महाराष्ट्राला विकासाच्या मार्गावर गतीने नेणारे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोलापूरकडेही नागपूरप्रमाणेच पहावे आणि सोलापूरकरांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करावे, असे साकडे सोलापूरकर लाडक्या देवाभाऊंना घालत आहेत.

सोलापूर-गोवा विमानसेवा सुरु झाली. आता सोलापूर-पुणे आणि सोलापूर-मुंबई विमानसेवा लवकरच सुरु व्हावी. कारण आपणच सोलापूर-मुंबई विमानसेवेसाठी गॅपफंडीगची तरतूद केली आहे. सोलापूर-तिरुपती विमानसेवा सुरु झाल्यास त्याला प्रचंड प्रतिसाद मिळेल असे सोलापूरकर सांगत आहेत.

**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

सोलापूरलगत बोरामणी येथे दोन हजार एकर जागा संपादित करून पंधरा वर्षे झाली पण विमानतळ होत नाही. तिथे नसलेल्या माळढोकचे विघ्न दाखवून हे आंतरराष्ट्रीय विमानतळ होवू न देणे ही शोकांतिका आहे. हजारो शेतकऱ्यांची उपजाऊ जमीन संपादित केली असल्याने या जागेचा त्याच कारणासाठी वापर व्हावा, अशी शेतकऱ्यांचीही मागणी आहे. कारण बोरामणी आंतराष्ट्रीय विमातनळ कार्गो हब झाल्यास सोलापूरची चादर, टॉवेल यासह डाळिंब, द्राक्ष, बोर, पपई या फळांचीही मोठी निर्यात देशाबाहेर होणार आहे.



सोलापूर ते उजनी धरण अशी शंभर किमीची दुहेरी समांतर जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. आता प्रतिक्षा आहे ती सोलापूरकरांना किमान एक दिवसाआड तरी सुरळीत आणि योग्य वेळी पाणीपुरवठा होण्याची, कारण आता सोलापूकरांना आठवड्यातून एकदाच पाणीपुरवठा होतो. उजनीसारखे विशाल धरण शंभर टक्क्यांपेक्षा अधीक भरलेले असतानाही सोलापूरकरांचा पाण्यासाठी वनवास सुरु आहे. अकार्यक्षम महापालिकेकडून शहराचा पाणीपुरवठा काढून घेवून तो एमजीपीकडे दिल्यास सोलापूरकरांचा पाण्याचा वनवास संपण्याची आशा जाणकार व्यक्त करत आहेत. शहरातील पाणीपुरवठ्याची अंतर्गत वितरण व्यवस्था पूर्ण करण्यासाठी ९०० कोटींचा प्रस्ताव शासन दरबारी पडून आहे. याबाबत देवाभाऊच निर्णय घेवू शकतात आणि तो त्यांनी घ्यावा अशी आर्त साद सोलापूरकर घालत आहेत.

गेल्या बारा ते पंधरा वर्षांपासून सोलापूरकर फक्त चर्चाच ऐकत आहेत तो विषय म्हणजे शहरात होणाऱ्या दोन उड्डाणपूलांचा होय. अनेक वर्षांपासून कागदावर असलेल्या उड्डाणपूलांमुळे शहरातील अवजड वाहनांच्या धडकेत आजपर्यंत अनेक निष्पापांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. उड्डाणपूलांचे घोडे एकदाचे गंगेत न्हावे हीच अपेक्षा सोलापूरकरांची आहे.

शहराच्या गावठाण भागातील भुईकोट किल्ल्यामुळे शहराचा मोठा भाग विकासापासून वंचित आहे. पुरातत्व विभागाच्या दिल्लीतील कार्यालयात हेलपाटे मारून देखील किल्ल्यालगतच्या बांधकामांना परवानगी मिळत नाही.

सोलापूर विकासाचे हे मोठे प्रकल्प अर्धवट असलेले आहेत तर छोटे-मोठी अनेक विकासकामे तर शेकडोंनी असून ती पूर्ण होण्याची प्रतिक्षा आहे. सोलापूरला गेल्या पाच वर्षांपासून स्थानिक पालकमंत्री नाही. विद्यमान भाजपाचे पालकमंत्री सोलापूर विकासासाठी प्रयत्न करतात पण सोलापूरच्या विकासासाठी खूपच मोठ्या राजकीय इच्छाशक्तीची गरज असून ती केवळ आपल्याकडेच असल्याचे दिसून येते. सोलापूरकरांना खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असल्यास देवाभाऊ आपण सोलापूरचे पालकत्व स्वीकारावे ही विनंती सोलापूरकर करीत आहेत. आपल्यासारखा संवेदनशील आणि कार्यक्षम मुख्यमंत्री सोलापूरकरांचे पालकत्व नक्की स्वीकारेल यात शंका नाही.

### किमान एक तरी आयटी उद्योग सोलापुरात आणावाच...

सोलापूरचे शिक्षित युवक-युवती रोजगारासाठी पुणे-मुंबईकडे धावत आहेत. सोलापुरात एखादा जरी आयटी उद्योग आला तर निश्चितच सोलापूरचे मायग्रेशन थांबणार आहे. पुण्यातील हिंजवडी येथून आयटी उद्योग बाहेर जात असल्याची चर्चा आहे. त्यातील एखादा जरी मोठा आयटी उद्योग सोलापुरात आणला तर सोलापूरची युवाशक्ती सोलापूर सोडून जाणार नाही. मुंबई आणि पुण्यातील मेट्रोसह अनेक विकासकामांना कोट्यवधीचा निधी मिळतो, पण विकासाची आस लावून बसलेल्या सोलापूरकरांच्या नशिबी मात्र निराशाच का? असा सवाल सोलापूरकर विचारत आहेत. देवाभाऊ आता तूम्हीच सोलापरकरांचे वाली.



# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सहभाग नोंदवून गावे 'आत्मनिर्भर' करावीत

- **पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आवाहन**
- **२०२५-२६ मध्ये आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार**
- **यंदा आषाढी वारीत गुणवत्तापूर्वक सेवा सुविधा**
- **आजपासून स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामविकास विभागाने या वर्षापासून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी तसेच नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन गावे आत्मनिर्भर करावीत, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण प्रसंगी पालकमंत्री गोरे बोलत होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले की, सोलापूरच्या सर्वसामान्य नागरिक, उद्योजक, व्यापारी आणि लोकप्रतिनिधींच्या विमानसेवेच्या दीर्घकालीन मागणीला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये उडान योजनेअंतर्गत व्हायाबिलिटी गॅप फडिंगची तरतुद करुन सोलापूर-पुणे-मुंबई विमानसेवा सुरु करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. हा निर्णय सोलापूरच्या औद्योगिक, व्यापारी आणि पर्यटन सेवा क्षेत्राला नवी दिशा देणारा आहे.

तसेच ग्रामविकास विभागाच्या वतीने रक्षाबंधनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्ह्यात उमेद अंतर्गत १४ कोटी रुपये थेट महिला बचत गटांच्या बँक खात्यावर वितरित करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन जिल्ह्यात मोठया प्रमाणावर लखपती दीदी निर्माण होतील. श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी, अरण तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी १५० कोटींच्या विकास आराखड्याला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर यांचे भव्य स्मारक उभारणीसाठी शासनाची कृष्ण तलावाची जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे, अशी माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली. पंढरपूर शहरामध्ये आषाढी वारीच्या अनुषंगाने स्वच्छतेचे नवीन आयाम निश्चित केले. त्याच धर्तीवर स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर हे अभियान आजपासून एक वर्षासाठी घोषीत करीत आहे. या अभियानामध्ये सर्व घटकांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा. तसेच सोलापूर शहराच्या सन २०५७ पर्यंतच्या पाणी गरजांचा विचार करून महाराष्ट्र राज्य नगरोत्थान योजनेअंतर्गत 'सोलापूर सिटी वॉटर सप्लाय स्कीमला' शासनाने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. ह्या प्रकल्पातून सोलापूर शहरातील नागरिकांना सातत्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. शहरातील सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्गीकरण, संकलन आणि अंतिम विल्हेवाट सुनिश्चित केले जाणार आहे, असे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वासाठी घरे हे स्वप्न साकारण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाकडे विशेष पाठपुरावा करुन राज्यासाठी ऐतिहासिक ३० लक्ष घरे मंजूर करून घेतली व यामध्ये सोलापूर जिल्हयाला ५० हजार घरकुले मंजूर आहेत. तसेच सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेसाठी एकूण ९३५ कोटी निधी मंजूर झाला असून या निधीच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकासकामे हाती घेण्यात येत असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजन समिती कटिबद्ध असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान क्रांतिकारक व स्वातंत्र्य सेनानी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांना अभिवादन केले. सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सेनानी यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पूर्ण होऊ शकत नसल्याचे सांगून सन १९३० मध्ये सोलापूर ने चार दिवस स्वातंत्र्य उपभोगले होते याची माहिती दिली. तसेच अनेक ज्ञात अज्ञात शूरवीरांचे बलिदान हे सोलापूरच्या स्वातंत्र्यलढ्याचे तेजस्वी प्रतीक असून हा इतिहास आजही सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.

### ऑगस्टअखेर ५० जागांवर अनुकंपा भरती होणार : जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जुलै -**

जिल्हा परीषदेतील विविध ११ संवर्गातील २५७ उमेदवारांपैकी १२४ जणांची अनुकंपा भरती पारदर्शक व समुपदेशनाने यशस्वी केली. त्यानंतर ऑगस्ट महिनाअखेर उर्वरीत ५० जागांची भरती करण्यात येणार असल्याची माहीती जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम व उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी अनुकंपा भरती पारदर्शक व समुपदेशनाने करण्यासाठी नियोजनबध्द यंत्रणा राबविली आहे. पाच वर्षात रेकॉर्डब्रेक १२४ उमेदवारांची विविध संवर्गात भरती करताना कोणावरही अन्याय होणार नाही, याची दक्षता घेतली. शिवाय भरतीसाठी होणारी आर्थिक उलाढालीलाही ब्रेक लावला. त्यामुळे अनुकंपा जागेवर हक्क असणार्या उमेदवारांना विनंती व सोईनुसार नोकरी मिळाल्याने उमेदवारांमधून आनंद व समाधान व्यक्त करण्यात येत आले. त्यानंतर १५० दिवस कार्यक्रमांतर्गत अनुकंपा भरती प्रक्रीया राबविण्यात येणार आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या

# १ हजार ३४८ घरकुलांचे आज वितरण

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दहिटणेतील १हजार१२८ तर शेळगीतील २२० घरकुलांचे वितरण**


**असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या हक्काच्या घरांची होणार स्वप्नपूर्ती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सोलापूर जिल्ह्यातील दहिटणे आणि शेळगी येथे उभारण्यात येत असलेल्या गृहप्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील एकूण १,३४८ लाभार्थ्यांना घरकुलांचे वितरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवार, १७ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उत्तर सोलापूरमधील राष्ट्र तेज अटल गृहप्रकल्प, दहिटणे येथे आयोजित करण्यात आला आहे.



देशातील प्रत्येक बेघर कुटुंबाला हक्काचा निवारा मिळवून देऊन त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे या उद्दिष्टावर आधारित केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राबविण्यात आलेल्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील सदनिका वितरण कार्यक्रमाला ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेतील सार्वजनिक-खाजगी भागीदारी मध्ये परवडणाऱ्या दरातील गृह बांधणी या घटकांतर्गत असंघटित कामगारांसाठी सोलापूर जिल्ह्यातील दहिटणे येथील राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेमध्ये ५० इमारतींतून ३२७ चौ फुटांच्या १२०० स्वयंपूर्ण सदनिका उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या गृहप्रकल्पांतर्गत आतापर्यंत ११२८ सदनिकांचे काम पूर्ण झाले आहे. तसेच सोलापूर महानगर पालिकेच्या हद्दीतील शेळगी येथील श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी या गृहप्रकल्पांतर्गत ८ इमारतींची उभारणी करण्यात येत आहे यामध्ये एकूण २५२ सदनिका अत्यल्प उत्पन्न गटासाठी उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापैकी २२० सदनिकांचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले आहे.





**सीईओ जयस्वाल यांच्याकडून प्रकल्पाचे नियोजन**

हा प्रकल्प राबविण्यात येत असतांना आलेल्या अडचणींवर मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी या प्रकल्पाचे नियोजन सुकर केले आहे. नागरिकांचे जीवनमान सुखकर होण्याच्या दृष्टीने या प्रकल्पांतर्गत सामुदायिक सभागृह, अंगणवाडी, सौरउर्जेवर चालणारे दिवे, मुलांसाठी खेळण्याचे मैदान, बाग व त्यामध्ये व्यायामाकरिता आवश्यक उपकरणे, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा सुविधांची उभारणी करण्यात आली आहे.

### असंघटित कामगारांच्या हक्काच्या घरांची स्वप्नपूर्ती

सोलापूर जिल्ह्यातील राबविण्यात येणारा हा प्रकल्प म्हणजे असंघटित क्षेत्रातील कामगारांकरिता हक्काच्या घरांची स्वप्नपूर्ती करणारा प्रकल्प ठरतो. सोलापूर जिल्ह्यातील हे दोन्ही प्रकल्प हरित पट्ट्यामध्ये गृहप्रकल्प राबविण्यात येत असल्याने जमीन स्वस्त दरात उपलब्ध झाली आहे. यामुळे लाभार्थी सदनिका धारकास रु. १ लाख प्रती सदनिकेच्या किंमतीमध्ये बचत झाली आहे. असंघटित क्षेत्रातील ८११ बांधकाम मजुरांना कामगार विभागामार्फत रु. २ लाखांचे अतिरिक्त अनुदान प्राप्त झाले आहे. राज्य शासनाने नगरोत्थान योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा कामांसाठी म्हाडाकडे जबाबदारी सोपविली यामुळे गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा या दोन्ही बाबी म्हाडामार्फतच राबविण्यात आल्या.

**गृहप्रकल्पांच्या आवारात वृक्ष लागवड**

या प्रकल्पातील लाभार्थ्यांना मुद्रांक शुल्क खर्च केवळ रु. १००० आकारण्यात येणार आहे. तसेच गृहकर्जाचा मासिक हप्ता हा सध्या राहत असलेल्या घर भाडे एवढाच असणार आहे. सदर प्रकल्पास नगरोत्थान महाभियानंतर्गत राज्य शासनाकडून मंजूर झालेल्या रु ३३.०८ कोटींच्या निधीतून रस्ते, विकास, ड्रेनेज व पाणी पुरवठा पाईपलाइन सारख्या सुविधांचे नियोजन केले आहे. तसेच म्हाडातर्फे राबविण्यात येणाऱ्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत दहिटणे व शेळगी या दोन्ही गृहप्रकल्पांच्या आवारात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**कर्तव्यदक्ष अधिकारी, कर्मचारी, अवयवदाता, स्वयंसेविका, विद्यार्थी व खेळाडूंचा सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात शुक्रवारी करण्यात आले. यावेळी शासनाच्या विविध विभागाचे पुरस्कार वितरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य राखीव दलाच्या समादेशक डॉ.दिपाली काळे, केगाव पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजयकुमार चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल सहायक पोलीस आयुक्त राजन माने, विशेष सेवा पदकाबद्दल पोलीस उपअधिक्षक संकेत देवळेकर, शौर्यपदकाबद्दल माढ्याचे सहायक पोलीस निरिक्षक नेताजी बंडगर, यंत्र संचालक संतोष देशपांडे, विशेष सेवा पदकाबद्दल बिनतारी संदेशचे हवालदार औदुंबर टरले यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



१०० दिवसांच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमात पुणे विभागातून निवडण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. ते अधिकारी व कर्मचारी : विजया पांगारकर (उपविभागीय अधिकारी कार्यालय माळशिरस तृतीय), डॉ. अविनाश खांडेकर, माढा (तालुका वैद्यकीय अधिकारी गटात प्रथम), डॉ. प्रियंका शिंदे, माळशिरस (तालुका वैद्यकीय अधिकारी गटात द्वितीय), देवराज चव्हाण, करमाळा (तालुका कृषी अधिकारी गटात द्वितीय), वनपरिक्षेत्र अधिकारी सोलापूर रोहितकुमार गांगर्डे वनपरिक्षेत्र अधिकारी गटात तृतीय). प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण, वैराग (एकात्मिक बाल विकास सेवा योजना गटात तृतीय), सोलापूर शहर पश्चिम दिपक ढेपे (बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) गटात तृतीय), सोलापूर शहर पुर्व विजय खोमणे (बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) गटात द्वितीय)

**यांचा झाला सन्मान**

**अवयवदाते :** ओंकार महिंद्रकर, अशोक रघुनाथ महिंद्रकर, कृष्णहरी बोम्मा, गुरूम सत्यनारायण, सपना निलेश चक्रे. **पुरस्कार :** सुमिता राजगुरू (आशा स्वयंसेविका), ज्योती चंद्रकांत विडेकर (आशा गट प्रवर्तक). **खेळाडू :** सेंट जोसेफ स्कूल : राजवर्धन जाधव व हर्षदा जाधव (विभागीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुले वयोगटातील जलतरणतील ४ बाय १०० मिडले रिले, तृतीय). **राज्य गुणवत्ता विद्यार्थी :** आदर्श पब्लिक स्कूल अकोलगांव ता.कुर्डूवाडी : काव्या निलेश देशमुख ( शिष्यवृत्ती परीक्षा ५ वीत ग्रामीणमध्ये ९५.९७% गुण) सुयश विद्यालय, बार्शी : साक्षी दिनेश हाके (शिष्यवृत्ती परीक्षा ८ वी मध्ये शहरात ९५.३३% )

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## रोखठोक

दिनेश गुणे

# जगा आणि जगू द्या...

शांततामय आणि सुरक्षित जगणे हा माणसाचा मूलभूत हक्क आहे आणि जनहिताची जपणूक करणाऱ्या यंत्रणेवर तो हक्क जपण्याची जबाबदारी आहे. माणसाच्या सुरक्षित जगण्याच्या हक्काआड येणारी कोणतीही गोष्ट म्हणजे त्याच्या सुरक्षिततेसमोरील संकट समजून त्या गोष्टी दूर सारण्याला साहजिकच महत्त्व प्राप्त झाले, तेव्हापासून माणसाच्या हक्कास सर्वोच्च प्राधान्य मिळून त्यामध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा पुरता बंदोबस्त करण्यावर भर दिला जाऊ लागला. माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांकडून हे अपेक्षितच असले, तरी यामुळेच माणसाच्या हक्कापलीकडे कोणत्याही बाबी महत्त्वाच्या नाहीत व आपल्या हक्कास सर्वोच्च प्राधान्य असलेच पाहिजे अशी काहीशी मानसिकता रूढ होऊ लागल्याने, असाच हक्क नैसर्गिकपणे प्राप्त झालेल्यांच्या अस्तित्वाचा प्रश्नही आता उभा राहताना दिसत आहे. या जगातील अनेक मानवेतर जीव एक तर काळाच्या ओघात नामशेष झाले आहेत आणि हजारो जीव अस्तित्वाच्या अखेरच्या घटका मोजत वंश टिकविण्याच्या धडपडीत हार पत्करून नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे, असा संघर्ष करणाऱ्यांच्या नैसर्गिक जगण्याच्या हक्कांची जपणूक करण्याबाबत, आपल्या हक्काची जपणूक करण्यास सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या माणसाची जबाबदारी कोणती याचा लेखाजोखा मांडावयास हवा. कारण, यापैकी अनेक जीव नामशेष होण्यामागे किंवा अस्तित्वाच्या उंबरठ्यावर उभे राहण्यामागे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे माणूसही जबाबदार आहे, याची जाणीव होण्याची गरज अधोरेखित झाली आहे. राजधानी दिल्लीमध्ये भटक्या कुत्र्यांचा, म्हणजे ज्या कुत्र्यांना माणसाने पाळलेले नाही, अशा रस्त्यावर भटकून आपली गुजराण करणाऱ्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आणि त्यांच्या आक्रमकपणामुळे माणसांचा सुरक्षित जगण्याच्या हक्कालाच धक्का पोहोचू लागला. अशा, भटक्या कुत्र्यांच्या झुंडी माणसांवर हल्ले करून चावा घेत असल्याने आरोग्याच्या समस्या आणि धोके बळावले आणि त्याच्या झळा थेट न्यायालयांपर्यंत पोहोचल्याने अशा कुत्र्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी न्यायालयानेच पुढाकार घेतला. देशात ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा होत असताना, या सोहळ्याच्या काही दिवस अगोदर, स्वच्छंदपणे भटकणाऱ्या कुत्र्यांना त्यांच्या अधिवासातून हुसकावून बंदिस्त अवस्थेत डांबण्याचा व कुत्र्यांपासून संरक्षण देऊन माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्याचा महत्त्वपूर्ण मुद्दा न्यायालयाच्या निर्णयामुळे चर्चेच्या ऐरणीवर आला. या कुत्र्यांचे स्वातंत्र्य आता संपुष्टात येणार आहेच, पण त्यांच्या जगण्याच्या नैसर्गिक हक्काचा मुद्दाही या निमित्ताने समोर येऊ पाहात आहे. कुत्रा हा जंगलात वावरणारा प्राणी नाही. आणि भटके, रस्त्यावरचे असे ज्यांना म्हटले जाते, ते कुत्रेदेखील माणसांच्या सहवासातच वावरत असतात. त्यांच्या गळ्यात कोणा माणसाची मालकी मिरविणारा पट्टा नसला, तरी कोणी ना कोणी त्यांच्या जगण्याचा हक्क जपण्याची माणुसकी दाखवत असतो. आता अशा तीन लाख कुत्र्यांना माणसांच्या सहवासातील त्यांच्या परंपरागत अधिवासातून हुसकावून लावून त्यांच्यासाठी निवारागृहे उभारण्याचा सक्त आदेश न्यायालयाने दिल्याने, सुरक्षित जगण्याच्या माणसाच्या हक्काची जपणूक होणार असून त्या हक्कास बाधा आणणारा हा उपद्रव आता दूर होणार आहे. कुत्रा चावण्याच्या घटनांमुळे माणसाचा जीव धोक्यात येतो हे खरेच आहे. देशाच्या सर्व राज्यांतील शहरे आणि गावांमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव आणि त्याच्या चावण्यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. वर्षागणिक लाखो नागरिकांना कुत्रे चावण्याच्या घटनांचे गंभीर परिणाम भोगावे लागले आहेत, हेही खरे आहे. त्यामुळे, केवळ राजधानी दिल्लीतील तीन लाख कुत्र्यांचा कायमचा बंदोबस्त केल्याने देशातील ही समस्या सुटणारी नाही. देशभरातील लाखो कुत्री ही माणसाच्या सुरक्षित जगण्याच्या हक्कांपुढील आव्हाने ठरत असतील आणि त्यांच्या दहशतीपुढे माणसाचे जगणे हतबल होत असेल, तर माणसाच्या जगण्यास सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या यंत्रणांना भटक्या कुत्र्यांचा सार्वत्रिक बंदोबस्त करावा लागेल हेही खरे आहे. तरीही, एक मुद्दा उरतोच. कुत्र्यांचा बंदोबस्त केल्यानंतर माणसाच्या सुरक्षित जगण्याच्या हक्कापुढील सर्व अडथळे कायमचे संपुष्टात येऊन जगणे अबाधित होईलच, याची खात्री कोण देणार? राजधानी दिल्लीत रस्तोरस्ती कुत्र्यांच्या मोकाट टोळ्या हिंडत असल्याने, त्यांच्या दहशतीमुळे माकडांना जमिनीवर उतरण्याची हिंमत होत नाही, असे सांगितले जाते. अन्यथा, माकडांचा उपद्रव हीदेखील दिल्लीकरांच्या सुरक्षिततेसमोरील मोठी समस्याच आहे. कुत्र्यांचा बंदोबस्त करून त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासापासून हुसकावून लावले, तर अन्यथा झाडांवर वावरणारी माकडे थेट रस्त्यावर येतील आणि कुत्र्यांच्या उपद्रवामुळे संकटात येणाऱ्या सुरक्षित जगण्याच्या हक्कापुढे माकडांच्या उपद्रवाचे नवे आव्हान उभे राहील. प्राणिप्रेमींनी याकडे लक्ष वेधले ते योग्यच झाले. कारण, केवळ माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्यासाठी जेव्हा जेव्हा अन्यांच्या स्वातंत्र्यावर किंवा जगण्याच्या हक्कासमोर संकट उभे ठाकते, तेव्हा माणुसकी जागी होतच असते. न्यायालयाच्या निर्णयामुळे दिल्लीची भटक्या कुत्र्यांची समस्या सुटली, तर माकडांच्या उपद्रवाची नवी समस्या त्यांच्यासमोर उभी राहील आणि त्यासाठी पुन्हा, माणसांच्या सुरक्षित जगण्याचा हक्क जपण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांना नवा उपाय शोधावा लागेल.



या सृष्टीमध्ये, अगदी हत्तीपासून सूक्ष्म कीटकापर्यंत प्रत्येक सजीव हा नैसर्गिक रचनेनुसार तयार झालेल्या पर्यावरणीय साखळीचा भाग आहे. त्यांना जन्मतः मिळालेल्या जगण्याच्या हक्कास हिरावून घेण्याचा अधिकार कोणासही नाही, असा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे त्यांचा नैसर्गिक हक्क हिरावून घेणे हे नैतिकदृष्ट्या चुकीचेच आहे. अन्य प्राण्यांची शिकार करणे हा सिंहाच्या जगण्याचा मार्ग आणि हक्कदेखील आहे. पण केवळ हौसेपोटी सिंहाची शिकार करणे हा त्याच्या जगण्याच्या हक्काचा भंग ठरतो. अशाच कृतीपायी अनेक प्राणी नामशेष होत गेले आणि अनेक प्राणी नामशेष होण्याच्या वाटेवर आहेत. लोकवस्तीत झपाट्याने वाढ होत असताना, माणसांना आवश्यक असलेल्या निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रचंड प्रमाणात जंगलतोड सुरू झाली, मानवी वस्त्या विस्तारत गेल्या आणि वन्य प्राण्यांच्या हक्काचे नैसर्गिक अधिवास संकुचित होत गेले. औद्योगीकरण, पायाभूत सुविधांची उभारणी, उद्योगांमुळे निर्माण होणारे प्रदूषण अशा अनेक मानवनिर्मित कारणांमुळे अन्य प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होऊ लागले. गंगा नदीतील पाण्याच्या प्रदूषणामुळे आणि धरणांमुळे डॉल्फीनची संख्या घटली, शिकार व नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे वाघ-सिंहांची संख्या घटत चालली, प्लॅस्टिकच्या कचऱ्यामुळे समुद्री कासवांच्या आणि माशांच्या काही प्रजाती अस्तित्वाच्या कडेलोटावर उभ्या राहिल्या, चिमण्या तर केवळ गोष्टीत उरतील अशी चिंता आता व्यक्त होऊ लागलीच आहे आणि अशा प्रकारे हजारो सजीव नामशेष होऊन केवळ आठवणीतच उरले असल्याने जाणिवा जाग्या असलेल्यांच्या जगात चिंतेचे सूरही उमटू लागले आहेत.

भारतीय संस्कृती प्रत्येक जीवाच्या जगण्याचा हक्क मान्य करते आणि प्रत्येक जीवाच्या जगण्याच्या हक्काचा आदरही करते. सर्वे भूतानि सुखिनः भवन्तु ही भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. अन्न, पाणी आणि अधिवास किंवा आश्रय ही माणसाप्रमाणेच प्रत्येक जीवाची गरज आहे आणि तो त्याचा हक्कदेखील आहे. याची जाणीव असलेल्या काही समाजघटकांत, प्राणी व वृक्षसंवर्धन हा जीवनशैलीचाच एक भागदेखील झालेला दिसतो. त्यामुळे, प्राण्याच्या जगण्याचा हक्क हा केवळ कायद्याच्या चौकटीतील विषय नाही तर माणसाच्या जगण्याचा हक्क जपण्याच्या नैतिक जबाबदारीप्रमाणेच, या जगण्याचा हक्क जपणे हीदेखील माणसांची नैतिक जबाबदारीच ठरते. जगण्यासाठी संघर्ष करण्याच्या आणि अस्तित्व टिकविण्याच्या संघर्षाची वेळ त्यांच्यावर केवळ माणसांच्या कृतीमुळे, जीवनशैलीमुळे आणि जगण्याच्या हक्कास प्राधान्य देण्याच्या मानसिकतेमुळेच ओळवलेली आहे, ही बाब अमान्य करता येणार नाही. जगण्याचा हक्क ही केवळ माणसाची मक्तेदारी नाही आणि असा हक्क केवळ माणसापुरता मर्यादित नाही. सृष्टीमध्ये जन्माला येणारा आणि अस्तित्वात असलेल्या प्रत्येक जीवाचे जगणे निसर्गाने अधिकृत केलेले असते, त्यामुळे सृष्टीचा स्वामी समजून इतरांच्या हक्कांवर गदा आणण्याचा हक्कदेखील कोणासही नाही, हे माहीत असूनही, जंगलतोड, नद्या-समुद्रांचे प्रदूषण, शिकार आणि अधिवास नष्ट करण्याच्या नादात त्यांच्या अस्तित्वावर कुरघोडी होत नाही ना, याची जाणीव जागविणेही गरजेचे आहे. कारण, कोणतीही प्रजाती नष्ट होणे किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर असणे ही केवळ यादी लांबवून चिंता करण्यापुरती मर्यादित बाब नाही, तर ती निसर्गाच्या पर्यावरणीय संतुलनासमोरील सर्वाधिक गंभीर अशी धोक्याची घंटादेखील ठरणार आहे. वन्यजीव संरक्षण कायदे, कृत्रिम अधिवासांचे संवर्धन, अभयारण्ये, मोहिमा यांसाठी केवळ सरकारवर विसंबून राहून चालणार नाही. माणसाच्या जगण्याच्या हक्काची जपणूक करताना, मानवेतर सजीवांच्या हक्काची जबाबदारीही सरकारवर असेल, तर त्याला हातभार लावण्याची जबाबदारी माणसाला उचलावीच लागेल. सर्वे भवन्तु सुखिनः हा केवळ श्लोक नाही किंवा परंपरेची शिकवणही नाही. तो विचार केवळ श्लोकात राहून चालणार नाही, तर तो कृतीत आणावा लागेल. प्राण्यांचा हक्क हा केवळ दया दाखविण्याचा विषय नाही, तर त्यांच्या नैसर्गिक हक्कास न्याय देण्याचा विषय आहे. आपण पृथ्वीचे मालक नाही, तर पृथ्वीवरच्या अन्य सजीवांप्रमाणेच इथले रहिवासी आहोत, पण आता तिचा ताबा घेण्याची मानसिकता बळावत चालली आहे. इतर जीवांना हाकलून हुसकावून लावण्याचा विचार करताना, ही बाब लक्षात ठेवावी लागेल, कारण प्राण्यांच्या जगण्याचा हक्क जपणे हा काही त्यांच्यावर उपकार करण्याचा विषय नाही. तो त्यांच्या जन्मसिद्ध हक्काचा सन्मान आहे. त्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवासाचा आणि सुरक्षित जगण्याचा हक्क परत मिळवून देणे, त्यांच्या प्रजातींचे संरक्षण करणे आणि निसर्गाचे संतुलन टिकविणे ही जबाबदारी माणसानेच घेतली पाहिजे. कायदे, मोहिमा, अभयारण्ये ही साधने आहेत, पण त्यांचा परिणाम मात्र, माणसाच्या सजगतेवर आणि संवेदनशीलतेवरच अवलंबून असणार आहे. आज ती सजगता दाखविली नाही, तर अनेक प्राणी केवळ गोष्टीत उरतील, किंवा चित्राच्या रूपाने दिसतील.

दिल्लीतील कुत्र्यांच्या उपद्रवाच्या निमित्ताने माणूस आणि सुरक्षित राहण्याच्या अपेक्षेने माणसाकडे पाहणारे प्राणी यांच्यातील संघर्षाच्या काही कहाण्या याआधी जगभर घडलेल्या दिसतात. कोविड महामारीच्या काळात, ब्राझीलमधील एका निर्मनुष्य बेटावर लाखो मांजरांना सोडून देण्यात आले. माणसाच्या सहवासात राहिलेली ही लाखो मांजरे, माणसाच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर येताच काही दिवसांतच भटकी, बेवारस ठरून रस्त्यावर आली. आता या निर्मनुष्य बेटावरची लाखो मांजरे पाहण्यासाठी पर्यटकांची रीघ लागते. हे बेट पूर्वी एकाकी, निर्मनुष्य होते. बऱ्याच वर्षांपूर्वी एका कुटुंबाने आपली मांजरे या बेटावर सोडून दिली, आणि मांजरांनी तेथील जंगलात वस्ती करून आपल्या जगण्याचा मार्ग शोधला. कोविडच्या काळात, आर्थिक अडचणी व आरोग्याच्या आव्हानास घाबरून अनेकांनी याचेच अनुकरण करत आपली मांजरेही या बेटावर सोडून दिली आणि मांजरांची संख्या प्रचंड वाढल्याने त्यांना तेथे उपलब्ध असलेल्या अन्नाचा तुटवडा भासू लागला. त्यांच्यात जगण्याचा संघर्ष सुरू झाला. थायलंडमध्येही अशाच प्रकारे हजारो मांजरे बेटावर सोडून दिली आणि त्यांची उपासमार होऊ लागली. सायप्रसमध्ये भूमध्य समुद्रातील एका बेटावर विषाणू संसर्गामुळे तीन लाख मांजरे मृत्यू पावली. कोविड महामारीचा परिणाम मानवी जीवनावर झालाच, पण त्याचे परिणाम पाळीव प्राण्यांनाही भोगावे लागले व त्यांच्या जगण्याच्या हक्काची अशी परवड झाली. अचानक कोसळलेल्या या संकटामुळे त्यांनी निर्मनुष्य बेटांवरील जीवसृष्टीचा संहार सुरू केला आणि तेथील पर्यावरणाचे संतुलन बिघडले, हे या कहाण्यांचे दुसरे उपकथानक ठरले.

माणसांच्या जगण्यासाठी गरजेच्या असलेल्या नैसर्गिक संसाधनांवर अन्य प्राण्यांचाही हक्क असतो, पण आता त्या हक्कच्या सर्वांत वरचे प्राधान्य माणसाने स्वत:साठी बळकावले आहे. भविष्यात पाण्यासाठी महायुद्धे भडकतील, असा इशारा काही दशकांपूर्वी केव्हातरी दिला गेला, तेव्हा त्याची नक्कीच खिल्ली उडविली गेली असेल. कारण, या इशाऱ्यानंतरही पाण्याचे मोल जाणण्यात माणूस कमीच पडला आणि पाण्याच्या बेसुमार उधळपट्टीचे परिणाम दिसू लागल्यावर त्याला भयचकिताची जाणीव छळू लागली. आता त्याची फळे भोगण्याची वेळ आली आहे. पाण्यासाठीच्या संघर्षाचे भविष्य माणसाच्या उंबरठ्यावर येऊन उभे ठाकले आहे आणि पाण्यासाठीच्या संघर्षाच्या कहाण्या संकटाचे संकेतही देऊ लागल्या आहेत. सुमारे पाच वर्षांपूर्वी, मध्य प्रदेशातील एका जंगलात, पाणी न मिळाल्याने तहानेने तडफडणाऱ्या १५ माकडांचा उष्माघाताने मृत्यू झाला, ही त्या भविष्यभयाची जाणीव करून देणारीच घटना होती. पण हे मृत्यू केवळ तहानेने तडफडल्यामुळे झाले नव्हते, तर पाण्यासाठी माकडांच्या टोळ्यांमध्ये झालेल्या संघर्षात वरचढ न ठरल्यामुळे झालेले बळी ठरले. माकडांच्या एका टोळीने दुसऱ्या टोळीस पाणवठ्यावर येण्यास मज्जाव केल्याने तहानलेल्या टोळीतील काहींची अखेर झाली, हा पाण्याच्या हक्कासाठी वर्चस्ववादी टोळीने केलेला शक्तिप्रयोगच होता. याच दरम्यान, दक्षिण ऑस्ट्रेलियामध्ये तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळामुळे हजारो उंटांना हेलिकॉप्टरमधून गोळ्या घालून ठार मारण्याची मोहीम राबविली गेली होती. पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या उंटांच्या टोळ्या जास्त पाणी पितात, त्यामुळे पाण्याचे साठे संपत असून मानवी वस्त्यांमध्ये पाणी तुटवडा होत असल्याचे कारण देत हजारो उंट मारले गेले, काही जंगली घोड्यांनाही गोळ्या घातल्या गेल्या. याच दरम्यान तेथील जंगलांमध्ये लागलेल्या भीषण वणव्यांत होरपळलेल्या हजारो प्राण्यांना वाचविण्यासाठी काही मानवतेचे झरे जिवंत झाले होते. त्यांनी यासाठी जिवाचे रान केले असताना, दुसरीकडे मात्र, स्वतःच्या हाताने उंटांना संपविण्याच्या सरकारी मोहिमा जोर धरत होत्या. नैसर्गिक संसाधनांवर प्राधान्याने हक्क प्रस्थापित करण्यासाठी बळाचा वापर करून अन्यांच्या हक्कांची पायमल्ली करण्याच्या मानसिकतेचाच हा नमुना म्हणावा लागेल. ▮

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### शिक्षण अनुरूप रोजगार मिळण्याची गरज

आपल्या राज्यात तिसऱ्या भाषेवरील वादाचे घोंगडे भिजत ठेवण्यापेक्षा यासंदर्भात दुसऱ्या एखाद्या मार्गाचा विचार का केला जात नाही. आज बेरोजगार आणि रोजगाराची संधी यात प्रचंड मोठी तफावत असल्याची पाहायला मिळते. महापालिकेतील चार-पाच लिपिक पदांसाठी भरतीची जाहिरात प्रसिद्ध होताच, त्यासाठी लाखाच्या संख्येने अर्ज पुढे असतात. आणि त्यातही लिपिक पदासाठी अर्ज करणारा बीए, बीकॉम, बी. एससी, एम. ए., एम. कॉम, एम. एससी. असतो. एवढेच नव्हे तर इंजिनीअरदेखील असतो. त्यामुळे यासाठीचे निकष काय आहेत. इतिहास विषय घेऊन बीए झालेली व्यक्ती एखाद्या बँकेत नोकरी करू शकते का? मग तुम्ही घेतलेल्या शिक्षणाचे मूल्य काय, यावर कोणी विचार करणारे आहे का? त्रिभाषा सूत्राचा तामिळनाडू राज्याने कडाडून विरोध केला आहे. पण हिंदी भाषेला विरोध त्यांचा आताचा नाही आहे. साधारणपणे १९३०-४० पासून तामिळनाडू राज्याची हीच भूमिका राहिली आहे. या राज्याने द्विभाषा सूत्राचा पुरस्कार केला आहे. तामिळनाडू राज्याला फक्त तामिळ आणि दुसरी भाषा इंग्रजी या दोनच भाषा पाहिजे आहेत.

मातृभाषेत शिक्षण घेणे विद्यार्थ्यांना सुलभ जाईल आणि इंग्रजी ही भाषा जगाशी संवाद साधणारी आहे. शिवाय विविध संधींचे दरवाजे उघडणारी आहे. असे तामिळनाडू राज्याचे आधीपासूचे म्हणणे आहे. भाषा ही आत्मसात केली जाते. पिढ्यानपिढ्या मुंबईत राहणारे अमराठी भाषिक अनेक मराठी माणसांपेक्षा चांगली मराठी बोलतात, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. याउलट भावी पिढीला शिस्तप्रिय जीवनाचे महत्त्व पटवून देणारे शिक्षण गरजेचे आहे. त्यासाठी लष्करी प्रशिक्षणाचा विचार केला जाऊ शकतो. आत्मनिर्भर भारतचा नुसता उदो उदो करून उपयोग नाही. आत्मनिर्भर भारतीय होणेही तेवढेच गरजेचे आहे. शिक्षणारूप रोजगार मिळण्याची शाश्वती मिळाली पाहिजे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर भारत तयार करण्याचे द्रष्टेपण माजी संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांनी दाखविले होते. तसे द्रष्टेपण सर्वच क्षेत्रात, पण प्रामुख्याने शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रांमध्ये गरजेचे आहे. भाषेबद्दल वादाची राळ उडवून हाती काही लागणार नाही. महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सर्वसामान्यांच्या डोळ्यात धूळफेक करणे, एवढेच कारण तूर्तास तरी दिसत आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### शिक्षकांवरील अतिरिक्त भार केव्हा कमी होणार?

सर्व शाळांमध्ये अलिकडेच राज्यात जाहीर केलेल्या राज्य शासनाच्या निर्णयानुसार शाळांमधील शिपाई पदे कालबाह्य करण्यात येणार असून, या पदाची कंत्राटी पद्धतीने भरती होणार आहे. या पावला मागील आर्थिक विवंचना किंवा तात्कालिक नियोजन समजण्याजोगे असले, तरी यामुळे निर्माण होणारा ताण पुन्हा एकदा शिक्षकांच्या खांद्यावर टाकला जाणार आहे. ही चिंताजनक बाब ठरते. आज शिक्षकांच्या हातात ज्ञानाचा खडू कमी आणि प्रशासनाचा झाडू अधिक दिसतो. ज्ञानदायी अध्यापनाऐवजी शिक्षकांची ऊर्जा पोषण आहार यादी, स्वच्छतेचे फोटो अपलोड करणे, वृक्ष लागवडीचे फोटो अपलोड करणे, विविध पोर्टल वरील माहिती भरणे आणि सर्वेक्षणामध्ये खर्च होत आहे. हे केवळ मानसिक थकवा आणणारी स्थिती नसून, ही शिक्षणाच्या पायाभूत मूल्यावर घात करणारी व्यवस्था होत चालली आहे. शाळा ही विचारांची आणि संस्कारांची प्रयोगशाळा म्हणून ओळखली जाते. परंतु आजच्या शाळा या डेटा एन्ट्री करणारी केंद्रे झाली आहेत. शिक्षकांच्या वेळेचा वापर प्रशासनासाठी होत आहे. जिथे शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनात मार्गदर्शक, प्रेरणादाता म्हणून उभा राहत असे. आज त्याच शिक्षकांच्या हाती संगणकाचा माणूस आणि विविध ऑनलाईन प्रणालीचे लॉगिन दिसते. शिक्षकाकडून इतक्या गोष्टींची अपेक्षा ठेवली जाते की, त्याच्या मूळ कार्याला म्हणजेच अध्यापनाला दुय्यम स्थान मिळते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विचार केला असता याबाबत न बोललेलं बरं अशीच अवस्था सर्व शाळांमध्ये दिसून येते आहे. शाळा व्यवस्थापन समिती, पालक संघ, माता पालक संघ, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी शिक्षकांच्या अडचणी, कामाचा ताण, त्यांच्यावर असलेल्या जबाबदाऱ्या याचा समतोल अभ्यास केला पाहिजे. शिक्षक जर सशक्त, समर्थ असेल तरच पुढची पिढी सुजाण, विचारशील आणि उत्तरदायित्व मानणारी होऊ शकेल. या खऱ्या परिस्थितीतून योग्य मार्ग काढण्यासाठी काही मूलभूत उपाय योजना तातडीने राबवणे गरजेचे आहे.

शाळांमध्ये शिपाई, लिपिक, सफाई कर्मचारी यांची पदे तातडीने भरली पाहिजेत. प्रशासनाने शिक्षकांवर अतिरिक्त भर टाकू नये. शैक्षणिक कामाची मर्यादा निश्चित केली पाहिजे. शिक्षकांना मानसिक आधार व प्रेरणा मिळेल अशी कार्य संस्कृती निर्माण केली पाहिजे. या साऱ्या उपाययोजनांमध्ये ही गोष्ट सर्वांत महत्त्वाची ठरते की शिक्षकांना पुन्हा एकदा खडू द्यावा . कारण खडू हे केवळ शिकवण्याचे साधन नसून, ते शिक्षकांच्या अस्तित्वाचे प्रतीक आहे. खडू हातात असलेला शिक्षक समाजात विचारांच्या रेषा उमटवतो, तर झाडू हातात असलेला शिक्षक व्यवस्थेच्या धुळीत गाढव होतो. शिक्षकाने विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देण्याची फार प्राचीन अशीच आपली संस्कृती आहे. त्याला मात्र आजची एकंदर प्रशासकीय व शासकीय व्यवस्था पाहता तडा जात आहे. शिक्षकांवर अशैक्षणिक कामाची जबाबदारी अधिक असल्यामुळे अभ्यासापेक्षा बाहेरील कामावर जास्त लक्ष द्यावे लागत आहे. आता शिक्षकाकडे जनगणनेचे काम येईल, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आहेत, निवडणुकीच्या कामांमध्ये त्यांचा हातभार लागेल परंतु एकंदर शाळेचा विचार कोण करणार? आजचा विद्यार्थी ज्ञानापासून वंचित होत आहे याकडे शासन लक्ष देईल का? हा एक चिंतेचा विषय आहे.

**सुनील पुजारी**/सोलापूर

### महाराणा प्रतापांच्या ऐतिहासिक वास्तूंना येणार ऊर्जितावस्था

वरील आशयाची बातमी वाचून एक भारतीय नागरिक म्हणून खूप आनंद झाला. उदयपूर जिल्ह्यातील चावंड या गावात सम्राट महाराणा प्रताप यांची समाधी आहे. या समाधीचा जीर्णोद्धार १९९७ मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी बिहारी वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर आजपर्यंत गेली २८ वर्षे भारत वा राज्य सरकारकडून समाधीस्थळाची देखरेख व जतन करणे यावर काहीच खर्च करण्यात आला नाही. सध्याचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या शासनाने प्रताप सर्किट अभियानांतर्गत महाराणा प्रताप यांच्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रथम २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून पैकी २० कोटी रुपये चावंडांच्या समाधीस्थळासाठी करण्यासाठी आली आहे. चावंड येथील स्थानिक समिती समाधी सांभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठी राज्य सरकार कौतुकास पात्र आहे.

उदयपूर जिल्ह्यातील राजसमंद्रा जिल्ह्यातील कुंभलगड किल्ला हा महाराणा प्रताप यांचे जन्मस्थान आहे. कुंभलगड किल्ल्याची भिंत जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वांत लांब भिंत आहे. पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे या किल्ल्याच्या भिंतीची दुर्दशा झाली आहे.

स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत महाराणा प्रताप यांच्या किल्ल्यांची आणि ऐतिहासिक वास्तूंची स्थिती खालावत चालली आहे. देशात अशा कितीतरी वास्तू आहेत पण त्याकडे पुरातत्त्व विभागाचे आणि सरकारचे लक्षच नाही. म्हणजे इस्लामिक वास्तूंच्या देखरेख व जतनावर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यापेक्षाही महाराणा प्रतापांच्या वास्तूंचे जतन व देखरेख करून ते सुस्थितीत ठेवणे कमी महत्त्वाचे आहे का? हा प्रश्न एक भारतीय नागरिक म्हणून मला पडतो. देशातील किल्ले, गडकोट पूर्वीच्या शासकांची प्रतीके, राजवाडे हे या देशातील धरोहर आहे. पुढच्या पिढीला आपला देदीप्यमान इतिहास दाखवायचा असेल तर यांचे जतन करणे गरजेचे आहे. परंतु याच गोष्टींकडे नेमके दुर्लक्ष केले जाते. सरकारे बदलतात पण मानसिकता बदलत नाही. पण आता सुरुवात झाली आहे हेही नसे थोडके.

**शशिकांत पाध्ये**/वर्धा



### सिग्नल कधी चालू होणार?

सोलापूर शहर आज झपाट्याने वाढत आहे. हे आपल्याला रस्त्यावरील वाहतुकी वरुन लक्षांत येते. शहरात दरवर्षी दोन चाकी व चार चाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.यामुळे हे रस्ते वाहनांसाठी, रस्त्याच्या बाजूने चालणाऱ्या पादचाऱ्यांसाठी अपुरे पडत आहेत.अशा परिस्थितीत वाहनांचे नियम पाळण्यासाठी शासनातर्फे वेगवेगळ्या नवीन नियमांची अंमलबजावणी होत आहे. नियमाचे उल्लंघन केल्यास, नागरिकांना दंडही भरावा लागतो. हे जरी योग्य असले तरी शासनाचे कर्तव्य आहे की, अगोदर शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांचे परिपूर्ण नियोजन व सोयी कराव्यात. मगच कायद्याने होणारे दंड आकारण्यात यावेत. सोलापूर शहरात बऱ्याच चौकात सिग्नल आहेत, पण ते काही ठराविक चौक सोडले तर इतर मात्र कायमस्वरुपी बंदावस्थेतच असतात.काही चौकात तर ट्रॅफिक पोलीस नसतातच. अशा वेळी वाहनांवर नियंत्रण कोण ठेवणार? या मुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते . उदा: सोलापूर शहरातील व्ही.आय. पी.रोड, इ. सावरकर हॉस्पिटल समोरील सिग्नल बसवल्यापासून चालूच करण्यात आलेले नाहीत. या रस्त्यावर स्पीड बेकर देखील नाहीत, तसेच पोलीस देखील नसतात .तरी कृपया नागरिकांच्या सोयीसाठी सिग्नल व वाहतूक पोलिसांची नेमणूक त्वरित करण्यात यावी व होणा-या अपघातापासून नागरिकांचा बचाव करावा ही नम्र विनंती.

**- फैय्याज शेख, सोलापूर.**
मो. ९४२०५४६७५१

# युवराजांचा हट्ट; पक्ष झाला मट्ठ

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

एका राज्यात एक युवराज होता. लहानपणापासून राजवाड्यात त्याच्यासाठी सगळं काही होतं. खेळण्यासाठी हत्ती, गाणी म्हणणारे पोपट, मोत्यांनी भरलेली झोळी. पण एक अडचण अशी होती की युवराजाला कोणत्याही कामाचा, खेळाचा किंवा छंदाचा लवकर कंटाळा यायचा. त्याचं मन लागेना. एक दिवस त्याने जाहीर केलं. "मला अशा फुलांचा हार हवा, जे फक्त विजेच्या कडकडाटात उमलतात." दरबारी गोंधळले, पण युवराजाच्या आनंदासाठी माळी, सैनिक, मंत्री, सगळे पावसात, विजांच्या कडकडाटात जंगलात फिरू लागले. शेवटी अशी फुले सापडली आणि हार तयार झाला, पण तो युवराजाने घालण्याआधीच त्याला नवा हट्ट सुचला. "मला समुद्रातून असा मोती आणा जो सूर्य उगवल्यावर हिरवा दिसेल आणि चंद्र उगवल्यावर लाल." आता झाली ना पंचाईत. मग सगळे जण मोती शोधायला निघाले. महिना गेला. अखेर असा मोती सापडला, तर युवराज म्हणाला, "अरे, मला आता या मोत्यात रस नाही, चला आपण गाईला उडायला शिकवूया!"



आता गाईला कसं उडायला शिकवणार. हे अशक्य होतं. नवनवीन प्रयोग करण्यात आले. पण गाय काही उडेना. या कामात जनताही लागली. पण सर्वांनाच अपयश आले. पण कुणालाही युवराजाला थांबवायची हिंमत नव्हती. कारण राजा प्रत्येक वेळी म्हणायचा "युवराजाचा आनंद म्हणजे राज्याचा आनंद!" काळ जाऊ लागला, राज्याची संपत्ती, वेळ आणि श्रम सगळं या हट्टांवर खर्च होऊ लागलं. एके दिवशी राजा वारला आणि युवराजाची जबाबदारी मंत्री, सैन्य आणि प्रजेवर येऊन पडली. पण युवराजाचा हट्टी स्वभाव काही गेला नाही. एके दिवशी राज्यातील हवामान खात्याने इशारा दिला की दोन महिन्यांत राज्यात पूर येणार आहे. आत्ताच उपाययोजना करायला हवी. मंत्र्यांनी युवराजाला सुचवलं की आपण यावर उपाययोजना करूया. पण युवराज म्हणाला की नको. त्यापेक्षा आपण होड्या बनवूया. तेच आपलं घर, महाल आणि बाजारपेठ. मग आपलं राज्य जे जगातलं पहिलं राज्य असेल जे पाण्यात उभं असेल. अर्थात हा मूर्खपणा होता. पण कुणीही या मूर्खपणाला विरोध केला नाही. कारण राजाची आज्ञा होती की "युवराजाचा आनंद म्हणजे राज्याचा आनंद!" ही आज्ञा पाळण्यात आली आणि पूर आला व संपूर्ण राज्य बुडाले. कुणी म्हणजे कुणीच वाचले नाही.

आजच्या भारतीय राजकारणातही असेच काहीसे चालले आहे. राहुल गांधी या युवराजासाठी प्रत्येक वेळी नवी आंदोलने, नव्या गोष्टी सुरू असतात. कधी भारत जोडो यात्रा, कधी जनेऊधारी ब्राह्मणाची प्रतिमा, कधी हिंदू अतिरेकी थियरी, कधी एव्हीएम घोटाळा, तर कधी व्होटचोरीचा आरोप. पण या सर्व गोटींमध्ये तथ्य काय? काहीच नाही. फक्त राहुल गांधींना खुश करण्यासाठी, त्यांच्या राजकीय अस्तित्वाला आधार देण्यासाठी काँग्रेस पक्ष अशा काल्पनिक कथांचा वापर करतो. परिणामी, भारतातील लोकशाहीचा खेळखंडोबा होतो - निवडणुकीची प्रक्रिया, जनतेचा विश्वास आणि राजकीय चर्चा सर्व काही हास्यास्पद बनते.

सर्वप्रथम, राहुल गांधींच्या ताज्या आरोपाबद्दल बोलूया - व्होट चोरी. राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर आरोप केला की त्यांनी व्होट चोरीच्या माध्यमातून नरेंद्र मोदींना मदत केली. ते म्हणाले की, निवडणूक आयोगाने भाजपसोबत मिळून लाखो मतांची चोरी केली. हा आरोप इतका गंभीर आहे की निवडणूक आयोगाने राहुल गांधींना पुरावा मागितला आणि म्हणाले की, एक व्यक्ती एक मत ही प्रथा १९५१ पासून आहे आणि अशा आरोपांनी निवडणुकीच्या प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित होतात. निवडणूक आयोगाने राहुल गांधींना औपचारिक घोषणापत्र देण्यास सांगितले, पुरावा सादर करण्यास सांगितले, पण अद्याप काहीच पुरावा आलेला नाही. भाजपाने याला बालिश आणि निराधार म्हटले आहे, प्रत्येक पराभवानंतर काँग्रेस नवीन बहाणे शोधते. महाराष्ट्राचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही म्हटले की राहुल गांधींचे आरोप बालिश आहेत. वास्तविक, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने चांगली कामगिरी केली, ९९ जागा जिंकल्या, पण तरीही ते पराभूत झाले. यावरून हे स्पष्ट होते की राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेस फक्त आरोप करते, पुरावा देत नाही. यामुळे निवडणूक आयोगाची प्रतिमा खराब होते आणि जनतेचा विश्वास डळमळतो. लोकशाहीत निवडणुकीची प्रक्रिया ही पवित्र आहे, पण राहुल गांधींसारखे नेते तिला चोरी म्हणून हिणवतात, फक्त स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालण्यासाठी.

२०२२ मध्ये त्यांनी भारत जोडोचा नारा दिला. २०२४ मध्ये भारत जोडो न्याय यात्रा झाली, जी मणिपूर ते मुंबईपर्यंत होती. काँग्रेस म्हणते की ही यात्रा जनतेच्या दुःखांना जोडण्यासाठी होती आणि त्यामुळे पक्षाचे पुनरुज्जीवन झाले. याचा थोडा फायदा पक्षाला झाला. कारण २०२४ च्या निवडणुकीत काँग्रेसने ९९ जागा जिंकल्या, जे २०१९ पेक्षा ५२ ने जास्त आहेत. पण ही यात्रा फक्त राहुल गांधींची प्रतिमा उंचावण्यासाठी होती. यात्रेदरम्यान ते चालले, जनतेशी बोलले, पण प्रत्यक्षात काँग्रेसची अंतर्गत समस्या - नेतृत्वाचा अभाव, भ्रष्टाचाराचे आरोप - यात काहीच बदल झाला नाही. वास्तविक, ही यात्रा फक्त एक पीआर स्टंट होती, ज्यात करोडो रुपये खर्च झाले आणि जनतेच्या पैशाचा अपव्यय झाला. यात्रेद्वारे राहुल गांधींना लोकनेता बनवण्याचा प्रयत्न, पण तथ्य काय? काँग्रेस अजूनही विरोधी पक्ष आहे आणि राहुल गांधींचे नेतृत्व अजूनही प्रश्नांकित आहे.

पुढे, जनेऊधारी ब्राह्मणाची प्रतिमा. २०१७ मध्ये, गुजरात निवडणुकीदरम्यान राहुल गांधींनी मंदिरात दर्शन घेतले आणि काँग्रेसने जाहीर केले की ते जनेऊधारी हिंदू आहेत, म्हणजे ब्राह्मण. थोडक्यात त्यांची हिंदू प्रतिमा विकसित करण्यात आली. खरे पाहता ही फक्त हिंदुत्वाच्या विरोधात असलेल्या काँग्रेसची रणनीती होती, ज्यात राहुल गांधींना सॉफ्ट हिंदुत्वच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी यास फॅन्सी ड्रेस हिंदुत्व म्हटले. राहुल गांधींच्या कुटुंबाची पृष्ठभूमी नेहरू कुटुंब आहे, जे छद्म पुरोगामी आहे, पण निवडणुकीत हिंदुत्वाचा वापर करतात. आता, हिंदू अतिरेकी थियरीबद्दल. मालेगाव बॉम्बस्फोट, २६/११ दरम्यान हिंदूंना अतिरेकी बनवण्याचा मोठा कट रचला गेला. मालेगाव स्फोटात आधी मुस्लिम आरोपी पकडले होते. पण शरद पवारांनी प्रत्येक वेळी मुस्लिम का पकडला जातो असं वक्तव्य केलं आणि चमत्कारिकरीत्या हिंदूंना पकडण्यात आले. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येमध्ये देखील हिंदूंना गोवण्यात आले. २६/११ च्या आक्रमणात तुकाराम ओंबळे यांनी जिहादी कसाबला जिवंत पकडले नसते तर कसाब हा हिंदू असल्याचे काँग्रेसने सिद्ध केले असते. हे सर्व मतांसाठी झालं. हे काँग्रेसची सेक्युलर रणनीती दाखवते, ज्यात हिंदू अतिरेक्यांना अतिरंजित करून मुस्लिम मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.

या सर्व उदाहरणांमधून स्पष्ट होते की काँग्रेस पक्ष राहुल गांधींना युवराज मानून त्यांचे नवीन नवीन अवास्तव हट्ट पूर्ण करतो. भारत जोडो यात्रा ही एक मोठी पीआर मोहीम होती, ज्यात करोडो रुपये खर्च झाले, पण पक्षाची अंतर्गत समस्या सुटली नाही. जनेऊधारी प्रतिमा ही फक्त निवडणुकीपुरती होती, ज्यात धर्माचा राजकीय वापर झाला. हिंदू अतिरेकी थियरीद्वारे हिंदू समाजाला बदमान करण्यात आलं. आता व्होट चोरीचा आरोप - ज्यात पुरावा नाही, फक्त आरोप. हे सर्व फक्त राहुल गांधींना खुश करण्यासाठी, त्यांच्या अपयशावर पडदा टाकण्यासाठी आहे. याचा परिणाम काय? लोकशाहीचा खेळखंडोबा. निवडणूक आयोगावर आरोप केल्याने जनतेचा विश्वास कमी होतो आणि निवडणुकीची प्रक्रिया संशयास्पद बनते. धर्माचा वापर केल्याने समाजात विभाजन वाढते. काँग्रेसने राहुल गांधींना युवराज बनवले, पण ते पक्षासाठी ओझे झाले आहेत. २००४ पासून ते सक्रिय आहेत, पण काँग्रेस सतत पराभूत होत आहे. २०१४ आणि २०१९ मध्ये मोदींनी मोठा विजय मिळवला आणि २०२४ मध्येही एनडीए सत्तेत आहे. लोकशाहीत नेत्यांनी तथ्यांवर आधारित राजकारण करावे, काल्पनिक आरोपांवर नव्हे. राहुल गांधींचा हट्ट पुरवण्यासाठी काँग्रेस काहीही करायला तयार झाली तर एक दिवस वरील गोष्टीतल्या युवराजाच्या राज्याप्रमाणे काँग्रेसही बुडेल. पण मला भारतीय संविधान आणि लोकशाहीची चिंता वाटते. ते अबाधित राहावे. बाकी युवराजांना शुभेच्छा! ▮

writerjayeshmestry@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महिलांच्या नावे बँकेत खाते काढून फसवणूक

## सोलापुरातील महिलेसह तिघांवर गुन्हा नोंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

खात्यावर महिन्याकाठी एक हजार रुपये जमा होतील याचे आमिष दाखवून महिलेच्या खात्यावर राज्यभरातून ऑनलाईन फसवणूक करून पैसे वर्ग करून घेतले. अशी फसवणूक करणाऱ्या महिलेसह तिघांवर सायबर पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यामध्ये दोन गुन्हेगारांना अटक केली आहे. ही घटना १० मार्च ते १३ ऑगस्ट २०२५ दरम्यान घडली आहे.

अश्विनी तुकाराम भोसले (वय ३६ रा. सम्राट चौक माने वस्ती सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दिपाली सुहास चाबुकस्वार, सुहास विठ्ठल चाबुकस्वार (दोघे रा.१२१ उत्तर कसबा सोलापूर),अभिषेक शंकर निराळे (वय २५ रा. हांडे प्लॉट,जुना पूना नाका,सोलापूर) अशी गुन्हा




दाखल झालेल्याची नावे आहेत.

शहरात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. दिपाली व सुहास चाबुकस्वार यांनी अभिषेक निराळे हे आम चे सर आहेत. ते शेअर मार्केट मध्ये काम करतात. त्यांना चांगले प्रॉफीट होत आहे. त्याकरता त्यांना बॅक खात्याची गरज आहे. ज्या व्यक्तीची बॅक खाते वापरले जाते त्यांना दोन टक्के कमिशन भेटते. दिपाली चाबुकस्वार हिने अश्विनी भोसले व त्याची मैत्रिण पद्मिनीला एक महिन्याकरिता तुमच्या नावाने बॅक खाते काढून द्या,त्या बदल्यात तुम्हा १ हजार रूपये खात्यावर येतील. ते तुम्हीच घ्या, तुमचे खाते एक महिन्यात बंद करून देतो, तुम्हाला काहीच अडचण येणार नाही.असे सांगून विश्वास संपादन करून फिर्यादी,तिची आई व मैत्रीण पद्मिनी यांचे नावे नवीन मोबाइल सीमकार्ड, व बँकेचे खाते काढून घेतले. त्या बॅक खात्यावर इतर राज्यातील तक्रारदार यांची ऑनलाईन अर्थिक फसवणूक करून अश्विनी भोसले यांच्या खात्यावर २ कोटी ६५ लाख २५ हजार४५१ रुपये, त्याची मैत्रिण पद्मिनी यांच्या खात्यावर १ कोटी ८३ लाख ३६८ रुपयांची फसवणुकीची रक्कम खात्यावर जमा करून घेतली ती पुढे वेगवेगळ्या खात्यावर ट्रान्सफर केली,फिर्यादीच्या खात्याचा वापर करून घेवून अर्थिक फसवणूक केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक गजा हे करीत आहेत.

# शेतजमिनीचे खरेदीखत करून न देता ९ लाखांची फसवणूक

## बापलेकांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

पाथरी येथील शेतजमिनीचे खरेदी दस्त तयार केले. नावावर करून देण्याचे ठरवले असल्याने स्टँप ड्यूटी भरली,तरी देखील खरेदी दस्तांवर सही केली नाही, वारंवार सांगूनही खरेदी खत करून दिले नाही या प्रकरणी मंठाळकर बापलेकांवर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बंडू दिगंबर पवार (रा. राणा प्रताप नगर,विजापूर रोड,सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजी जगन्नाथ मंठाळकर व सुधेश शिवाजी मंठाळकर (रा. ४२३ शुक्रवार पेठ, सोलापूर) यांच्यावर अर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना १० फेब्रुवारी ते १९ मार्च २०२५ दरम्यान राणा प्रताप नगर,विजापूर रोड सोलापूर या ठिकाणी घडली आहे. आरोपींनी संगनमत करून मौजे पाथरी गट नं १९४ व उतारा नं ३२९१ ही शेतजमीन बंडू पवार यांच्या नावे करून देण्याचे ठरले होते. त्यानुसार खरेदी दस्त तयार केले. स्टँप ड्यूटी ही भरण्यात आली. मात्र आरोपी सुधेश मंठाळकर याने खरेदी दस्तावर सही न करता निघून गेला, त्यानंतर खरेदी करून देण्याबाबत वारंवार सांगून देखील फिर्यादी यांना खरेदी खत करून दिले नाही. व फिर्यादीचे व्यवहार पोटी दिलेले ९ लाख १९ हजार रुपये फिर्यादीस आजपर्यंत परत न करता अर्थिक फसवणूक केली आहे. तपास सहा फौजदार शेख हे करीत आहेत.

## महत्वाचे...

### जीर्ण झालेला राष्ट्रध्वज फडकविला; सोशल बँकेच्या चेअरमन व व्यवस्थापकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

अर्बन बँकेच्या चेअरमन व व्यवस्थापकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत इब्राहीम अल्लाबक्ष जमादार (वय ६0, रा. रामवाडी, अहिलेदिस मशिदजवळ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दि सोलापूर सोशल अर्बन को-ऑप. बँक लि. च्या शाखा सिध्देश्वर पेठ सोलापूरचे चेअरमन व व्यवस्थापकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त दि सोलापूर सोशल अर्बन को-ऑप. बँक लि. च्या शाखा सिध्देश्वर पेठ सोलापूरचे चेअरमन व व्यवस्थापकांनी ध्वजारोहणावेळी राष्ट्रीय ध्वज सुस्थितीत आहे अगर कसे याची खात्री न करता राष्ट्रध्वजाचे केशरी रंगाची पट्टी फाटलेले व हिरव्या रंगाच्या पट्टीवर छिद्र पडलेले, राष्ट्रीय ध्वज जीर्ण झालेला असून त्यावरील रंग फिकट झालेले असतानादेखील तो फडकावून राष्ट्रध्वजाचा अपमान केला. म्हणून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक विजय जाधव पुढील तपास करीत आहेत.

### दगडाने मारहाण करणाऱ्या दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

दगडाने मारहाण करून जखमी करणाऱ्या दोघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मोहन बाबू राठोड (वय ४५, रा. कुमठा तांडा, होटगी रोड, सोलापूर) यांच्या फियादीवरुन सिद्राम शंकर राठोड, गणेश सिद्राम राठोड (रा. कुमठा तांडा, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी सिद्राम राठोड यांनी विनाकारण मोहन राठोड यांची दुचाकी रोडच्या कडेला पार्क केली असताना तुझ्या बापाचा रस्ता आहे का, तुला लय मस्ती आली आहे असे म्हणून मोहन यांस दगडाने मारहाण केली. यावेळी भांडण सोडविण्यासाठी मोहन यांची पत्नी आली असता गणेश राठोड याने दगडाने त्यांच्या डोक्यात मारहाण केली. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार बर्हिजे पुढील तपास करीत आहेत.

### शरद बँकेची आज सर्वसाधारण सभा

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

शरद नागरी सहकारी बँक लि. सोलापूरची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार १७ ऑगस्टला सकाळी १० वाजता सरस्वती चौकातील छत्रपती शिवाजी प्रशालेच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. ही सभा बँकेचे अध्यक्ष प्रा. महेश माने यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.या सभेत २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, नफावाटप, लेखापरीक्षण अहवाल, वीन अंदाजपत्रक, कर्ज धोरणे, लेखापरीक्षकांची नेमणूक आदी महत्त्वाचे विषय चर्चेस येणार आहेत.सर्व सभासदांना वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र आवताडे यांनी केले आहे.



### श्री यल्लम्मा टेम्पल ट्रस्टतर्फे शालेय साहित्याचे वाटप

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

दाजी पेठेतील श्री यल्लम्मा टेम्पल ट्रस्ट या संस्थेच्यावतीने पूर्वभागातील आंध्र भद्रावती मराठी विद्यालय या शाळेतील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासास हातभार म्हणून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. पूर्वभागातील आंध्र भद्रावतील मराठी विद्यालयातील सुमारे ४00 गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मंदिर समितीचे अध्यक्ष चंद्रकांत बोगा, श्रीनिवास मिठ्ठा, सिद्राम कोनापूर यांच्या हस्ते गणवेश व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्ष चंद्रकांत बोगा यांनी गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्याचे नियोजन केले असून लवकरच त्याची घोषणा करण्यात येणार असल्याचेही सांगितले. यावेळी सचिव कमलेश बल्ला, लक्ष्मण चिंताकिंदी, रामुलू जोरीगल, श्रीनिवास एक्कलकदेवी, प्राथमिकचे मुख्याध्यापक दिलीप चव्हाण, माध्यमिकचे मुख्याध्यापक मल्लिकार्जून मोरडे उपस्थिती होती.

### दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

दयानंद कॉलेज ते राहते घर असे येताना दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी झाला. हा प्रकार १३ ऑगस्ट रोजी रात्री १0.१५ च्या सुमारास घडला. ज्ञानेश्वर लाला डोलारे (वय २८,रा. आदित्य नगर, सोलापूर) असे तरुणीचे नाव आहे. ज्ञानेश्वर हा बुधवारी रात्री १0.१५ च्या सुमारास दुचाकी चालवित दयानंद कॉलेज येथून आदित्य नगर येथील घराकडे येत होता. दरम्यान तो चालवित असलेली दुचाकी घसरली. यात त्याच्या चेह-याला जखम झाली तसेच हात आणि पायाला खरचटले त्याला मामाने शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सासूच्या हाताला सुनेने घेतला चावा

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

घरगुती वादातून सासू सुनेचा वाद झाला. यात संतापलेल्या सुनेने सासूच्या उजव्या हाताला चावा घेतला. हा प्रकार गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास कुमठा नाका परिसरातील शांती नगरात घडला. सुवर्णा भागप्पा आजमाने (वय ५८, रा. शांती नगर) असे चावा घेतलेल्या सासूचे नाव आहे. सुवर्णा आणि त्यांची सून प्रियंका यांच्या गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास घरगुती कारणातून वाद झाला. यातून चिडलेल्या सुनेने सासूच्या उजव्या हाताला जोरात चावा घेतला. त्यानंतर ढकलून देऊन लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. या सर्वांगास मुकामार लागल्याने सासू सुवर्णा या स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**कुमठा नाका परिसरातील शांती नगरातील घटना**

# सिंहगड महाविद्यालयात ५०० झाडांच्या रोपणाचा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त पर्यावरण संवर्धनाचा संकल्प घेत, केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या परिसरात ५00 झाडांच्या वृक्षारोपणाचा उपक्रम हाती घेण्यात आला. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात ५0 झाडांचे वृक्षारोपण करून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी कुलगुरू व सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. शिवाजी पवार आणि प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे, इलेक्ट्रिकल



विभाग प्रमुख डॉ. विजय बिरादार, डॉ. प्रदीप तापकीरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. माणिक शिंदे, प्रा. एच. जी. गुरमे, प्रा. एस. एस. शिरगण आदी मान्यवर उपस्थित होते.या उपक्रमात NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. टी. शिंदे व स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वतः झाडे लावून त्यांची देखभाल करण्याची जबाबदारीही स्वीकारली.प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी या प्रसंगी संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले यांच्या शैक्षणिक व सामाजिक दृष्टीकोनाचा उल्लेख करून सांगितले की, सिंहगड संस्थेचे व्हिजन केवळ दर्जेदार शिक्षण देणे नसून सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरणपूरक, हरित व शाश्वत भविष्य घडविणे हे आहे.

### भविष्यातील योजना

या वृक्षारोपण उपक्रमानंतर संस्थेने कॅम्पस हरितीकरणासाठी पुढील काही योजना आखल्या आहेत. जलसंधारण प्रकल्प उभारून झाडांना आवश्यक पाणी उपलब्ध करून देणे. प्लास्टिक मुक्त कॅम्पस अभियान राबवून विद्यार्थ्यांना शाश्वत जीवनशैलीची सवय लावणे. औषधी वनस्पतींचा बगीचा उभारून स्थानिकांना व विद्यार्थ्यांना आरोग्यपूरक माहिती उपलब्ध करणे. संपूर्ण कॅम्पस हिरवागार करण्यासाठी ५00 झाडे लावण्याचा संकल्प हा केवळ शैक्षणिक कार्यक्रम न राहता, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जाणीव, सामाजिक जबाबदारी व स्वच्छ-हरित भारताचा संदेश देणारा ठरला.

# शाळा व आरोग्य केंद्रास सीईओ देणार भेट

## दांडीबहाद्दरांवर कारवाईची अपेक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद मुख्यालयातील प्राथमिक, माध्यमिक शिक्षण आणि आरोग्य विभाग कार्यालयास मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अचानक भेट देऊन कर्मचारी उपस्थिती व कामाची तपासणी केली. त्यावेळी शिक्षण विभागाचे सात तर आरोग्य विभागातील दोन असे एकूण नऊ कर्मचारी कार्यालयात उपस्थित नव्हते. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्याचे आदेश सीईओ जंगम यांनी दिले आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शिक्षण व आरोग्य विभागाच्या कार्यालयांना भेट देऊन कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

जिल्हा परीषद आवारात असणाऱ्या मुख्य कार्यालयात कर्मचारी दांडी मारून अन्यत्र फिरत असल्याचे आढळून आल्यामुळे मुख्यालयाप्रमाणेच आता जिल्ह्यातील शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रासह इतर विभागांना भेटी देऊन दांडीबहाद्दर कारवाई करणार असल्याचे सीईओ जंगम यांनी सांगितले.

### महिन्यातून एकदा भेट गरजेचे

शिक्षण व आरोग्य विभागातील कर्मचारी शाळा व मुख्यालयाला दांडी मारून जिल्हा परीषद आवारात फिरताना दिसून येतात. त्यामुळे तेथील कामकाजावर परीणाम होत आहे. सीईओंनी महिन्यातून एकदा विविध तालुक्यातील एका विभागाला भेट देऊन कामाची पाहणी केल्यास कर्मचाऱ्यांमध्ये भिती निर्माण होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे सीईओंच्या भेटीकडे लक्ष लागले आहे.

# जोशी गल्लीत गांजा विकणाऱ्या तरूणास अटक

## १ किलो ५८८ ग्रॅम गांजा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

रविवार पेठ, जोशी गल्लीत एका घरात गांजा विक्री करताना ३१ वर्षीय युवकास पोलिसांनी पकडले आहे. त्याच्याकडून दिड किलो गांजा हस्तगत करण्यात आला आहे. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिसांनी आरोपीस अटक केली असून त्यास न्यायालयात हजर केले असता पाच दिवसाची पोलिस कोठडी मिळाली आहे.

दादासाहेब वसंत भोसले (वय ३१ रा. रविवार पेठ,जोशी गल्ली, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जोडभावी पेठ पोलिसांना एका खबऱ्याकडून रविवार पेठ जोशी गल्लीतील घर नं १२ मध्ये अवैध रित्या गांजा विक्री होत असल्याची माहिती मिळाली. पोलिस पथक दोन शासकीय पंचाना घेवून सदर ठिकाणी रवाना झाले. व घरात जावून पाहणी केली असता त्या घरात एक व्यक्ती होता. पथकास पाहून तो बाहेर आला. त्यास नाव पत्ता ची विचारणा केली असता, दादासाहेब भोसले असे नाव सांगितले. त्या घरात तो व त्याची आई असे दोघेजण राहत होते. पोलिसांनी त्याची झडता घेताना त्याने पोलिसांना नकार दिला. मात्र पथकाने पंच समक्ष घरात प्रवेश करून घराची झडती घेतली. घराच्या दाराच्या मागील बाजूस एक पोते होते,त्या पोत्यामध्ये गुलाबी रंगाच्या कपड्या च्या पिशवीमध्ये प्लॅस्टीकच्या पिशवीत गांजा तीन पॉकिट मिळून आले, याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाने पोलिस निरीक्षक सुरज मुलाणी यांना दिली. गांजा पाकिट पंच समक्ष जप्त केली. त्यामध्ये एकुण १ किलो ५८८ ग्रॅमचा गांजा जप्त करून आरोपीविरुध्द एनडीपीस ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद पोलिस हवालदार लोहार यांनी दिल्याने जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी अटकेत असून पाच दिवसाची कोठडी मिळाली आहे.

# ए. जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये पालक-शिक्षक मेळावा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

ए. जी. पाटील तंत्रज्ञाने प्रथम वर्षातील विद्यार्थी पालक आणि शिक्षक यांचा त्रिकोण साधण्याचा उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून एक अनुभवी व्यवसायिक आणि करियर मार्गदर्शक प्राध्यापक विजय नवले यांना बोलवण्यात आले होते. विजय नवले यांनी या कार्यक्रमात पालकांसाठी पालकत्वाची भूमिका आणि त्यात येणारे अडथळे यांच्यावर मात कशी करायची हे उदाहरण देऊन पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या जडण-घडणीमध्ये पालक ही पहिली बेसमेंट आहे आणि ही बेसमेंटच त्यांच्या आयुष्याची वाटचाल सुलभ करण्यासाठी मदतनीस ठरते, असेही त्यांनी पालकांना सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विद्यार्थ्यांवर कुठलीही जबरदस्ती न करता त्यांचा एक मित्र म्हणून आयुष्याचा सारथी होण्याचा प्रयत्न करा असेही त्यांनी पालकांना आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, उपाध्यक्ष एस.एस.पाटील, प्राचार्य डॉ. एम ए चौगुले व उपप्राचार्य एस. के. मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन प्रथम वर्षाच्या प्रा वि आर आवटे व प्रथम वर्ष विभागातील सर्व प्राध्यापक मंडळी यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभाग प्रमुख यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ एस एन गवंडी आणि सौ एल एस बिराजदार यांनी केले.

कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य प्रो. एस. के. मोहिते, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही.पोतदार, एस. एन. गवंडी, ट एम. एम. कुलकर्णी, एन. बी. पवार, टी. एल. पाटील, एस. एस. लिगाडे, एस. आर. बागबान, आर. एस. मोटगी व व्ही. आर. आवटे उपस्थित होते.

# शहर गुन्हे शाखेच्या निरीक्षकपदी माने यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील शहर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षकपदी नियत्रंण कक्षातील पोलिस निरीक्षक अरविंद माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिले आहेत. शहर गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांची सहायक पोलिस आयुक्त म्हणून पदोन्नतीने बदली झाल्यानंतर दोरगे यांच्या रिक्त जागेवर माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील तत्कालीन पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांचा कालावधी पूर्ण झाला होता. दोरगे यांनी त्यांच्या तीन वर्षाच्या कार्यकाळात आपल्या सहकाऱ्यांच्या सहकार्याने सुमारे १0५0 गुन्हे उघडकीस आणत ७ कोटी रुपयांपेक्षा किंमतीचा मुद्देमाल जप्त करीत आयुक्तालयाच्या इतिहासात सुवर्ण कामगिरी नोंदविली. तसेच दोरगे यांची सहायक पोलिस आयुक्त म्हणून पदोन्नतीने बदली झाल्याने त्यांना १४ ऑगस्ट रोजी कार्यमुक्त करण्यात आले होते. शहर गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षकपदी नियुक्ती मिळावी म्हणून अनेक अधिकाऱ्यांकडून आपापल्या गॉडफादरमार्फत लॉबिंगदेखील करण्यात येत होते. त्यामुळे दोरगे यांच्या जागी कोणता अधिकारी येणार याकडे संपूर्ण आयुक्तालयाचे लक्ष लागून राहिले होते. परंतु, अखेर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी शहर गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षकपदी नियत्रंण कक्षातील पोलिस निरीक्षक अरविंद माने यांची नियुक्ती केली. तसे आदेश पोलिस आयुक्तांनी काढले आहेत. माने यांनी यापूर्वी जेलरोड व फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकपदी काम केलेले आहे.

# साने गुरुजी कथामालातर्फे सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

साने गुरुजी कथामालातर्फे चौथी ते सातवी तसेच आठवी ते बारावी अशा दोन गटासाठी सामान्य ज्ञान स्पर्धा होणार आहे. १00 गुणांच्या या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. २00 पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी केलेल्या प्रशालेस साने गुरुजींचा फोटो तर स्पर्धेसाठी सहकार्य करणाऱ्या शिक्षकास कृतिशील पुरस्कार देण्यात येणार आहे.

प्रशालेनी विद्यार्थ्यांची यादी १४ सप्टेंबर रोजी ११ ते ४ या वेळेत सुविधा प्रकाशन ७४ उ. कसबा, सोलापुर येथे देण्याचे आवाहन अध्यक्ष अशोक खानापुरे प्रा. अशोक म्हमाणे (परीक्षा प्रमुख) यांनी केले आहे.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः माढा तालुक्यातील लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, डि. सोलापूर सब डि. ता. माढा पैकी मौजे-भोसरे हद्दीतील गट नं. ५0१/३ क्षेत्र 0 हे ८९ आर, आकार १ रु ७५ पैसे यापैकी गट नं. ५0१/३ पैकी पूर्व बाजूची संपूर्ण क्षेत्र 0 हे ४४.१/२ आर, आकार 0 रु ९0 पैसे ही मिळकत यासी चतुःसिमा पूर्व-गट नं. ५0२/१, पश्चिम-गट नं. ५0१/३ पैकी, दक्षिण-गट नं. ५0१/४, उत्तर - सौ. तारामती राऊत व संतोष गाडेकर यांची जमीन ही मिळकत श्री. अरुण कृष्णा राऊत यांनी तारीख २३/0२/२00७ रोजी नोंदणीकृत दस्त क्र. ९0६/२00७ अन्वये खरेदी केलेली आहे. तेव्हापासून सदर मिळकतीत श्री. अरुण कृष्णा राऊत यांची प्रत्यक्ष मालकी व कब्जे वहीवाट आहे. सदर मिळकत विक्रीस निघालेली असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिल व श्री. अरुण कृष्णा राऊत यांचेमध्ये खरेदी-विक्री व्यवहाराची बोलणी होवून व्यवहार ठरलेला आहे. सदर व्यवहाराचे ईसारापोटी र.रु. १,00,000/- दिलेले आहेत. श्री. अरुण कृष्णा राऊत यांनी सदरची जमीन निर्वेध, निजोखमी अशी असलेबाबतची हमी, विश्वास व खात्री दिलेली आहे.

तरी या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचा काही कायदेशीर हक्क - हिस्सा, गहाणखत, पोटगीचा बोजा, खरेदी-विक्रीचा, हस्तांतराबाबतचा, साठेखताचा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, लिज अथवा हस्तांतर होईल असा अन्य कोणत्याही तत्सम प्रकारचा दस्त असल्यास आमचे अशिलाकडे सात दिवसात हरकत नोंदवावी जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही काही तक्रार आल्यास ती आमचे अशिलाचे हक्कावर मुळीच बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. कोणाची काही फसगत होवू नये म्हणून सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे खरेदीपूर्व नोटीस दिली असे. तारीख १५/0८/२0२५

सही/-
ॲड. धनाजी पी. बागल
बी.एस.एल.एल.एल.बी.
मो.नं. ९८९0८१६८६५
ऑफीस : महात्मा जोतीबा फुले शॉपींग सेंटर, गाळा नं.११ गांधी चौक, कुर्डूवाडी ता. माढा जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### पोर्टलॅण्ड क्लासिकमध्ये अदितीने मारला कट



**पोर्टलॅण्ड** : भारतीय गोल्फर अदिती अशोकने एलपीजीएवरील स्टॅण्डर्ड पोर्टलॅण्ड क्लासिक गोल्फ स्पर्धेत २-अंडर ७० च्या ॲक्शन-पॅक्ड दुसऱ्या फेरीत कट मारला. अदितीने ७० मध्ये पाच बर्डी आणि तीन बोगी मारल्या आणि आता दोन दिवसांत ५-अंडरसह अर्ध्या टप्प्यात ती बरोबरीत २७ व्या स्थानावर आहे. भारतीय-अमेरिकन गुरलीन कौर (६५-६८) अजूनही बरोबरीत दुसऱ्या स्थानावर आहे, तर भारतीय वंशाची कॅनेडियन सवाना ग्रेवाल ६९-६७ कार्डसह टी-११ आहे. कोरियाची जेओंगेन ली५ ने ६-अंडर ६७ चा स्कोर करत आघाडी घेतली, तर ६५ वर्षीय ज्युली इंकस्टर एलपीजीए टूर इतिहासात कट मारणारी सर्वात वयस्कर खेळाडू होण्याच्या प्रयत्नात कमी पडली. ३६ वर्षीय दक्षिण कोरियाची खेळाडू ली५ हिने कोलंबिया एजवॉटरमध्ये १२-अंडर १३२ गुण मिळवले. १९९९ च्या स्पर्धेत विजेता हॉल ऑफ फेमर असलेल्या इंकस्टरने तिच्या पहिल्या ६९ गुणांसह ७४ गुणांसह कट चुकवला. ऑस्ट्रेलियाची ग्रेस किम आणि अमेरिकेची गुरलीनने ट्री-लाइन कोर्सवर स्ट्रोक बॅक केले. किमने ६५ गुणांसह आणि गुरलीनने ६८ गुणांसह शॉट मारला.

### अश्वरोहण महासंघाच्या बैठकीला स्थगिती

**नवी दिल्ली** : दिल्ली उच्च न्यायालयाने भारतीय अश्वरोहन महासंघाला रविवारी होणाऱ्या प्रस्तावित सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यापासून रोखले आहे. क्रीडा संस्थेच्या कामकाजाच्या जवळजवळ प्रत्येक पैलूबद्दल गंभीर वाद असल्याचे नमूद केले आहे. महासंघाचे सरचिटणीस कर्नल जयवीर सिंग यांनी २ ऑगस्ट रोजी १७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या असाधारण सर्वसाधारण बैठकीसाठी नोटीस बजावली होती, परंतु राजस्थान अस्वरोहण संघटनेने या बैठकीच्या स्थगितीसाठी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने शुक्रवारी या बैठकीला स्थगिती देत म्हटले की, बैठक बोलावून महासंघामधील अस्वस्थ परिस्थिती आणखी गोंधळात टाकण्याचे कोणतेही कारण दिसत नाही व पुढील सुनावणीची तारीख १३ ऑक्टोबर २०२५ निश्चित केली.

### आशिया चषक निवड बैठकीपूर्वी सूर्यकुमार तंदुरुस्ती चाचणीत उत्तीर्ण

**मुंबई, १६ ऑगस्ट**

भारताचा टी-२० आंतरराष्ट्रीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवची जूनमध्ये दुसरी हर्निया शस्त्रक्रिया झाली होती. मंगळवारी होणाऱ्या आशिया चषक निवड समितीच्या बैठकीत सूर्यकुमार यादव उपस्थित राहण्याची शक्यता आहे. भारताचा टी-२० आंतरराष्ट्रीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने १९ ऑगस्ट रोजी होणाऱ्या आशिया चषक संघ निवडीपूर्वी बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) येथे फिटनेस चाचणी उत्तीर्ण केली. यादववर जूनमध्ये जर्मनीतील म्युनिक येथे खालच्या उजव्या पोटाच्या हर्नियाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्याने त्याची तंदुरुस्ती सिद्ध केली आहे आणि तो आशिया चषकादरम्यान भारतीय संघाचे नेतृत्व करण्यासाठी उपलब्ध असेल. काही दिवसांपूर्वीपर्यंत तो सीओईमध्ये होता, जिथे त्याचा पुनर्वसन कार्यक्रम झाला आणि आता त्याला तंदुरुस्त घोषित करण्यात आले आहे. तो भारतीय संघ निवड बैठकीला उपस्थित राहणार आहे, असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूत्रांनी पुष्टी केली.

### ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची टी-२० मालिका २-१ ने जिंकली

**केर्न्स** : ग्लेन मॅक्सवेलने केलेल्या जबरदस्त आक्रमक खेळीमुळे ऑस्ट्रेलियाने शनिवारी काझालिस स्टेडियमवर झालेल्या निर्णायक टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर दोन गड्यांनी विजय मिळवला आणि मालिका २-१ अशी जिंकली. विजयासाठी १७३ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलिया ६ बाद १२२ अशा अडचणीत सापडला होता, मात्र मॅक्सवेलने १७२.२२ च्या स्ट्राईक रेटने ३६ चेंडूत ८ चौकार आणि दोन षट्कारांसह नाबाद ६२ धावा काढल्या.

# अनाहत सिंग अंतिम फेरीत

### एनएसडब्ल्यू बेगा खुली स्क्वॅश



**बेगा (ऑस्ट्रेलिया), १६ ऑगस्ट**

भारतीय किशोरवयीन स्क्वॅश स्क्वॅश खेळाडू अनाहत सिंगने शनिवारी येथे झालेल्या एनएसडब्ल्यू बेगा ओपन स्क्वॅश २०२५ स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करताना इजिप्तच्या नूर खफागीच्या कडव्या आव्हानावर मात केली.

१७ वर्षीय अनाहत दुहेरी आशियाई खेळांची कांस्यपदक विजेती असून ती या महाद्वीपीय स्पर्धेत पदक जिंकणारी सर्वात तरुण भारतीय ठरली. तिने ५४ मिनिटांत ३-२ (१०-१२, ११-५, ११-५, १०-१२, ११-७) असा संघर्षपूर्ण उपांत्य सामना जिंकला.

पीएसए कॉपर अंतिम फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला ठरलेली अव्वल मानांकित अनाहत २५ हजार डॉलर्स बक्षिसांच्या स्पर्धेच्या विजेतेपदाच्या लढतीत इजिप्तच्या हबीबा हानीशी लढेल.

दुसऱ्या क्रमांकाच्या हबीबाने ४२ मिनिटांत पाचव्या क्रमांकाच्या भारतीय आकांक्षा साळुंखेचा ३-१ (११-९, ७-११, १२-१०, ११-६) असा पराभव केला.

सामन्यादरम्यान अनाहतला दुखापत झाली, पण तिने अलीकडेच एचसीएल स्पर्धा जिंकणाऱ्या तिच्या इजिप्शियन प्रतिस्पर्ध्याविरुद्ध लढत राहिली.

दिल्लीची राहणारी व २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय संघातील सर्वात तरुण सदस्य असलेली अनाहतने केवळ १४ वर्षांच्या वयात दक्षिण आफ्रिकेच्या हेली वॉर्डचा ३-० (११-४, ११-९, १४-१२) असा पराभव केला होता. अनाहतने १८ स्पर्धांमधून १२ पीएसए जेतेपदे जिंकली आहेत, त्यापैकी नऊ विजय गत १२ महिन्यांत मिळाले आहेत. आकांक्षाने २४ मिनिटे चाललेल्या शेवटच्या आठ सामन्यात चौथ्या क्रमांकाच्या ऑस्ट्रेलियन अलेक्झांड्रा हेडनचा ३-० (११-४, ११-७, ११-३) असा पराभव केला. एनएसडब्ल्यू बेगा ओपन ही २०२५/२६ पीएसए स्क्वॅश टूर हंगामातील पहिली जागतिक स्पर्धा आहे.

(वृत्तसंस्था)

# मोहन बागानला रोखण्यासाठी ईस्ट बंगाल सज्ज

### ड्युरंड चषक फुटबॉल

**कोलकाता, १६ ऑगस्ट**

प्रतिष्ठेच्या ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेत रविवारी मोहन बागान आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी ईस्ट बंगाल यांच्यादरम्यान उपांत्यपूर्व सामना खेळला जाणार आहे. कोलकाताच्या या संघादरम्यान होणाऱ्या सामन्यात ईस्ट बंगाल पारंपरिक प्रतिस्पर्धी मोहन बागानला रोखण्यास उत्सुक असेल.

गत दोन हंगामात ड्युरंड चषकामधील प्रसिद्ध कोलकाता डर्बी नेहमीच चर्चेत राहिला आहे. या वर्षी, दोन्ही संघ आपापल्या गटात अव्वल असूनही उपांत्यपूर्व फेरीत एकमेकांविरुद्ध मैदानात उतरल्यामुळे वेळापत्रकावर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते.



नॉकआउट ड्रॉनंतर, मोहन बागानचे सचिव श्रींजॉय बोस यांनी फेसबुकवर वेगळ्या सामन्यांचा संच पोस्ट केला होता, यात मोहन बागान जमशेदपूरमध्ये जमशेदपूरशी आणि ईस्ट बंगाल कोलकातामध्ये डायमंड हार्बर एफसीशी सामना करताना दाखवण्यात आले होते मात्र ते नंतर हटवण्यात आले.

१२ ऑगस्ट रोजी ड्युरंड चषक आयोजन समितीने सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले. यामध्ये ईस्ट बंगाल आणि मोहन बागान यांच्यात कोलकाता येथे आणि जमशेदपूर एफसी आणि डायमंड हार्बर एफसी यांच्यात (दोन्ही रविवारी) सामना होईल. तर गतविजेत्या नॉर्थईस्ट युनायटेड यांचा सामना कोक्राझार येथे बोडोलँड एफसीशी आणि शिलाँग लाजोंग यांचा सामना शिलाँग येथे इंडियन नेव्हीशी (दोन्ही शनिवारी) सामना होईल.

(वृत्तसंस्था)

# कॅण्डिडेट स्पर्धेपूर्वी दिव्या देशमुख खुल्या गटात खेळणार

**कोझीकोडे, १६ ऑगस्ट-**

विश्वचषक जिंकणारी पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू झाल्यानंतर नागपूरची १९ वर्षीय ग्रॅण्डमास्टर दिव्या देशमुख आता आपल्या कारकिर्दीच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. उच्च दर्जाच्या खेळाडूंविरुद्ध खेळल्याने ती अधिक मजबूत होऊ शकते. म्हणून, दिव्या देशमुख पुढील महिन्यात उझबेकिस्तानमध्ये होणाऱ्या ग्रॅण्ड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत पुरुष बुद्धिबळपटूंशी सामना करणार आहे. जर तिने या उच्च मानांकित खेळाडूंच्या स्पर्धेत महिला विभागात खेळण्याचा पर्याय निवडला असता तर तिला विजेतेपद जिंकण्याची चांगली संधी मिळाली असती. त्याऐवजी तिने खुल्या गटात खालच्या मानांकित खेळाडूंपैकी एक म्हणून सुरुवात करण्याचा पर्याय निवडला आहे.(इतर खेळांप्रमाणे, महिला बुद्धिबळात पुरुषांशी स्पर्धा करण्यास मोकळ्या आहेत). तिला रशियन ॲलेक्झांड्रा गोर्याचकिनासह खुल्या गटासाठी वाईल्डकार्ड मिळाले. ग्रॅण्ड स्विसबद्दल सर्वात मोठे आकर्षण म्हणजे विजेता आणि उपविजेता पुढील वर्षीच्या कॅण्डिडेट स्पर्धेसाठी पात्र ठरतील. ती स्पर्धा जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्रता स्पर्धा आहे.

दिव्या आणि गोर्याचकिना यांनी आधीच कॅण्डिडेट स्पर्धेसाठी तिकिटे निश्चित केली आहेत. त्यामुळे ग्रॅण्ड स्विस येथे खुल्या स्पर्धेत खेळण्याचा त्यांचा निर्णय अर्थपूर्ण आहे. त्यांचे निकाल काहीही असोत, दिव्या आणि गोर्याचकिना समरकंदमधील त्यांच्या अनुभवातून फायदा घेतील. विश्वचषक अंतिम फेरीत तिने ज्या महिलेचा पराभव केला होता, ती कोनेरू हम्पी हे त्याचे उदाहरण आहे. ग्रॅण्डमास्टरचा किताब मिळवणारी भारतातील पहिली महिला खेळाडू लहानपणापासूनच शक्य तितक्या खुल्या स्पर्धा खेळण्याचा प्रयत्न करत होती. हम्पीने अनेकदा अनेक पुरुषांच्या अहंकाराला धक्का दिला. हंगेरीची ज्युडिट पोल्गर ही अशी खेळाडू होती, जिने बुद्धिबळाच्या पटावर हम्पी आणि इतर महिला योद्ध्यांना मार्ग दाखवला. ती एकेकाळी पुरुषांमध्ये जगात ८ व्या क्रमांकावर होती आणि तिच्या बळींमध्ये गॅरी कास्पारोव्ह आणि विश्वनाथन आनंद यांच्यासह अनेक पुरुष विश्वविजेते होते.

# अमेरिकेचा १९ वर्षांखालील संघ विश्वचषकासाठी पात्र

**दुबई, १६ ऑगस्ट-**

यष्टिरक्षक-फलंदाज अर्जुन महेशच्या नेतृत्वाखालील अमेरिकेचा संघ पुढील वर्षी झिम्बाब्वे आणि नामिबिया संयुक्तपणे आयोजित होणाऱ्या १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषकात स्थान मिळवणारा १६ वा आणि शेवटचा संघ ठरला आहे.

जॉर्जियातील रायडल येथे झालेल्या डबल राऊंड-रॉबिन पात्रता फेरीत कॅनडा, बर्म्युडा आणि अर्जेंटिना यांचा जोरदार पराभव करून अमेरिका संघाने जागतिक स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले. अमेरिकेने कॅनडावर ६५ धावांनी विजय मिळवला, त्यानंतर बर्म्युडा आणि अर्जेंटिनाविरुद्ध मोठे विजय मिळवले आणि स्पर्धेच्या मध्यावर त्यांना ड्रायव्हरच्या सीटवर आणले. त्यानंतर त्यांच्या गोलंदाजांनी काही अधिक प्रभावी कामगिरी करून परतीच्या सामन्यात बर्म्युडा आणि अर्जेंटिनाचा पराभव करून १० गुण मिळवले, जे त्यांना विश्वचषकात स्थान मिळवून देण्यासाठी पुरेसे होत.



# बार्शीच्या विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबच्या १८ खेळाडूंचा विक्रम

## ऑपरेशन सिंदूर स्केटिंग वर्ल्ड रेकॉर्ड स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. १६ ऑगस्ट-**

भारताच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी झालेल्या युनायटेड वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया व आर.जी.ओ.आय स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्यावतीने पूणे येथे झालेल्या ऑपरेशन सिंदूर स्केटिंग वर्ल्ड रेकॉर्ड स्पर्धेमध्ये बार्शीच्या ज्योतिर्लिंग स्पोर्ट्स क्लब संचलित विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबच्या १८ खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. या खेळाडूंनी सलग एक तास पंधरा मिनिटे न थांबता स्केटिंग करत हा विक्रम केला आहे. या खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. या यशस्वी खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, उपाध्यक्ष व प्रशिक्षक गणेश रोडे, सचिव सविता जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या वतीने या खेळाडूंनचे स्नेहल रोडे, संचिती जाधव, विश्वजीत जाधव, आदित्य माळी, यश नान्नजकर, सोहम देशमुख या सर्व सहप्रशिक्षकांनी अभिनंदन व कौतुक केले.

**कामगिरी केलेले खेळाडू**

हर्दिक रुनवाल, आयुश मन्ने, श्रेयश कसपटे, समाधान मुंढे, मितांश शिंगवी, पवन सरकाळे, अर्णव फल्ले, आदित्य बागूल, यथार्थ सारुक, ओंकार चव्हाण, यशराज रोडे, अथर्व भूजबळ, अथर्व सांगळे, श्रीपाद राऊत, अभिनव बावकर, प्रथमेश पवार, वैभव देशमाने, आरव नाळे.



मेडशिंगी (सांगोला) : दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर.

# एनजी क्रिकेट अकादमीची विजयी सलामी

- दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धेत एनजी क्रिकेट अकादमीने आटपाडीचा १६ धावांनी पराभव करीत विजयी सलामी दिली.

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन यांच्या मान्यतेने मेडशिंगी (सांगोला) येथे या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. अमरसिंग शेंडे, सांगोल्याचे प्रशिक्षक दिपक सुरवसे, प्रशांत काशीद, रणजित गवळी, सोलापुर कृषी उत्पन्न संघाचे अधिकारी विनोद पाटील, रविंद्र हांगे, आनंद पाटील, राहुल म्हेत्रे, शिरीष लोखंडे, एन.जी.सी.ए.चे प्रशिक्षक निलेश गायकवाड आदींच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले.



फलंदाज
ओजस मोरे



गोलंदाज
आर्यन जमखंडे



सामनावीर
अनुज वाल्मिकी

**संक्षिप्त धावफलक**

**एन.जी.सी.ए. अकादमी** : ४४.२ षटकात सर्व बाद १२६ धावा (आनंद शेंडे ३२, ऋग्वेद पाटील ३०, रणवीर सिंग बोमरा २५, यशराज टेकाळे नाबाद ९, आर्यन जमखंडे २७/४, वेदांत इरंडे २३/३) वि. वि. **आटपाडी** : ३७.३ षटकात सर्व बाद ११० (ओजस मोरे नाबाद ६५, अनुज वाल्मिकी २२/४, अर्थव पाटील २२/२, ऋग्वेद पाटील, आनंद शेंडे, अनिश बिरोळी प्रत्येकी एक बळी).



सोलापूर : सर्व गटातील प्रथम तीन स्पर्धकांसमवेत महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे व मान्यवर.



२५ किलोमीटर स्पर्धेतील प्रथम तीन अंकित गर्ग, साईश्वर गुंटूक व अमोल पडवळ

# अंकित गर्ग, शिवपुत्र यलगोंडे, श्रीनिवास सब्बन प्रथम

- ७८, ५० व २५ किलोमीटर अल्ट्रा रनिंग स्पर्धेतील कामगिरी
- महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूरतर्फे यावर्षी ७८ किमी अल्ट्रा रनिंगचा आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला.

यातील ७८ किमी धाव पूर्ण करणाऱ्या सर्व धावपटूंचा सत्कार महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते करण्यात आला. रन फॉर नेशन या घोषवाक्याखाली आयोजित या पर्व-४ मधील धावण्याचा कार्यक्रम स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला सुरू होऊन १५ ऑगस्टच्या पहाटेपर्यंत सलग १२ तास धावून पूर्ण करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता पूजा लॉन, सिद्धेश्वर वनविहारजवळील पोदार स्कूल परिसरातून झाली. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता समारोप झाला.कार्यक्रमासाठी पोलीस आयुक्त एम. राजकुमार व जिल्हाधिकारी मोनिका सिंग यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. आज समारोप सोहळा १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता करण्यात आला. सोलापूर महानगरपालिका येथे ध्वजारोहणानंतर ७८ किमी धाव पूर्ण करणाऱ्या सर्व धावपटूंचा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त रवि पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त तैमूर मुलाणी, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्यलेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, नगर अभियंता सारिका अकुलवार, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, आरोग्य अधिकारी राखी माने आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमाचे आयोजन चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर यांनी केले असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे सोलापूर शहराची देशभरात देशभक्तीपूर्ण आणि खेळाडूवृत्तीची ओळख आणखी मजबूत झाली आहे. यावेळी संस्थेचे प्रमुख अतिश शहा आणि चंद्रशेखर गायकवाड आदी उपस्थित होते.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**२५ किलोमीटर:** अंकित गर्ग, साईश्वर केशव गुंटूक (दोघे सोलापूर), अमोल पडवळ (धाराशिव). **५० किलोमीटर :** शिवपुत्र यलगोंडे, दत्तात्रय काळे, हेमंत वाघमारे (सोलापूर). **७८ किलोमीटर:** श्रीनिवास सब्बन (सोलापूर), दत्तात्रय टेकाळे (धाराशिव), दिगंबर माने (पंढरपूर).



# काट्ेज फिटनेस जिमच्या वर्धापन दिनी स्पोर्टस् बॅगा भेट

**सोलापूर, दि.१६ ऑगस्ट**

स्वातंत्र्य दिनानिमित्त व काटेज फिटनेसच्या वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिमच्या सदस्यांनी स्पोर्टस् बॅगा प्रसिद्ध सर्जन डॉ. विजय कानेटकरमव डॉ. अमोल कानेटकर यांच्या हस्ते देण्यात आल्या. सुरवाती झेंडावंदन बजरंगबलीची पूजा करण्यात आली. याप्रसंगी व्यायाम शाळेतील सर्व सभासद बॉडी बिल्डिंग संघटनेचे राजकुमार सूरवसे, नजीर शेख, गोरख गडसिंग, अनिल गवसाणे इतर सर्व सभासद तसेच बँक ऑफ बरोडाचे अंगद पाटील, श्री. दीक्षित, शिरीष देखणे आदी उपस्थित होते. प्रमोद काटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जिल्ह्यात स्वातंत्र्यदिनाचा उत्साह



### सांगोला महाविद्यालय, सांगोला

सांगोला महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, प्र.प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचे हस्ते ध्वजारोहण समारंभ पार पडला. यावेळी एन.सी.सी.च्या पुरूष-महिला कॅडेटस् व उपस्थितांनी ध्वजाला मानवंदना दिली. यापसंगी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, सेक्रेटरी उदयबापू घोंगडे, सहसेक्रेटरी साहेबराव ढेकळे, म.सि.झिरपे, सदस्य रावसाहेब ताठे, शामराव लांडगे, सु.ग. फुले, सुधीर उकळे, डॉ. कृष्णा इंगोले, डॉ.व्ही.व्ही.जाधव, प्रा.बी.के. लोंढे, प्रा. शिवाजीराव साळुंखे, प्रा.बलभिम खडतरे, एन.एस.सुरवसे, प्रकाश शिंदे, अनिल साखरे, रमेश बुंजकर, डोंबे गुरुजी, अच्युत फुले, महेश गुरव, शा.शिक्षण संचालक प्रा.जगदीश चेडे एन.सी. सी.कंपनी कमांडर लेफटनंट प्रा.संतोष कांबळ आदी उपस्थित होते. प्रा.डॉ.विजय गाडेकर यांनी सूत्रसंचालन केले.



### लोकविकास संस्था, वेळापूर

वेळापूर येथील लोकविकास मराठी मिडीयम स्कूल, इंग्लिश मिडीयम स्कूल व लोकविकास ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यापसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षा वैशाली शेंडे व नामदेव शेंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सचिव चंद्रकांत नवले, विष्णू आडत, भिमराव बनकर, सावता म्हेत्रे, तानाजी घाडगे, विठ्ठल म्हेत्रे, सचिन बनकर, आनंद बनकर, सोमनाथ बनकर, उमेश पोरे, सतिश शिंदे, संजय जोशी, डॉ. राहुल नरवणे ,प्राचार्य अमोल पांढरे, मुख्याध्यापक अजित बनकर, मुख्याध्यापक सुनिल पताळे उपस्थित होते. हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत १३ ऑगस्ट रोजी भागवत गायकवाड व सचिव चंद्रकांत नवले यांच्या हस्ते व १४ ऑगस्ट रोजी विठ्ठल म्हेत्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रास्तावीक अश्विनी शिंदे सूत्रसंचालन अमोल साठे यांनी केले तर आभार राया वाघमारे यांनी मानले.




### एम.आय.टी. कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग, बार्शी

येथील एम. आय. टी. कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनीरिंग अँड रिसर्च, बार्शी येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८.१५ वाजता ध्वजारोहणाने झाली. यावेळी प्राचार्य डॉ. मधुकर लेंगरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी राष्ट्रगीताचे एकत्रितपणे गायन केले. तसेच विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करुन स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

### शिवाजी पॉलीटेक्निक, सांगोला

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये सचिवांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्राचार्य, विभागप्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि महाराष्ट्र गीताचे गायन केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतातून तसेच भाषणातून देशप्रेम जागवले. यादरम्यान कॉलेज मधील विद्यार्थांनी स्त्री सक्षमीकरण हे नाटक सादर करून प्रेक्षकांना भावविभोर केले. 'हर घर तिरंगा' या उपक्रमानिमित्त कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन तसेच निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी रांगोळीतून तिरंग्याचे वैभव, वक्तृत्वातून देशभक्तीची प्रेरणा, पोस्टर प्रेझेंटेशनमधून सृजनशीलता आणि निबंध लेखनातून राष्ट्रप्रेम व्यक्त केले. स्पर्धेतील सर्व विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. तसेच स्व.आ.डॉ.गणपतराव देशमुख यांच्या ९८ जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धेतील तनुजा मोरे हिने वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवल्याबद्दल तिचे सचिव यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व बक्षीस देऊन अभिनंदन करण्यात आले.

## निधन वृत्त...

### नागेश भंगर्गी



**मैंदर्गी, दि. १६ ऑगस्ट-**

येथील जेष्ठ व निर्भीड पत्रकार नागेश पिरप्पा भंगर्गी वय (७९) यांचे दि. १५ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सुना, नातवंडे असा परीवार आहे. शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी चार वाजता जुना दुधनी रोड हरळय्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### रामहरी पाडोळे



**पंढरपूर, दि. १६ ऑगस्ट-**

येथील रामहरी महादेव पाडोळे (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने गुरूवारी (दि.१५) रात्री दहा वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, एक भाऊ असा परिवार आहे.

# अन्नछत्र मंडळात गोविंदाची दहिहंडी उत्साहात





**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या वतीने शनिवारी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

दरम्यान सकाळी हन्नूर रस्ता येथील वडार गल्लीत ढोल ताश्याच्या निनादात गोविंदा पथक मिरवणूकीने येऊन अन्नछत्र मंडळातील दहिहांडी फोडली.

न्यासाच्या वतीने आयोजित केलेल्या दहीहंडी फोडण्याकरिता आलेल्या गोविंदा पथकाची स्वागत मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी केले. त्यानंतर न्यासाच्या मुख्य प्रवेश द्वारासमोर बांधण्यात आलेल्या दहीहंडी गोविंदा पथकाने फोडली. दोन वर्षानंतर दहिहंडी उत्सव पार पडत असल्याने गोविंदा पथकांमध्ये मोठ्या प्रमाणावर उत्साह पाहायाला मिळाला. यापसंगी न्यासाचे सचिव शामराव मोरे, बाळासाहेब घाडगे, निखील पाटील, विजय माने, प्रवीण घाडगे, , सिध्दाराम कल्याणी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सौरभ मोरे, वैभव मोरे, महांतेश स्वामी, , सतीश महिंद्रकर, समर्थ घाडगे, , धनंजय निंबाळकर, दत्ता माने, प्रसाद हुल्ले, मल्लिकार्जुन बिराजदार, अतिश पवार, विनायक भोसले, गोरख माळी, श्रीनिवास गवंडी, संभाजीराव पवार, पप्पू कोल्हे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था, अक्कलकोट यांच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा शुक्रवारी श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी हिरकणी महिला संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई जनमेजयराजे भोसले, सचिव अर्पिताराजे अमोलराजे भोसले महिला भगिनी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



## महिला भाविकाची गहाळ झालेली बोरमाळ पोलिसांकडून परत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ ऑगस्ट-**

येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात दर्शनादरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातील एका महिला भाविकाची सोन्याची बोरमाळ व पैशाचे पाकीट गहाळ झाले होते. दरम्यान सदर दागिने पैसे पोलिसांना मिळाल्याने त्यांची ओळख पटवून त्यांच्या त्यांना परत देण्यात आले. यामुळे भाविक भक्तातून पोलिसांचे कौतुक होत आहे.

शनिवारी १६ ऑगस्ट रोजी अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई निंगदळे व पोलीस शिपाई ठेंगळे हे श्री स्वामी समर्थ मंदिरात बंदोबस्त ड्युटी बजावताना सोन्याची बोरमाळ व पैशाचे पाकीट सापडले. सदर सापडलेले दागिने पैसे भाविकांकडून ओळख पटवून त्यांना परत देण्यात आले. गंगाबाई बाळकृष्ण लावंदरे (रा. परळी मांडवकरवाडी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर) अशी त्या महिला भाविकाचे नाव आहे.

## महापालिकेच्या १५४ सेवकांना साडेचार कोटी देणार

### ४ टक्के महागाई भत्ता वाढीमुळे दरमहा ५५.९० लाख रुपये खर्च

#### मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

महापालिकेमधील कार्यरत व सेवानिवृत्त सेवकांना माहे ऑगस्ट २०२५ पासूनचे वेतनामधून महागाई भत्याच्या दरामध्ये ४ टक्के इतकी वाढ करण्यात येत असून दरमहा ५५ लाख ९० हजार १७१ रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. सेवानिवृत्त झालेल्या वर्ग-४चे एकुण १५४ सेवकांना ४ कोटी ६० लाख रूपये रक्कम अदा करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी दिली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त कार्यक्रमात शुक्रवारी महापालिकेच्या कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढीची घोषणा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली आहे. दरम्यान, या संदर्भात नेमका किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी दिली. महापालिकेतील कार्यरत व सेवानिवृत्त सेवकांना माहे ऑगष्ट २०२५ पासूनचे वेतनामधून महागाई भत्याच्या दरामध्ये ४ टक्के इतकी वाढ करण्यात येत असून दरमहा ५५ लाख ९० हजार १७१ रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच रोजंदारी सेवकांच्या दैनंदिन दरामध्ये ५० रुपयांची वाढ करण्यात येत आहे. यासाठी दरमहा १ लाख ५३ हजार ७५० रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. बालवाडी शिक्षिका व सेविकांच्या दरमहाच्या मानधनामध्ये ५०० रुपये इतकी वाढ करण्यात येत आहे. याकरिता दरमहा ५२ हजार ५०० रुपये इतका खर्च होणार आहे. सोलापूर महापालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या वर्ग-४चे एकुण १५४ सेवकांना ४ कोटी ६० लाख रूपये रक्कम अदा करण्यात येणार आहे. या घोषणेमुळे महापालिकेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



#### अशी आहे वाढ आणि दरमहा अपेक्षित खर्च

महागाई भत्यात ४ टक्के वाढ - दरमहा ५५ लाख ९० हजार १७१ रुपये , रोजंदारी सेवकांच्या दैनंदिन दरामध्ये ५० रुपयांची वाढ - दरमहा १ लाख ५३ हजार ७५० रुपये, बालवाडी शिक्षिका- सेविकांच्या मानधनामध्ये ५०० रुपये वाढ - दरमहा ५२ हजार ५०० रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. तिन्ही मिळून महापालिकेचे एकूण दरमहा ५७ लाख ९६ हजार ४२१ रुपये खर्च होणार आहेत.



## सेवानिवृत्ती निमित्त डेप्युटी इंजिनियर राजेंद्र कटके यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १६ ऑगस्ट-**

खंडाळी- (ता.माळशिरस) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडाळी येथे स्वातंत्र्य दिवस उत्साहात पार पडला,यावेळी खंडाळी गावचे सुपुत्र व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडाळी चे १९७३ सालचे माजी विद्यार्थी राजेंद्र भगवान कटके (डेपोटी इंजिनीअर,वडूज जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग) हे नुकतेच सेवानिवृत्त झाले त्याबद्दल त्यांचा समस्त ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा संपन्न झाला.

यावेळी कटके यांनी शाळेसाठी लागेल ती मदत करण्याचे आश्वासन दिले आणि सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मा.सरपंच बाबुराव पताळे, खंडाळीच्या विद्यमान सरपंच सुनीता सुरवसे, मुख्याध्यापक एकतपुरे ,लहुजी शक्ती सेनेचे युवक तालुका अध्यक्ष मारुती अवघडे, नागेश वाघंबरे, ग्राम पंचायत सदस्या उज्वला खंडागळे, शालेय शिक्षण समितीचे आनंद वाघमारे, निखिल गोसावी, अर्जुन पताळे उपस्थित होते.

## पंढरीत आज गायनाचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ ऑगस्ट-**

येथील डॉ. प्रसाद कुलकर्णी शिष्य परिवार आयोजित परंपरा २०२५ गुरुपौर्णिमेनिमित्त रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सायं. ५.३० वाजता गायक राजेश खिस्ते, पारुल परमार, निलेश आराध्ये, ऋचा कुलकर्णी, विनित शिंदे, ओजस अंबिके, प्रसाद खिस्ते, सुधीर भोरकर यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात हार्मोनियम -श्रीरंग जाखी, गायत्री रणदिवे, वेदश्री संत, मिहीर बडवे करणार आहेत. तर तबला- उमेश केसकर, ऋषिकेश सुरवसे, बासुरी मिहीर देशपांडे तर सतार - सिद्धेय पुरवत हे साथसंगत करणार आहेत. तर ध्वनी व्यवस्था आरती स्पीकर्स पंढरपूर हे करणार आहेत. यावेळी प्रा. डॉ. मिलिंद परिचारक, मीरा परिचारक हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम कर्मयोगी सभागृह (अर्बन को. ऑप. बँक. लि. पंढरपूर) खवा बाजार, नवी पेठ, पंढरपूर येथे संपन्न होणार आहे, अशी माहिती डॉ. प्रसाद कुलकर्णी यांनी दिली.

## मंद्रूप अप्पर तहसीलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ ऑगस्ट-**

मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) अप्पर तहसील कार्यालयात आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत तहसीलदार सुजित नरहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आमदार देशमुख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, माजी सभापती डॉ. चनगोंडा हविनाळे, भाजपाचे जिल्हा चिटणिस यतीन शहा, भारत बिराजदार, प्रशांत कडते, नितीन रणखांबे, गौरीशंकर मेंडगुदले, विश्वनाथ हिरेमठ, मंडलअधिकारी ज्योतीराम पवार, अव्वल कारकुन सारवळे, भारत बिराजदार, अमृता चव्हाण, मोतीलाल राठोड, श्रीमंत डोमनाळे, रेवणसिध्द मेंडगुदले, तलाठी रावसाहेब कोकरे, सर्कल सरकाझी, राणा वाघमारे, गजानन जाधव, निंगू कोळी, विश्वनाथ पवार, गणेश भुजबळ, राजेश विटेकर, अमोल मगर, सीमा चौरे, रमेश बबलादी, सतीश भंडारे, मळसिध्द जडगे, रियाज पटेल, पिंटू चव्हाण, आबासाहेब कोळी आदी उपस्थित होते.यावेळी आमदार देशमुख यांनी पर्यटन महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन केले. जिल्ह्यात पर्यटनस्थळ व तीर्थक्षेत्रांची संख्या मोठी असल्याने जिल्हावासियांनी त्यांना भेटी देऊन पर्यटनाला चालना दिल्यास रोजगारनिर्मिती होण्यास मदत होणार असल्याने पर्यटनाचे आयोजन करण्याचे आवाहन आमदार देशमुख यांनी केले.

## सोलापुरात मराठा समाजातर्फे मुख्यमंत्र्यांचा आज सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सोलापूर जिल्ह्यातील दहिटणे आणि शेळगी येथे उभारण्यात येत असलेल्या गृहप्रकल्पांच्या पहिल्या टप्प्यातील एकूण १३४८ लाभार्थ्यांना सदनिकांचे वितरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, पुणे मंडळाचे मा सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, प्रकल्पाचे मुख्य प्रवर्तक तथा शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता, उत्तर सोलापूर मधील राष्ट्रतेज अटल गृहप्रकल्प, गट क्र ९२/२, दहिटणे येथे आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी महाराष्ट्र शासन आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळा कडून १ लाख ५० हजार लाभार्थ्यांना उद्योग व्यवसाय, आर्थिक उन्नतीसाठी लाभ दिला. त्या बद्दल त्यांचा मराठा समाजाचे नेते तथा भाजप नेते अनंत जाधव, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक राम जाधव, किरण पवार आणि सहकाऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री फडवणीस यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

याचबरोबर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने श्री समर्थ टूर्स अँड ट्रॅव्हल्स याचे मालक मोरे प्रभाकर प्रल्हाद, श्री गुरु डेअरी फार्म याचे मालक चटके संगीता धर्मराज, ए के मसाले यांचे मालक कोडक हेमलता संजय, श्री गणेश ऑटो स्टोअर्स यांचे मालक मोठे शरद किसन यांना प्रत्येकी १५ लाख रुपये मंजूर झाले असून त्याचा चेक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. याचवेळी लाभार्थी दोन मराठा भगिनींच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना आपले बंधू मानून राखी बांधण्यात येणार आहे. या कार्यक्रमास मराठा बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मराठा समाजाचे नेते तथा भाजप नेते अनंत जाधव, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक राम जाधव, किरण पवार यांनी केले आहे.

## श्रावणानिमित्त गौडगांवच्या मारुती मंदिरात गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ ऑगस्ट-**

तालुक्यातील गौडगांव येथील हेमाडपंथी श्री जागृत मारूती मंदीरात चौथा श्रावण शनिवार व शासकीय सुट्याच्या निमित्ताने भक्तांनी जय श्री राम, पवनसुत हनुमान की जय असा जयघोष करत दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

श्रावण महिन्यातील चौथा शनिवार व शासकीय सुट्ट्याच्या औचित्य साधून आलेल्या भाविक भक्तांनी पहाटेच्या होम हवन, रुद्राभिषेक, अभिषेक, आरतीचा लाभ घेतला. यावेळी जय जय श्री राम हनुमान की जय जयघोष करत मारूतीचा मंत्रोचार केला. पहाटे मारूतीस अभिषेक, होमहवन, शनिपुजा, महाआरती विविध पूजा पार पडल्या. तसेच शासकीय सुट्यामुळे अनेक अधिकाऱ्यांनी मारुतीचे दर्शन घेतले. राज्य व परराज्यातुन आलेल्या भाविकानी रांगेत थांबून शांततेत श्री चे दर्शन घेतले. यावेळी मारुतीच्या दर्शनासाठी आलेल्या हजारो भक्तांनी अन्नछत्र मंडळात महाप्रसाद घेतला. मंदिर समितीच्या वतीने चविष्ट व रुचकर अशा हुग्गीचा प्रसादचा भक्तांनी आस्वाद घेतला.



यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे सचिव सिद्राम वाघमोडे, प्रकाश मेंथे, ज्ञानेश्वर फुलारी, चौडप्पा सोलापुरे, परमेश्वर सुतार,प्रकाश सनकळ, भारत ननावरे, श्रीशैल कुंभार, श्रीमंत म्हेत्रे, शिवानंद फुलारी, मल्लिनाथ पाटील, मल्लिनाथ मेंत्रे आदींची उपस्थिती होती.

# श्रीपूर येथे कर्मयोगी कारखान्याचा क्रीडा महोत्सव उत्साहात सुरु



**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १६ ऑगस्ट -**

श्रीपूर ता. माळशिरस येथिल कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून काम गारांसाठी क्रिडा महोत्सव तसेच विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या क्रिडा महोत्सवाचे उद्धाटन शासकीय लेखा परिक्षक गौतम निकाळजे यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी चेअरमन प्रशांतराव परिचारक, उपाध्यक्ष कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी उपस्थित होते. प्रथम प्रशांतराव परिचारक यांचा वाढदिवसा निमित्त कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी डॉ. कुलकर्णी यांनी मनोगता मध्ये क्रिकेट, रस्सीखेच, हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धीबळ या मैदानी खेळांमुळे कामगारां मध्ये ऐक्य भावना निर्माण होऊन शरिर सुद्रुढते साठी या क्रिडा स्पर्धा महत्वाच्या ठरतात असे सांगून मातोश्री वृद्धाश्रम, मुकबधिर शाळा यांना आर्थिक मदत व स्नेहभोजन देण्यात येणार असल्याचे सांगून जागर मायमराठीचा या सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. यावेळी प्रोडक्शन मॅनेंजर एम. आर. कुलकर्णी, मुख्य शेती अधिकारी संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, वर्क्स मॅनेंजर अमोल बारटक्के, डिस्टलरी मॅनेंजर एस. आर. पाटील, अकौंटट रविंद्र काकडे, परचेस ऑफीसर महेश देशपांडे ' डॉ. सुधीर पोफळे, डॉ. प्रमोद पवार, चिफ इंजिनिअर सचित विभूते, सिव्हील इंजिनिअर हणमंत नागणे, कंम्प्युटर इन्चार्ज तानाजी भोसले, इस्टेट मॅनेंजर गाजरे, टाईम किपर सोपान कदम, इन्स्ट्रूमेंट मॅनेंजर समिर सय्यद, सेकेटरी भिमराव बाबर उपस्थित होते.



सोलापूर : शनिवारी सायंकाळी बाळवीस चौकात दहीहंडीचा कार्यक्रम आमदार विजयकुमार देशमुख यांच्या उपस्थितीत पार पडला. वडर समाजाने दहीहंडी फोडण्याचा मान पटकावला. (छायाचित्र केवल तिवारी)

## गॅसच्या टाक्या डिलिव्हरी करणारा बनला बोगस डॉक्टर


**सोलापूर :** गॅसच्या टाक्या डिलिव्हरी करणारा बनला होता बोगस डॉक्टर. गेल्या दहा वर्षापासून हा बोगस डॉक्टर वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याचे निष्पन्न झाले असून या बोगस डॉक्टराविरुध्द सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उत्तर सोलापूरचे आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत किसन ऐवळे (वय ४७, रा. जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विरेंद्र भालचंद्र जाधव (रा. नागेंद्र नगर, मुळेगाव रोड, ता. दक्षिण सोलिपूर), कलीम इब्राहीम शेख (रा. न्यु पाच्छा पेठ, दाजी पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडाळा येथे वीरेंद्र भालचंद्र जाधव, कलीम इब्राहिम शेख व त्याची टीम १० ऑगस्ट रोजी शिबिर भरवून रुग्णांची तपासणी करून औषध वितरण करीत असल्याचे दिसून आले.










हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर रविवार, १७ ऑगस्ट २०२५



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## मी कोण आहे? याचा विचार करावा : हभप.डॉ. जयवंत बोधले महाराज

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १६ ऑगस्ट-

मोक्ष हा परम पुरुषार्थ आहे; मोक्ष हे जीवाचे अंतिम गंतव्य आहे. पण या अवस्थेपर्यंत जाण्याकरिता कराव्या लागणाऱ्या साधनामध्ये प्रथम गोष्ट म्हणजे जीवाला त्याची खरी ओळख करुन घेता आली पाहिजे. म्हणजेच तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मी कोण आहे? याचा विचार करावा . श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर २१ व्या दिवशीच्या निरुपणात सांगितले. राजा परीक्षिताला मुक्ती प्राप्त व्हावी यासाठी शुकाचार्यांनी दिलेला उपदेश म्हणजेच भागवत कथा होय. मुक्तीप्राप्तीची सर्वांत मोठी अडथळा म्हणजे मृत्यूची भीती. मृत्यूची ही भीती का निर्माण होते? तर तिच्या मुळाशी आहे देहाभिमान. म्हणूनच देहाभिमान नष्ट झाला पाहिजे. त्यासाठी 'असंग' नावाचे शस्त्र म्हणजे वैराग्य हातात घेतले पाहिजे. परंतु हे वैराग्य निर्माण व्हावे यासाठी प्रथम आपल्यावर आलेल्या संकटाला निःसंकोच स्वीकारणे आवश्यक आहे, असे डॉ. महाराज प्रतिपादन करतात.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २१

शुकाचार्य राजा परीक्षिताला सांगतात , :हे राजन्, तू ऋषींच्या गळ्यात साप टाकलास, हे पाप तुझ्याकडून घडले आहे; ते मान्य कर.' परीक्षितही नम्रतेने म्हणतो, 'गुरुजी, होय, हे पाप माझ्याकडून झाले; मी मान्य करतो. पण आता पुढे काय करावे?' यावर शुकाचार्य उत्तर देतात, 'वैराग्य संपादन कर.' वैराग्य निर्माण होण्यासाठी सर्व इंद्रिये एकरुप व्हावीत आणि आपल्या विषयांचा विसर घ्यावा लागतो. रुप, रस, गंध, स्पर्श या विषयांच्या मोहात ही इंद्रिये सहजच फसतात. म्हणून सर्व इंद्रियांवर विजय मिळवणे अपरिहार्य आहे. डॉ. जयवंत महाराज सांगतात, श्रीकृष्ण गोपाळांना म्हणतात, 'माझे गडी कोण कोण, निवडा भिन्न यातूनी,' म्हणजे अयोग्याचा त्याग करा व योग्याचा स्वीकार करा. 'चला वळवू गायी, बैसो ऐके ठायी,' येथे 'गायी' हा शब्द सर्व इंद्रियांचे प्रतीक आहे- हात, पाय, कान, डोळे इत्यादी.

आत्मज्ञानाची भूक लागली असेल तर डोळ्यांनी परमात्म्याचे रुप पहा, कानांनी त्याचे नाम ऐका आणि 'मनेरी' नावाची गाय म्हणजे मन केवळ भगवंताच्या चरणी वळवा. सर्वांत चंचल असणारे मन भगवंतस्वरुपी स्थिर करणे हाच खरा साधनेचा हेतू आहे.परमात्मा हा आपल्या अंतःकरणातच वसतो, परंतु आपली त्याच्याशी अद्याप खरी ओळख झालेली नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात- 'आपला तो देव एक करुनी घ्यावा, तेणें विना जीवा सुख नोहे। येर ती माईके दु:खाची जनिती।' म्हणूनच देव 'आपला' होण्यासाठी सोऽहम्‌ हा भाव जागृत झाला पाहिजे, आणि त्यातूनच जीवाला स्वतः ची खरी ओळख पटते. हे मन नमन अवस्थेत पोहोचविण्यासाठी भागवत कथा श्रवण करणे आवश्यक आहे. ही कथा म्हणजे भगवत्स्वरुपाची अनुभूती देणारी एक परमसाधना आहे. मानवी जीवनाच्या उत्कर्षासाठीच ही कथा सांगितली गेली आहे. कारण यात जीवनाला दिशा देणारे व आयुष्याला आयाम देणारे श्रेष्ठ सिद्धांत मांडलेले आहेत, असे डॉ. जयवंत महाराज या सत्राच्या शेवटी सांगतात.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार
दि. १७ ऑगस्ट २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - श्रावण
कृ. नवमी (१९.२४)
ऋतु - वर्षा
नक्षत्र - रोहिणी (२७.१७)
योग - व्याघात (२५.३९)
करण - तैतिल (०८.२८)

दिनविशेष -
संत ताजुद्दिनबाबा पुण्यदिन
आदित्य पुजन
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

# शहरात ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-

**शहरातील विविध शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटनांमध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करुन विद्यार्थ्यांना खाऊ आणि लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले.**





## कोठारी हायस्कूल

श्री नवलबाई फूलचंद्र शहा कोठारी हायस्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन विविध कलागुणांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड ,प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगपती अशपाक शेख, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा लक्ष्मी कुंभार, खुशबू शेख, हुसेन बागवान उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अशपाक शेख यांच्या हस्ते म.गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आला.

प्रमुख मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार करण्यात आला. प्रशालेतील सुमित शिंदे, सुप्रिया यमगर, सृष्टी कोळी, कादंबरी यमगार या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्व आपल्या मनोगतात सांगितले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सूत्रसंचालन एस. एम. बगले यांनी तर आभार एस. एस. शिंदे यांनी मानले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सलगर

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सलगर येथे मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सलगर गावच्या प्रथम नागरिक ज्योती डोंगराजे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच कन्नड शाळेचे अध्यक्ष विजयकुमार डोंगराजे यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मराठी शाळेच्या उपाध्यक्षा रुपाली म्हेत्रे तसेच मराठी शाळेची विद्यार्थिनी प्रतिक्षा स्वामी यांच्या समवेत ध्वज कट्टा पूजन केले. शाळेच्या माजी विद्यार्थिनी भवानी पाटील यांच्याकडून तिन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यानंतर सन ब्रिज रिनेव्हेबल प्रायव्हेट लिमिटेड सोलार कंपनी यांच्याकडून तिन्ही माध्यमाच्या विद्यार्थ्यांना खाऊ आणि लेखन साहित्याचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन दिनकर भारती यांनी केले. हाजराबी बागवान यांनी आभार मानले.





## फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या, भवानी पेठ येथील मुख्य कार्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे सदस्य प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी वालचंद समाजकार्य विभागाची विदयार्थीनी वैभवी गोटे हिने देशभक्ती गीत सदर केले तर अलिश्बा सोहेल मुजावर या लहान मुलीने देशभक्तीपर भाषण केले. यावेळी प्रा. डॉ. एन. बी. तेली, मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, माजी अध्यक्ष प्रा. डॉ. नभा काकडे, माजी उपाध्यक्ष रमणलाल सोनीमिंडे, सदस्य श्रीकांत सातर्ले, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक उपस्थित होते. सूत्रसंचालन व्यंकटेश कंची यांनी केले तर आभार सुगतरत्न गायकवाड यांनी मानले.



## हरिभाई देवकरण प्रशाला व महाविद्यालय

हरीभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात तसेच मराठी पूर्व प्राथमिक शाळा, नूतन प्राथमिक शाळा, एसपीएम इंग्लिश स्कूल, के पी मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट सोलापूर या संस्थेच्या विविध शाळांमध्ये स्वातंत्र्य दिन मोठ्या साजरा करण्यात आला कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पत्रकार सिद्धाराम पाटील उपस्थित होते. यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्राचार्य श्रीमती दीपा फाटक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व पर्यवेक्षक तसेच शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन उपस्थित होते



## चाँद तारा उर्दू शाळा

चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत स्वातंत्र्य दिवस साजरा करण्यात आला. यावेळी हाजी बशीर अहमद बाराबान यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौदागर गजाला होते तर प्रमुख पाहुणे म्हणून हाजी बशीर अहमद बागवान होते व पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन खतिब उम्मे हबीबा यांनी तर आभार पटेल अशरफ यांनी मानले.



## मेहता प्राथमिक शाळा

शि.प्र मंडळीच्या कै.वि.मो. मेहता प्राथमिक शाळेच्या भव्य प्रांगणात प्रमुख अतिथी मा. डॉ. सरिता कोठाडिया यांच्या शुभहस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी शिशु शाळेच्या मुख्याध्यापिका रजनी कुलकर्णी, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांची प्रमुख उपस्थिती होती. सीमा कोरवलीकर यांनी प्रास्ताविक केले. गार्गी पंडित, श्रीपाद नळे, विश्वभारती अंधारे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मयुरी दुरुगकर यांनी केले तर आभार आभार शीतल जालिमिंचे यांनी मानले. योगेश सरवदे यांनी वंदे मातरम् अशा घोषणा देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## महावितरण कार्यालय

महावितरण सोलापूर शहर ई उपविभाग येथे अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक अभियंता अजय चव्हाण, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन पुणे प्रादेशिक संघटक सुनिल काळे, सुमित जाधव, अनिलकुमार बनसोडे, दिनेशकुमार बळवंत, निलकंठ कांबळे, अपेक्षा बहादुरे, नितीन कोळी, सदानंद रणझुंजारे, सौरभ सुरवसे, अकबर शेख, अजिंक्य कुलकर्णी, शगुप्ता मुजावर, मेघा शिवगुंडे, आनंद फुलारी, सतिश बिराजदार, मनिष जामदार, मिनल भोसले, मल्लिनाथ मुन्नोळी, सलमान जहागीरदार, सोमनाथ कारंडे, उमेश शेवाळकर, नागराज सोनवणे, अजीम सय्यद, संभाजी रुपनर, किरणकुमार इरनाळे, श्रीशैल विजापूरे, रोहिदास डांगे, संतोष कुंभार, अमजद पठाण, चंद्रकला शिंदे, प्रमिला सुरवसे, रम्या कुंजुकुंजु, सोमनाथ कोनाळे, नंदकुमार मार्तंड, समाधान कोळी उपस्थित होते.



## नागेश करजगी ऑर्किड स्कूल

नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. व्यंकटेश मेतन, संस्थेच्या सचिवा वर्षा विभुते, स्कुलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, स्कूलच्या मार्गदर्शिका मीना पारखे, प्राचार्या रुपाली हजारे, ज्यू.कॉलेज प्राचार्या स्मिता कुलकर्णी, व डॉ. वेणू भोजणे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.व्यंकटेश मेतन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. डॉ. भोजने पब्लिक स्कूलच्या विद्यार्थी व शिक्षकांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. याप्रसंगी गाईडच्या विद्यार्थ्यांनी पथसंचलन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्याच बरोबर देशभक्तीपर आधारित विविध प्रकारची नृत्ये सादर केली. सूत्रसंचालन व आभार श्रीदेवी कनके यांनी मानले.



## छत्रपती शिवाजी प्रशाला

छत्रपती शिवाजी प्रशालेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मुख्याध्यापिका सुजाता जुगदार यांनी प्रास्ताविक केले. एनसीसी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली माजी उपमख्याध्यापक अनिल लोंढे व विद्यार्थ्यांनी झेंडा गीत गौरव गीत सादर केले.तसेच प्रशालेतील एन सी सी व आर एस पी यामधील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट संचालन सादर केले. यावेळी प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संचालक अशोक चव्हाण, सुनिता साळुंखे, रेखाताई सपाटे, प्राचार्य अरुण मित्रगोत्री, प्राचार्य मंजुषा पाटील. उषा चव्हाण, उपमुख्याध्यापक श्रीपादराव जगदाळे, सुरेश जगताप, किरण देशमुख, विजया मोठे जनार्दन चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी क्रीडा शिक्षक संतोष गवळी, मारुती घोडके ,नितीन गोरे, गगन अंकुशे ,आशा राठोड, विजय वाडेकर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सारिका पंडित यांनी केले



## सोशल महाविद्यालय

स्वातंत्र्यदिनानिमित्त सोशल महाविद्यालयात विविध देशभक्ती गीतांचे व विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमास अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी वसीम बुऱ्हान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्राचार्या डॉ. महेजाबीन वाडवान, इंग्लिश मीडियमच्या मुख्याध्यापिका मा. स्वॉलेह वडवान, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. जैनुद्दीन पटेल उपस्थित होत्या. तसेच एनसीसीचे कॅप्टन डॉ. गौस शेख यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी परेड यशस्वीरित्या पार पडली.

एन.सी.सी. ऑफिसर कॅप्टन डॉ.गौस शेख यांनी आभार मानले. स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहणानंतर एक पेड़ मां के नाम या मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला.

## राष्ट्रसंत प्राथमिक शाळा व विश्वभूषण विद्यालय

अक्कलकोट रोडवरील सद्‌संकल्प शिक्षण समूहाच्या राष्ट्रसंत प्राथमिक शाळा व विश्वभूषण विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सदसंकल्प शिक्षण समूहाचे संचालक आर. एन. कांबळे व मेजर कृष्णा सुरवसे उपस्थित होते.



तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सद्‌संकल्प शिक्षण समूहाचे संस्थापक सचिव अण्णासाहेब भालशंकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथीतसेच माजी विद्यार्थी व अध्यक्षांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.प्रस्ताविक मुख्याध्यापक सत्यवान पाचकुडवे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण पाटील यांनी केलेतर आभार संतोष वाघमारे यांनी मानले.

## शिवालय शैक्षणिक संकुल

शिवालय शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. ध्वजारोहण महाविद्यालयाच्या प्राचार्या वाघचवरे कांचन यांच्या हस्ते व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दत्तात्रय गणेशकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वैष्णवी गणेशकर, ओम गणेशकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. इंगळे यांनी केले तर आभार राजकुमार शिंदे यांनी मानले.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साळुंखे, रेऊरे, पवार, सुभाष चव्हाण, मुन्ना म्हेत्रे, बाळासाहेब भोसले यांनी परिश्रम घेतले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्ह्यात 'विजयी विश्व तिरंगा प्यारा'..चा जागर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर,दि.१६ ऑगस्ट-
भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्ह्यातील गावोगावी विविध संस्था, संघटना, शाळा, महाविद्यालयातून राष्ट्रीय ध्वजाला मानवंदना देत विविध उपक्रम घेण्यात आले. कवायत प्रकार, लेझीमचे सादरीकरण, रक्तदान शिबिर, गुणवंतांचा सत्कार, तिरंगा रॅली, प्रभातफेरी, देशभक्तीपर गीतगायन, माजी सैनिक व वीरजवानांचा सन्मान, खाऊवाटप असे विविध कार्यक्रम घेण्यात आले.



## मोडनिंबमध्ये लेझीम सादरीकरणासह वक्तृत्व स्पर्धा

मोडनिंब (ता.माढा)येथील ग्रामपंचायत कार्यालय, विविध कार्यकारी सोसायटी, श्री उमा विद्यालय, संजीवन विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पोलिस दूरक्षेत्र आदी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. शहरातील शाळा, महाविद्यालयात देशभक्तीपर कार्यक्रम, वक्तृत्व स्पर्धा, स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले. दत्त चौक येथे विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकांच्या नेत्रदीपक सादरीकारणाने उपस्थितांची मने जिंकली. सालाबादप्रमाणे शफीक फाऊंडेशन यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. याबरोबरच शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक क्षेत्रांत विशेष प्रावीण्य संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मी पाटील,ग्रामविकास अधिकारी कांबळे, उपसरपंच अमित कोळी, ग्रा.प. सदस्य कैलास तोडकरी, बालाजी पाटील, दत्तात्रय सुर्वे, सोमनाथ माळी, कुरण गिड्डे, सदाशिव पाटोळे, मनसे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे, एकनाथ सुर्वे, बाबूराव सुर्वे, चांगदेव वरवडे, शिवाजी सुर्वे, संजीव शिंदे, संतोष पाटील, श्री उमा संस्थेचे अध्यक्ष व्ही.के. पाटील,आर.बी. पाटील, विश्वंभर पाटील, नितीन गडधरे, वैभव मोरे, निलेश पाटील, बाळासाहेब पाटील,माणिक कणसे,दीपक सुर्वे, संजीवन विद्यालयात दिग्विजय कांबळे, प्रकाश इंगळे,अनंता बागल, हनुमंत कुंभार, आनंद सुर्वे, सरपंच लक्ष्मी पाटील,रोटरीचे निलेश गिड्डे,राजेश निंबाळकर, बालाजी वाघमारे आदी उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेत स्वच्छ सुजल गावाचा संकल्प; सिईओ कुलदीप जंगम यांच्या हस्ते ध्वजारोहण



जिल्हा परिषदेत भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त स्वच्छ सुजल गावाचा संकल्प करण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी राष्ट्रध्वजास सामूहिक मानवंदना देण्यात आली. सिईओ जंगम यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, म्हाडाचे संचालक अजयसिंह पवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुलक्षणा सोनवणे, जिल्हा कृषी अधिकारी हरिदास हावळे, उप कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, जिल्हा जलसंधारण अधिकारी हरीबा सपताळे, जिल्हा निरंतर विभागाचे शिक्षणाधिकारी उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, लेखाधिकारी श्रीकांत मिरगाळे उपस्थित होते. हरिभाई देवकरण प्रशालेचे विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व बहारदार महाराष्ट्र गीत सादर केले. कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी स्वच्छ सुजल गाव संकल्प मोहिमेची शपथ दिली. निरंतर शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांना सिईओ जंगम यांचे हस्ते सन्मानपत्र वाटप करणेत आले. विस्तार अधिकारी गुरव यांनी सुत्रसंचालन केले. प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे यांनी आभार मानले.

## स्वातंत्र्यदिनाचा उत्साह



### वळसंगमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त शिल्पा मरबे यांचा सत्कार

**वळसंग, १६ ऑगस्ट-**

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे स्वातंत्र्यदिन कार्यक्रमात सलग १५ वर्ष आशा वर्कर म्हणून सेवा दिल्याबद्दल वळसंग ग्राम पंचायतकडून शिल्पा मरबे यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच समीर कटरे, माजी सरपंच आरिफ कुरेशी, तंटामुक्त अध्यक्ष दाऊद आमलीचुंगे, माझी तंटामुक्त अध्यक्ष बुडन कटरे, सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.



### वळसंग ग्रामीण रुग्णालय

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे ग्रामीण रुग्णालयात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत सरपंच जगदीश अंटद यांच्या हस्ते प्रतिमा पूजन तर माजी जिल्हा परिषद सदस्य ड.संजय गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी डॉ. रवी राठोड, डॉ. महादेव हारकुड, डॉ.बावलट्टी, डॉ. अरविंद कटारे, उपसरपंच समीर कटरे, तंटामुक्त अध्यक्ष दाऊद अमलीचुंगे, माझी तंटामुक्त अध्यक्ष बुडन कटरे, राजकुमार देसाई उपस्थित होते.





### विश्वशांती गुरुकुल, पंढरपूर

एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात विश्वशांती गुरुकुल स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कर्नल मेजर हरी लक्ष्मण बोंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य शिवाजी गावळी यांनी केले. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेंठ, हेडमिस्ट्रेस श्रीमती शिबानी बॅनर्जी उपस्थित होते. आभार अरिफ यांनी मानले.



### तहसिल कार्यालय, पंढरपूर

स्वातंत्र्य दिनानिमित्त तहसिल कार्यालय येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, नायब तहसिलदार बालाजी पुदलवाड, डि.एस.आसवले, निवडणुक नायब तहसिलदार वैभव बुचके, मंदिर समितीच्या सदस्या शंकुतला नडगिरे उपस्थित होते. यावेळी पंढरपूर पोलीस पथकाच्यावतीने मानवंदना देण्यात आली. यावेळी स्वातंत्र्य औचित्य साधून उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्याहस्ते शहिद मेजर कुणाल गोसावी यांचे पिता मुन्नागिरी गोसावी यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.



### मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय, पंढरपूर

१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन श्री रुक्मिणी विद्यापीठ संचलित मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय व जुनिअर कॉलेज पंढरपूर. या शाळेत मोठ्या उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मुलींनी निमंत्रित पाहुण्यांना शिस्तबद्ध व तालबद्ध पद्धतीने मानवंदना देऊन दूरदर्शन निवेदिका डॉ. वनिता घाडगे देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत गायन, नृत्य, कवायत व भाषण सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. तसेच इयत्ता दहावी व बारावी मार्च २०२५ यश प्राप्त विद्यार्थ्यांना सूर्योदय एल के पी मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह या संस्थेने दिलेले शाल व ट्रॉफी पाहुण्यांचे हस्ते देऊन देऊन गौरविण्यात आले. तसेच या कार्यक्रमात ऋषिकेश बोडके माजी विद्यार्थी यांने प्रशालेस आहूजा कंपनीचे दोन कॉडलेस माईक भेट दिले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रा.गणेश डुबल यांनी मानले व शेवटी देशभक्तीपर घोषणा देवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## सिल्व्हर ज्युबिली शाळा, बार्शी

सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमध्ये दहावी परिक्षेतील अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या तनिष्का फल्ले, वृंदा सुपेकर व जान्हवी पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिरुध्द चाटी, पर्यवेक्षिका अनुराधा विश्वेकर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका जयश्री रणखांबे, सरस्वती प्राथमिक च्या मुख्याध्यापिका रेणुका धुळम तसेच सिल्व्हर बालक मंदिरच्या प्रमुख दिपाली गोरे उपस्थित होते. मुख्याध्यापक अनिरुद्ध चाटी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी तनिष्का फल्ले, वृंदा सुपेकर यांनी आपल्या शालेय आठवणींन उजाळा दिला. सांस्कृतिक विभाग प्रमुख शुभांगी म्हमाणे क्रीडा विभागप्रमुख हेमंत गाढव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, कर्मचारी, सेवक वर्ग यांनी परिश्रम घेतले. आनंद जमदाडे यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षिका अनुराधा विश्वेकर यांनी आभार मानले.

## ग्रामपंचायत, जि.प. शाळा कासारवाडी



कासारवाडी (ता. बार्शी) येथील जि.प. प्राथमिक शाळेतर्फे प्रभातफेरी काढण्यात आली. ग्रामपंचायतचे ध्वजारोहण सरपंच अश्विनी मंडलिक यांच्या हस्ते तर शहीद जवान विठ्ठल खांडेकर स्मारक येथील ध्वजारोहण मेजर शिवाजी गुंड यांच्या हस्ते झाले. जि. प. शाळेतील ध्वजारोहण अध्यक्षा प्रिती कांबळे यांच्या हस्ते झाले. पुरुषोत्तम कदम यांनी शाळेस दिलेल्या फळ्यांचे उद्घाटन करण्यात आले. पंचायत समिती शिक्षण विभागाने शाळेस दिलेले प्रमाणपत्र मुख्याध्यापक सुधाकर बडे व शिक्षकांना सुपूर्द केले. शहीद मेजर खांडेकर यांच्या कुटुंबियांनी शाळेस सीलिंग फॅन भेट दिला. द्वारका पिंपळे यांनी सूत्रसंचालन केले. उपसरपंच सुधीर गायकवाड, उपाध्यक्षा अंबिका खाडे, तंटामुक्त अध्यक्ष शरद गुंड, नितीन मंडलिक, राकेश मंडलिक, बाजीराव मंडलिक, निशिकांत सुतार, काकासाहेब पाटील, अतुल कांबळे, महादेवी मंडलिक, ग्राम सेविका सोनवणे, बिनादेवी दरेकर, वीणा कदम, बाळासाहेब मुंढे, मनीषा भोसले, रेणुका मुंढे, द्वारका पिंपळे यांनी परिश्रम घेतले.



## वखारिया विद्यालय, उपळे दुमाला



बार्शी तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रारंभी दयानंद रेवडकर यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. शालेय विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, राज्यगीत, ध्वज गीताचे गायन केले. क्रीडा शिक्षक एन.एन महाले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी रमेश लंकेश्वर, डी.डी.राऊत, अनिल वैद्य, शिरीष साळुंखे, पी.बी.काशीद, मकरंद जगदाळे, आर.एस. दुलंगे, रोहिणी डोईफोडे, शंकर शिंदे, दादासाहेब धनके, सेवक वाघ मामा, सुरवसे मामा उपस्थित होते.



## दत्त प्राथमिक व दिलीपराव सोपल प्रशाला, बार्शी

बार्शी येथील दत्त प्राथमिक विद्यामंदिर व दिलीपराव सोपल प्रशाला येथे मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष मोहन ठोंगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक दत्तात्रय मोरे, चंद्रशेखर निकम, प्रमोद साळुंखे, सोपल प्रशालेचे मुख्याध्यापक सचिन काळे, मृन्मय ठोंगे, माजी विद्यार्थी सागर झोळ, तेजस जाधव, अशोक मोरे, लक्ष्मी मोरे उपस्थित होते. इ.६ वीच्या मुलींनी समूहगीत सादर केले. संस्था अध्यक्ष मोहन ठोंगे व अरुणा मठपती यांच्यातर्फे सन २४-२५ मध्ये १० वी बोर्ड परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या प्रथम तीन विद्यार्थ्यांना तसेच ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा पात्र विद्यार्थ्यास रोख रकमेच्या स्वरुपात बक्षिसांचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचलन व फलक लेखन युवराज जगताप यांनी केले. मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे यांनी आभार मानले. कार्यक्रमास संगीता काळे, अरुणा मठपती, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, ललिता चव्हाण, प्रेरणा कसबे, सचिन काळे, चंद्रकांत लोखंडे, राहुल ठोंगे, संतोष ठोंबरे, शितल पाटील व सेवक संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण उपस्थित होते.

## श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालय, बार्शी

बार्शी येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयात वाचकांचा ५० हजारांचा मोफत विमा देत स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

सर्व सरकारी कर्मचारी, डॉक्टर्स, इंजिनियरर्स यांना मोफत वाचक सभासद व इतरांसाठी वाचक सभासद नोंदणी केल्यास पन्नास हजारचा एक वर्षाचा मोफत विमा देण्याचे ठरवण्यात आले. श्री जैनाश्रमचे श्रावक महावीर बोथरा व सुनिताभाभी बोथरा यांच्या हस्ते ध्वजरोहण करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे ऑ.सेक्रेटरी आनंद पुनमिया, अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, प्रमोद भंडारी, अशोक कांकरिया, तसेच सर्व वाचक सभासद, महिला वर्ग ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन ऑ. सेक्रेटरी आनंद पुनमिया यांनी तर प्रस्ताविक आनंद सुराणा यांनी केले. ग्रंथपाल सुरेश यादव, क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.




## जिल्हा परिषद प्राथ.शाळा, उपळाई (ठो)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो)येथे मेजर गिरी यांचे हस्ते, माजी सरपंच विजयबापू ठोगे, सरपंच मधुकर वैद्य, पोलीस पाटील संतोष सातपुते, संतोष काळे, भागवत वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संदीप बोटे, सुंदरराव पाटील, भालचंद्र जामदार, नसिरभाई शेख, प्रशांत जामदार, सिकंदर तांबोळी, संतोष पाटील, सतिश शिंदे, दराडे भाऊसाहेब, रमेश पाटील, भागवत वाघ, नागनाथ सदावर्ते, रामकृष्ण शिंदे उपस्थित होते. राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीत, ध्वजप्रतिज्ञा, संविधान, संगीत कवायत संचलन झाले. सोलापुरी संबळ लेझीम सादरीकरण इयत्ता ६ वी व ७ वी तील विध्यार्थ्यांनी सादर केले. देश रंगीला, ऐ वतन या गीताचे सादरीकरण करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके यांनी शाळेचे शैक्षणिक कामकाज व शाळेची गुणवत्ता उत्कृष्ठ असल्याचे पत्र पाठवून अभिनंदन केले. त्याबद्दल ग्रामस्थांच्यावतीने मुख्याध्यापक अनिल काळे व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिक्षक प्रभाकर काटे, रामचंद्र बरचे, आनंद घाडगे, हरिभाऊ दळवी, सुवर्णगौरी गवळी, मीरा गरड, दिपाली गोरे, प्रिया गडदे उपस्थित होत्या.

## ग्रामपंचायत, बासलेगाव

तालुक्यातील बासलेगाव ग्रामपंचायत येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण सरपंच बिराप्पा बंदीछोडे व ग्रामपंचायत सदस्य विमलाबाई बिराजदार यांच्या हस्ते व गावातील विविध शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या सत्तारभाई शेख, सूर्यकांत बिराजदार, श्रीमंत सोडगी, सिद्धाराम पुजारी, दत्ता कणके, मंगेश चव्हाण, चंद्रकांत पाटील, घोषणात राठोड, पंडित बंदीछोडे, देविदास निंबाळे, नागप त्रिमुख, दत्ता घुमते आदी मान्यवरांचा सत्कार देखील यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगपती शशिकांत बिराजदार, सोसायटी चेअरमन सुभद्रा गौडगाव, काशिनाथ बिराजदार, माजी सरपंच सिद्धाराम बिराजदार, तीप्पवा सोडगी, सीमा स्वामी, शांताबाई सुतार, ग्रामसेविका सीएस स्वामी, लखन राठोड, काशिनाथ कवडे, उपसरपंच श्रीनिवास गवंडी, जगदीश बिराजदार, सिद्धाराम अंतद, सुनील जमादार, श्रीमती खान, हनुमंत सराफ आधी जण उपस्थित होते.



## न्यू हायस्कूल व प्राथमिक विद्या मंदिर, बार्शी

राष्ट्रभक्तीच्या भावना, तिरंग्याचा अभिमान आणि देशप्रेमाचा उत्साह यांचा संगम आज नव महाराष्ट्र विद्या विकास मंडळ संचलित न्यू हायस्कूल व प्राथमिक विद्या मंदिरात पाहायला मिळाला. स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण डॉ. योगेश सोमाणी यांच्या हस्ते पार पडले. या सोहळ्यास मंडळाच्या उपाध्यक्षा वनिता हलगणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमात मुख्याध्यापक दीपक उंबरदंड, मुख्याध्यापिका योगिता बेळे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचा गजर, ताठ मानेने झालेले संचलन आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते यामुळे परिसर देशप्रेमाच्या वातावरणाने भारवला. सूत्रसंचालन क्रीडाशिक्षक संतोष खुडे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख संजिवनी धाकपाडे यांनी केले. विज्ञान शिक्षक सतीश होनमुटे यांनी आभार मानले.


CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विजयसिंह मोहिते पाटील यांना हरिभाऊ शिंदे फाउंडेशन पुरस्कार जाहीर

### ह.भ.प.केशव महाराज नामदास यांच्या हस्ते होणार वितरण





**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १६ ऑगस्ट-**

हरिभाऊ शिंदे फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा या वर्षीचा जीवन गौरव पुरस्कार माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा हभप केशव महाराज नामदास पंढरपूर, संत नाम देव महाराजांचे वंशज यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अभिजीत पाटील असणार आहेत.

हरिभाऊ नाना शिंदे फौंडेशनच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी महिती फौंडेशनचे अध्यक्ष यशवंत शिंदे यांनी दिली. यामध्ये मंगळवार (दि १९) रोजी सकाळी दहा वाजता संत सावता माळी विद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, शुक्रवार दि. २२ रोजी रक्तदान शिबिर, मॉर्डन इंग्लिश स्कूल मधील म ुलांना खाऊ वाटप, बुधरानी हॉस्पिटलच्या वतीने मोतीबिंदू तपासणी शिबिर, डोळे तपासणी शिबिर, वृक्ष वाटप, वृक्ष संवर्धन स्पर्धा व सकाळी दहा वाजता माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह म ोहिते- पाटील यांना हरिभाऊ शिंदे जीवन गौरव पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न होणार आहे. कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन फाउंडेशनचे अध्यक्ष यशवंत शिंदे, उपाध्यक्ष अ‍ॅड. आनंद कुलकर्णी, सचिव बाबासाहेब शेळके सहसचिव संजय शिंदे यांनी केले आहे.



### महत्त्वाचे



## आचेगावच्या शावरसिद्ध प्रशालेस माजी विद्यार्थ्यांकडून संपूर्ण बँड भेट

**आचेगांव, दि. १६ ऑगस्ट -**

आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शावरसिद्ध प्रशालेतील १९९७-९८ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांकडून प्रशालेस १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या निमित्त संपूर्ण बँड साहित्य भेट देण्यात आले. या विद्यार्थ्यांचा नुकताच २७ वर्षानंतर स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. या स्नेह मेळाव्यात सर्व माजी वियार्थ्यांनी शाळेची गरज विचारून शाळेला आवश्यक असलेल्या संपूर्ण बँड साहित्याची भेट शाळेस दिली. त्याचप्रमाणे याच बॅचचे माजी विद्याार्थी डॉ. रवींद्र बनसोडे व बसवराज कांबळे यांच्याकडून होतकरू, गरजू व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शालेय गणवेश ही देण्यात आला. माजी विद्यार्थ्यांकडून शाळे प्रती असलेल्या स्नेह व आपुलकीबद्दल मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार यांनी समाधान व्यक्त केले.



## घोळसगाव जिल्हा परिषद मराठी शाळेत दहीहंडी साजरी

**अक्कलकोट, दि. १६ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद मराठी शाळा घोळसगाव येथे दरवर्षीप्रमाणे दहीहंडीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी मुलांची आणि मुलींची दहीहंडी फोडण्यातआली. ग्रामस्थ उपस्थित होते. या साठी शाळेतील शिक्षक गुंजोटे, दरेकर , वागदकर, ठाकर, मुख्याध्यापक मोरे व प्रतीक्षा डाळे उपस्थित होते. दहीहंडी तीन थर लावून फोडण्यात आले व श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या कार्यक्रम आनंदाने साजरा करण्यात आला.

## भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**पंढरपूर दि. १६ ऑगस्ट -**



भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवारी(दि.१५ ऑगस्ट) श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्ट्या जोड, हि-याचा कंगन जोड, मोत्याचा तुरा, शिरपेच, मत्स्य जोड, अष्टपैलू मण्याची कंटी, तोडे जोड, चंद्रहार, पदकासह लॉकेट, मोहनमाळ, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, तुळशीची माळ तसेच श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान आले आहेत.



## ब्रह्मदेवदादा माने बँकेत ध्वजारोहण

**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँकत ७९वा स्वातंत्र्यदिनानिमित्त बँकेचे मार्गदर्शक माजी आमदार तथा श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बँकेचे चेअरमन सोमनाथ गायकवाड,संचालक तानाजी सिनगारे, रमेशसिंग बायस, आनंदराव देठे, श्रीकांत बंडगर, काशिनाथ गौडगुंडे, अ‍ॅड. इंद्रजीत पाटील महिला संचालिका रुक्मिणी केंगार, प्रिया पाटील, सेवक संचालक संतोष घोडके, अनिल शिंदे, बँकेचे व्यवस्थापक विनोद कुलकर्णी, डॉ. अर्चना देठे आदीसह बँकेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पंढरपूर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्रीकृष्णजन्माष्टमी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ ऑगस्ट-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त श्री विठ्ठल सभामंडप येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचे कीर्तन झाले. रात्री ११ वाजता श्री विठ्ठलास पोशाख करण्यात आला.

त्यावेळी देवास मंदिल (जरीचे ११० हाताचे लाल पागोटे) चांदीची काठी, कुंची असा पोशाख करण्यात आला. त्यानंतर रात्री १२ वाजता पुजारी, उपस्थित मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), अ‍ॅड. माधवीताई निगडे, सल्लागार परिषद सदस्य ह.भ.प. प्रसाद महाराज अमळनेरकर, सचिन इथापे उपविभागीय अधिकारी पंढरपूर तथा कार्यकारी अधिकारी, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, विभाग प्रमुख संजय कोकीळ, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी यांच्या हस्ते देवाच्या अंगावर गुलाल टाकण्यात आला.

श्री विठ्ठलास सुंठवडा, पेढे, बर्फी प्रसाद दाखवण्यात आला. श्री विठ्ठल सभामंडप येथील पाळण्यामध्ये बाळकृष्ण व नारळ ठेवण्यात येऊन कीर्तनानंतर नारळ सुवासीणीला देऊन उपस्थित भाविकांना सुंठवडा प्रसाद वाटण्यात आला. गोकुळाष्टमीच्या उत्सवानिमित्त भाविक भक्तांनी मोठी गर्दी केली होती. भजन, किर्तन अशा पारंपारिक पध्दतीने गोकुळाष्टमी मंदिरात रात्री उशिरापर्यंत साजरी करण्यात आली.




## पंढरपूर अर्बन बँकेस ३८ कोटी ४२ लाखाचा नफा

### वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१६ ऑगस्ट -**

येथील दि.पंढरपूर अर्बन बँकेस २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३८ कोटी ४२ लाखांचा ढोबळ नफा झाला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी ११३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दिली. यावेळी त्यांनी शासनाच्या व्याज परतावा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

येथील कर्मयोगी सभागृहात गुरूवारी दि.१४ ऑगस्ट रोजी सभा झाली. यावेळी बँकेचे कुटुंबप्रमुख मा.आ.प्रशांत परिचारक तसेच पदाधिकारी उपस्थित होते. सभासदांचे प्रशिक्षणही पार पडले. बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी प्रास्ताविक केले. माजी आमदार परिचारक यांनी थकबाकी कमी करणेत यश मिळविले असून लाभांशासाठी रिझर्व्ह बँकेकडे बँकेने प्रस्ताव दाखल केला असल्याचे सांगितले. त्यांची मान्यता आल्यावर लाभांश वितरीत करणेत येणार असल्याचे सुतोवाच केले. मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी अहवाल वाचन केले. डॉ.अनिल जोशी, सुभाष भोसले यांच्या प्रश्नांना सम र्पक उत्तरे देणेत आली. व्हा. चेअरमन माधुरी जोशी यांनी पसायदान म्हटले व सभेची सांगता केली. यावेळी संचालक राजाराम परिचारक, रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, संगिता पाटील, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, अतुल कौलवार, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड, सर्व सभासद, हितचिंतक उपस्थित होते.

## सहकार महर्षि साखर कारखान्यात ध्वजवंदन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ ऑगस्ट-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यात संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. संचालक, खातेप्रमुख व कामगार यांनी राष्ट्रध्वजास सलामी देऊन राष्ट्रगीत व ध्वजगीताचे गायन केले.

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख तसेच संचालक विराज निंबाळकर, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक राम चंद्रराव सावंत-पाटील, कार्यलक्षी संचालक - रणजित रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, दत्तात्रय चव्हाण तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले व खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## स्वातंत्र्य दिनानिमित्त विठ्ठल मंदिरात फुलांची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ ऑगस्ट-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात झेंडू, गुलाब, शेवंती, ऑर्केट, ब्लुडीजी, जिप्सो इत्यादी फुलांचा वापर करून आकर्षक व नवीन रम्य सजावट करण्यात आली आहे. यासाठी जवळपास दोन टन फुलाचा वापर केला असून, सदरची सजावट श्रीमंत मोरया प्रतिष्ठान, पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत करून दिली आहे.





## शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१६ ऑगस्ट-**

शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमधील स्वातंत्र्यदिनाचे ध्वजवंदन सुभेदार विजयकुमार सावंत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षपदी जेष्ठ एलएमसी मेंबर हनुमंत भोसले होते.

यावेळी दिलीप बारवे, नवनाथ भानवसे, बालाजी लेकुरवाळे, गणेश घुगे, माता पालक संघाच्या उपाध्यक्ष सुषमा शिंदे आणि एलएमसी मेंबर शिवदत्त नारायणकर, शंकर गायकवाड उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी संचलन आणि कवायत सादर केली. मुख्याध्यापक जितेंद्र माने देशमुख यांनी प्रास्ताविक केले. विविध बक्षीसांचे वितरण झाले. त्यामध्ये श्रेया इंटेलिजन्स तसेच शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण झाले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्य सादर केले. चौथीतील रघुवीर जाधव आणि शौर्य उपासे यांनी लाठीकाठी आणि दांडपट्टाचे साहसी प्रकार सादर केले. पाचवीतील विद्यार्थ्यांनी 'मानवी मनोरे' हा साहसी क्रीडा प्रकार सादर केला तर सहावी आणि सातवीतील विद्यार्थिनींनी देशभक्तीपर समूहनृत्य सादर केले. सूत्रसंचालन शिक्षिका तमन्ना नाईकवाडी यांनी केले. गणेश शेवकर यांनी आभार मानले.

## करमाळ्यात मंगळवारी शेतकरी आक्रोश मोर्चा

**सोलापूर, दि.१६ ऑगस्ट-**

करमाळ्यात मंगळवारी १९ ऑगस्ट रोजी सकाळी अकरा वाजता शेतकऱ्यांची कर्जमाफी व म ाजी आमदार बच्चू भाऊ कडू यांच्या मागणीला पाठिंबा देण्यासाठी जन आक्रोश मोर्चा निघणार आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करून सातबारा कोरा करा, केळी रोपे कंपनीच्या किमतीपेक्षा जास्त किमतीने शेतकऱ्यांना विकणाऱ्यावर कारवाई करा, पात्र केशरी रेशन कार्डधारकांना अन्नसुरक्षा योजनेत समाविष्ट करा, रेशनकार्डमध्ये नाव वाढविणे व कमी करणे, संजय गांधी योजनेचे पैसे कित्येक लाभार्थ्यांना सहा महिन्यापासून मिळालेले नाहीत ते लवकरात लवकर मिळावेत, सहा महिन्यापासून प्रलंबित नविन अर्जाबाबत निर्णय घेणे या सर्व मागण्या घेऊन बहुजन संघर्ष सेना छत्रपती शिवाजी महाराज पुतळा करमाळा येथून मोर्चाला सुरुवात करणार आहे. नागरिकांनी मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांनी केले आहे.



## सांगोला नगरपरिषदेतर्फे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ ऑगस्ट-**

दि.१५ ऑगस्ट रोजी सांगोला नगरपरिषदेच्या वतीने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची ७५० वी जयंती निमित्त आयोजित पालखी सोहळा म ोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्याला सांगोला परिसरातील नागरीक, वारकरी व भक्तांनी हजेरी लावली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची सांगोला शहरात टाळ-मृदंगाच्या गजरात व विठ्ठल नामाच्या जयघोषात उत्साहपूर्ण मिरवणूक प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. यावेळी स्थानिक विठ्ठल भजनी मंडळ, रुद्र महिला भजनी मंडळ यांनी सादर केलेल्या भजनांनी सोहळ्याची शोभा वाढवत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सोहळ्यादरम्यान संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनावर आधारित भजन, भक्तीगीते आणि गोल रिंगण यांसारखे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

सर्वांच्या सहकार्यामुळे हा उत्सव यशस्वी झाला, असे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांनी सांगितले.



## श्री लक्ष्मीनारायण मंदिरात कृष्ण जन्मोत्सव साजरा

सोलापूर : मंगळवार पेठ परिसरातील मंदिरात श्री. लक्ष्मीनारायण मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव बालमंडळांनी साजरा केला. त्याप्रसंगी मंदिरात फुलाची सजावट करण्यात आली होती.

(छायाचित्र : केवल तिवारी)

## शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१६ ऑगस्ट-**



येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विद्यार्थिनींनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार आपले व्यक्तीमत्व विकसित करावे असे मत व्यक्त केले. यावेळी विकास समितीचे सदस्य अप्पासाहेब मगर, रणजीत माने देशमुख, प्राचार्य डॉ.एस.के. टिळेकर, बी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.ए.एस. भानवसे, महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ.जयश्री धुमाळ, डी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य प्रा.एन. बी.देवडकर तसेच प्रा. डॉ.विश्वनाथ आवड, डॉ.बाळासाहेब मुळीक, प्रा.अरविंद शेंडगे, डॉ.सतीश देवकर, डॉ.हनुमंत अवताडे, प्रा. विनायक सूर्यवंशी, राजेंद्र बामणे, अधीक्षक युवराज मालुसरे व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.जनार्धन परकाळे यांनी केले.